नवभारत

वर्ष ७ वें] मे १९५४ [अंक ८ वा

भू-दान आंदोलन आणि सत्याग्रही समाजवाद . आचार्य शं. द. जावडेकर
मऱ्हाटी संस्कृति: कांहीं व्यक्तिनामांचा विचार . श्री. शं. बा. जोशी
तुटीचें अर्थकारण . . . . प्रा. अ. ना. लोथे
राष्ट्रकुलासमोरील प्रश्न . . . . प्रा. स. वा. कोगेकर
खेड्यांची लढाई . . . . प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर
पाक-अमेरिका लष्करी करार . . . श्री. व. भ. कर्णिक
संपत्तिदान यज्ञाचें धर्मकार्य . . श्री. लक्ष्मीनारायण भारतीय
अर्थशास्त्राची परिभाषा . . . प्रा. श्या. भा. कुलकर्णी
आपण शंभर वर्षे जगूं या ! . . श्री. वालजी गोविन्दजी देसाई
प्रेतावरचे पैसे ! . . . . श्री. रतनलाल भंडारी
विद्यापीठांतील शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न
प्रा. गोवर्धन पारीख, प्रा. अ. रा. कामत, प्रा. प्र. रा. दामले
पुस्तकपरामर्श कविता

किंमत १ रुपया

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे
संगणकीकृत

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई – ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

निवेदन

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई ही महाराष्ट्र शासनाने स्थापन केलेली स्वायत्त संस्था आहे. मराठी भाषा विभागाच्या पत्राप्रमाणे (संदर्भ क्र. मसंस २०१६/प्र.क्र.११५/२०१६/भाषा-२, दि. ३ जानेवारी, २०१७) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे '**महाराष्ट्रातील मराठी संशोधन मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य योजना**' कार्यान्वित करण्यात आली असून या योजनेअंतर्गत महाराष्ट्रातील मराठी भाषा, साहित्य व संस्कृती वृद्धिंगत होण्यासाठी काम करणाऱ्या महाराष्ट्रातील मान्यताप्राप्त मंडळ/ संस्थांना अर्थसाहाय्य करण्यात येते.

सदर प्रकल्पांतर्गत प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांना राज्य मराठी विकास संस्थेद्वारे नवभारत मासिकांचे ऑक्टोबर १९४७ ते सप्टेंबर २०१७ पर्यंतच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासाठी अर्थसाहाय्य करण्यात आले होते. याअंतर्गत सदर अंकांचे संगणकीकरण करण्यात आले असून **प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांनी हे अंक जतन केलेले असल्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.**

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व प्राज्ञपाठशाळामंडळ, वाई यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर असणार नाही.

अनुक्रमणिका

सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या विश्वस्तमंडळाचें मासिक

वर्ष सातवें | नवभारत | मे
अंक आठवा | | १९५४

मऱ्हाटी संस्कृतिः कांहीं व्यक्तिनामांचा विचार	श्री. शं. बा. जोशी	१– ८
भूदान-आंदोलन आणि सत्याग्रही समाजवाद	आचार्य शं. द. जावडेकर	९–१३
संपत्तिदान-यज्ञाचें धर्म-कार्य	श्री. लक्ष्मीनारायण भारतीय	१४–१७
आपण शंभर वर्षे जगूं या !	श्री. वालजी गोविन्दजी देसाई	१८
खर्ड्यांची लढाई	प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर	१९–२२
प्रेतावरचे पैसे !	श्री. रतनलाल पी. भंडारी	२३–२४
तुटीचें अर्थकारण	प्रा. अ. ना. लोथे	२५–२९
अर्थशास्त्राची परिभाषा	प्रा. श्या. मा. कुलकर्णी	३०–३५
राष्ट्रकुलासमोरील प्रश्न	प्रा. स. वा. कोगेकर	३६–४०
विद्यापीठांतील शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न		
पूर्वतयारीची आवश्यकता	प्रा. गोवर्धन पारीख	४१–४६
आजची अनैसर्गिक परिस्थिति !	प्रा. अ. रा. कामत	४६–५०
विधायक, उत्साहपूर्ण कृतीची आवश्यकता	प्रा. प्र. रा. दामले	५०–५२
काँग्रेस कार्यकारिणीचें शिक्षणाच्या माध्यमाविषयीचें धोरण		५२–५४
उंच उभें झाड !	श्री. राजा मंगळवेढेकर	५४
‘ शार्दूलविक्रीडित ’,	श्री. विश्वनाथ के. महाबळेश्वरकर	५४
वरदान !	श्री. मंगेश पदकी	५५
मनांतलें तें – !	श्री. सूर्यकान्त खाण्डेकर	५५
महात्मा	प्रा. सुरेश डोळके	५६
आज पुन्हा – !	सौ. सरिता पदकी	५६
पाक-अमेरिका लष्करी करार	श्री. व. भ. कर्णिक	५७–६३
पुस्तक परिचय	श्री. नारायण य. डोळे	६३–६४

'नवभारत' मासिक, मे १९५४

—लेखक-परिचय—

[खालीं दिलेल्या लेखकांशिवाय, या अंकांतील इतर लेखकांचा परिचय या वर्षी या पूर्वी त्यांचे लेख आले त्या त्या वेळीं दिला आहे. -- का. सं.]

श्री. शं. बा. जोशी (धारवाड) – कानडी भाषेचे आणि कर्नाटक-आणि-महाराष्ट्रसंस्कृतीचे व्यासंगी पंडित व लेखक. 'मऱ्हाटी संस्कृति : कांहीं समस्या' या पुस्तकाचे लेखक.

श्री. लक्ष्मीनारायण भारतीय साहित्यरत्न – वर्ध्याच्या 'सर्वोदया'चे सहसंपादक. सर्वोदयसाहित्यसंपादन-समितीचे संयोजक.

श्री. वालजी गोविन्दजी देसाई (पुणें) – गुजरात विद्यापीठामधील माजी प्राध्यापक. 'हरिजन'मध्यें यांचें लेखन पूर्वीपासून येत असतें. 'गोरक्षाकल्पतरु', 'महादेवभाई देसाई यांची डायरी' इत्यादि पुस्तकांचे लेखक.

प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर – पुणें येथील 'डेक्कन कॉलेज पोस्टग्रॅज्युएट ॲन्ड रिसर्च इन्स्टिट्यूट'मध्यें 'मराठा इतिहासा'चे प्राध्यापक. 'Panipat 1761' या पुस्तकाचे लेखक.

श्री. रतनलाल पी. भंडारी (पुणें) – माध्यमिक शाळेंतील विद्यार्थी.

प्रा. अ. ना. लोथे – उमरावती येथील विदर्भ महाविद्यालयांत अर्थशास्त्राचे प्राध्यापक.

प्रा. स. वा. कोगेकर – पुणें विद्यापीठांत व फॅर्ग्युसन कॉलेजांत राज्यशास्त्राचे प्राध्यापक. राष्ट्रकुल परिषदेच्या लाहोर येथील अधिवेशनाला ते हजर होते.

प्रा. श्या. मा. कुलकर्णी – अहमदनगर कॉलेजमध्यें अर्थशास्त्र, राज्यशास्त्र या विषयांचे प्राध्यापक.

प्रा. अ. रा. कामत – पुणें विद्यापीठांत व फर्ग्युसन कॉलेजमध्यें गणित आणि संख्याशास्त्र या विषयांचे प्राध्यापक.'नवीन शिक्षण', 'सोव्हिएट आर्थिक नियोजन' इत्यादि पुस्तकांचे लेखक.

प्रा. प्र. रा. दामले – पुणें विद्यापीठांत व वाडिया कॉलेजमध्यें तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक. 'Philosophical Essays' या पुस्तकाचे लेखक.

श्री. मंगेश पदकी एम्. कॉम्. (पुणें) -- यांच्या कविता व लघुकथा मराठी नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असतात. यांच्या एका लघुकथेला 'लोकमान्या'तर्फे भरविल्या गेलेल्या स्पर्धेत ४ थें बक्षीस मिळालें.

प्रा. सुरेश डोळके — अमरावती येथील विदर्भमहाविद्यालयांत मराठीचे प्राध्यापक.

सौ. सरिता पदकी एम्. ए. — पुणें येथील 'डेक्कन पोस्ट ग्रॅज्युएट इ.' या संस्थेंतील शब्दकोश विभागांतील कार्यकर्त्या. यांच्या कविता मराठी नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असतात.

वार्षिक रु. ९ **सहामाही रु. ५** **अंकास रु. १**

हें मासिक श्री. **म. शं. साठे** यांनीं **दी प्राज्ञ प्रेस, ३१५ गंगापुरी, वाई** येथें छापून प्रा. **वि. म. वेडेकर** यांनीं सुलभ राष्ट्रीय ग्रंथमालेच्या विश्वस्तमंडळाकरितां तेथेंच प्रसिद्ध केलें.

पत्रव्यवहाराचा पत्ता : १ संपादकीय : कार्यकारी संपादक, 'नवभारत मासिक', ९०६ शिवाजी-नगर, पुणें ४

२ व्यवस्थापकीय : व्यवस्थापक, 'नवभारत' मासिक, C/o प्राज्ञ प्रेस वाई (जि. सातारा)

मऱ्हाटी संस्कृतिः कांहीं व्यक्तिनामांचा विचार

'लीळाचरित्रा'चें महत्त्व

मराठी संस्कृतीचा पाया कसा आहे हें जाणण्याच्या दृष्टीनें ' लीळाचरित्र ' हा एक अमोलिक ग्रंथ आहे. यांतील व्यक्तींचीं नांवें, स्थलांचीं नांवें, चालीरीतींचीं वर्णनें, भाषेचा प्रकार वगैरे प्रत्येक गोष्टीचा तुलनात्मक अभ्यास होणें जरूर आहे. या दृष्टीनें प्रस्तुत लेख हा एक अल्प प्रयत्न आहे. त्यांत निरनिराळ्या विद्वानांकडून यांत भर पडेल, दुरुस्त्या सुचविल्या जातील अशी आशा आहे.

सांकेतिक लिपींतच हे ग्रंथ बऱ्याच काळपर्यंत राहिल्यानें त्यांतील मराठी भाषेचें स्वरूप शक्य तों मुळाबरहुकुम मिळणें शक्य झालें आहे. ज्ञानेश्वरीप्रमाणें त्या ग्रंथाच्या भाषेला वेळोवेळीं नवें वळण लागत राहिलें नाहीं. वैदिकांनीं वेद जितक्या काळजीनें जपले तितक्याच तत्परतेनें हे पाठ टिकवून ठेविण्याचा प्रयत्न महानुभावांकडून झाला आहे असें म्हणण्यास जागा आहे.

श्री. नेने यांनीं ' लीळाचरित्रा'ची प्रत महाराष्ट्राला मिळवून दिली हे त्यांचे मोठे उपकार होत. त्यांना या कार्यांत बरेच परिश्रम करावे लागले. कसेंहि करून संपूर्ण ' लीळाचरित्र ' महाराष्ट्राला त्यांनीं सादर केलें, याबद्दल ते स्तुतीस पात्र आहेत.

तरी पण शुद्ध पाठांच्या दृष्टीनें शास्त्रीय संशोधन होऊन सटीप अशा प्रतीची उणीव अजून कायमच आहे. प्रा. कोलते यांना ' श्रीचक्रधरचरित्र ' लिहितेवेळीं याची आवश्यकता विशेष भासली. व म्हणूनच " आपण स्वतः शुद्ध पाठांची एक प्रत तयार करणार आहोंत " असें त्या ग्रंथांत प्रा. कोलते यांनीं जाहीर केलें आहे. पण तशा प्रकारची शुद्ध प्रत येईपर्यंत आजच्या उपलब्ध ग्रंथावरच अवलंबून राहणें अनिवार्य आहे.

कानडीच्या मदतीनें उलगडा

' लीळाचरित्रां'तील वर्णनांचें व भाषेचें चांगलें आकलन व्हावयास कानडी भाषा व कानडी संस्कृतीचा परिचय जास्त असेल तितकें उत्तम असें मला वाटतें. नाहींतर पदोपदीं दुर्बोधता भोंवते. ' लीळाचरित्र ' पांचदहा वेळां वाचल्यानंतर कांहीं गोष्टी ध्यानांत येऊं लागल्या; तरी संपूर्णतया त्या कळत नाहींत त्या नाहींतच. मला जें उमगलें असें दिसलें त्यांतील कांहीं विचार चर्चेकरितां पुढें मांडीत आहे.

कानडीचें ज्ञान नसल्यानें शब्दार्थ लावण्यासारख्या साध्या गोष्टींत ही गोम कशी राहते हें दाखविण्यास दोन उदाहरणेंच घेऊं: (१) श्रीचक्रधरोक्त सूत्रपाटांत, 'सेवंतेयाचें आरल' असा एक प्रयोग आहे (आचारमालिका, सूत्र ११४). या वाक्यांतील ' आरल ' शब्दाचा अर्थ संपादकांनीं ' अग्र ' असा दिला आहे. (पान ८९). आरल किंवा आरळ (अरळ, अलर) म्हणजे अग्र नव्हे; फूल असा याचा अर्थ आहे. कंदमिळ भाषावर्गांत अरल् किंवा अरळु धातु असून त्याचा 'फुलणें' असा अर्थ आहे. ' आरल ' प्राचीन मराठी साहित्यिकांच्या चांगल्या परिचयाचा असावा असें म्हणण्यास जागा आहे. ' दासविश्रामा'च्या पुढील ओळी पाहा: " लाज्या लाह्या कीं लेण्या लाळू । **कानुडे तयासि वदती आरळु** । सिकता वाळु उसक्या उसबु वाळु । नदी तीर खड्या म्हणे कीं ॥ "। (महाराष्ट्र शब्दकोश) लाही म्हणजे फुललेली, फुलांसारखी असा लक्षणेनें अर्थ होतो. ' अरळी ' म्हणजे फुलवलेला – पिंजलेला कापूस. ' दासविश्रामा'नें आरळुचाच नव्हे, तर उसकु-(उसबु)चाहि अर्थ या कवितेंत सांगितला आहे. जुन्या मराठींतील आरळु, उसबुसारख्या प्रयोगांच्या अर्थाबद्दल शंका राहूं नये म्हणून 'दासविश्रामा'नें हे परिश्रम घेतले असावे. श्रीएकनाथांच्या ग्रंथांतहि 'आरळु'चा सुगंध येतो. ("शय्या घालुनी एकांतीं । **अरळ – सुमनांची** निगुति । ") श्री एकनाथांनीं ' अरळ – सुमन ' असा जोडशब्द वापरला आहे; भाषेंत या प्रकारचे भाषांतरयुक्त जोडशब्द

कसे पुढें येऊं लागतात याच्या अभ्यासाला वरील उदाहरणापासून बरीच मदत होणार आहे.

'लीळाचरित्रां'त एके ठिकाणीं (भाग १ पा. ११) 'पदन' शब्द वापरलेला आढळतो. 'पदन'चा अर्थ टीपेंत पद्धत, रीत असा दिला आहे. पण हा अर्थ तेथें बिलकुल जमत नाहीं. मराठींत पाउ, पाउलाजवळजवळ पदनचाच अर्थ आहे. याचें विवरण पुढें विस्तृतपणें येणार आहे.

कानडीवरून बोध होणाऱ्या गोष्टींमुळें मराठी भाषा व संस्कृतींतील बऱ्याच संदिग्ध प्रश्नांचा उलगडा होतो, हें खरें आहे. पण यामुळें मराठींत आढळणाऱ्या या भागांस 'कानडी' किंवा 'कानडीकडून घेतलेले' अथवा 'कानडीच्या प्रभावामुळें दिसून येणारे' असें आजपर्यंत मानलें जात होतें. पण याला धक्का देणाऱ्या गोष्टी 'लीळाचरित्रांत' मला बऱ्याच आढळून आल्या आहेत. मऱ्हाटींतील 'मुदल' 'मिरवणें' यासारखे शब्द जुन्या कानडी व तमिळइतके प्राचीन आहेत; तर कडपसारखी कांहीं शब्दरूपें जुन्या कानडी किंवा तमिळमध्यें आढळणाऱ्या त्याकुळींच्या शब्दाहूनही प्राचीन अशा प्राथमिक स्वरूपांत दृष्टोत्पत्तीस येतात. याचा थोडा उल्लेख 'मऱ्हाटी संस्कृतिः कांहीं समस्या' या पुस्तकांत आला आहे. तसेंच 'नवभारता'च्या (ऑगस्ट १९५३च्या) अंकांतील "कांहीं देशीय शब्दांची चर्चा : मराठी भाषेतिहासाच्या वाटेवर— " या लेखांत ही गोष्ट नमूद केली आहे.

जुन्या कानडीहूनही प्राचीन रूपें असणारा हा भाग मऱ्हाटींत कोठून आला, हा प्रश्न येथें संभवतो. याची चर्चा यथावकाश पुढें येईलच; पण थोडक्यांत त्याचा उल्लेख येथें करणें जरूर आहे. पट्टि > हट्टी जनांत कानडी व मराठी असे स्वतंत्र गट होण्यापूर्वींच्या बोलींतील ते अवशेष आहेत. याकरितां तो भाग हट्टि किंवा कौंतलींतील भाग होय. याचा हट्टि किंवा कौंतली अशा संयुक्तजनवाचक संकेतानें निर्देश केला नाहीं तर गैरसमजास बराच वाव मिळणार आहे.

यादवकालीन शिलालेख व ताम्रपट

व्यक्तींच्या नांवांचा अभ्यास जितका व्हावा तितक्या मोठ्या प्रमाणांत अजून आपल्याकडे झालेला नाहीं. केवळ शिलालेख किंवा साहित्यग्रंथांतील वर्णनांवरूनच आपल्या सांस्कृतिक इतिहासाचें पूर्ण आकलन होणें शक्य नाहीं. व्यक्तींच्या नांवापासून अनेक अज्ञात दालनांचे दरवाजे खुले होतात. डॉ. संकालिया यांनीं डेक्कन कॉलेज संशोधनशाळेतर्फे या दिशेनें कांहीं कार्य प्रारंभिलें आहे. या विषयाचें महत्त्व ते चांगलेंच जाणतात. या विषयीं लिहितेवेळीं ते म्हणतातः—

"...Personal names have a cultural significance, though usually these names, being proper names, are regarded non-connotative or having the least connotation. Very often they are significant names. The names may signify the religion or religious tendencies of the persons bearing the names or of the age; they may also signify the prevailing political and social conditions—customs and fashions - of the time... A future historian, writing about our own times, is sure to be struck by the great cultural divergence in names of boys and girls of the present generation and those of their fathers and mothers. And even if most of the material of our period perishes and only the names remain, he will be able to arrive at some conclusion regarding the cultural movements of our age". ('Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Gujarat' 1949; p. 5-6).

व्यक्तिनामांवरून कळून येणाऱ्या गोष्टी किती महत्त्वाच्या आहेत हें 'लीळाचरित्रां'तील कांहीं उदाहरणांवरून चांगलेंच स्पष्ट होणार आहे.

मल्लुगी (सिंघण I चा मुलगा); भिल्लम; मल्लुगीचा मुलगा; जैतुगी (दोघे झाले), बल्लाळ. सुमारें १२५० खि. श. च्या पुढें या प्रकाराहून निराळें वळण लागलेलें आढळतें. कृष्ण, महादेव, रामचंद्र, शंकर, भीम अशा प्रकारचीं नांवें राजघराण्यांत आलीं. तरी

पण महादेवरायाच्या मुलाचें नांव 'अम्मण' असें होतें; पूर्वपरंपरा एकाएकी नष्ट होत नसतात याचें हें प्रत्यंतर आहे.

राजघराण्यांतील नांवांप्रमाणें मंत्र्यांचीं नांवेंहि अभ्यसनीय आहेत : बाचिराज अथवा बाचणा (११६५ खि. श.); याचाच समकालीन गोनमरस; हेम्मणय्य नायक (सुमारें १३ वें खि. श.); जगद्दल-पुरुषोत्तम (१२४० कि. श); मल्लिशेट्टि (१२४७ कि. श); बिचणाचा पुत्र चौंडराज (१२५३ खि. श.); तिप्परस (१२६९ खि. श.); तिक्कम (१२७७ खि. श.); मल्लिदेव (१२९५ खि. श.) वगैरे.

सेऊण राजघराणें देवगिरींत होतें. तें खुद्द महाराष्ट्रां-तलें यामुळें त्या घराण्यांतील नांवांना तीं महाराष्ट्रांतील होत, असें म्हणणें सत्यास सोडून नाहीं. पण वरील महाप्रधान, सेनापति वगैरेंचीं नांवें सर्रास महाराष्ट्रांती-लच असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. कर्णाट-भागावर देवगिरिकरांचे प्रतिनिधी म्हणून तेथीलच कोणी गृहस्थ नेमले गेले असणें तितकेंच संभाव्य आहे.

' हेमाद्रि ' या नांवाचा उद्गम

तरी पण हेमाडपंडित किंवा हेमाद्रीसारखीं नांवें महाराष्ट्रमहोदयाच्या अग्रेसरांपैकीं कांहीं महाजनांचीं होतीं, हें विसरून चालत नाहीं.

हेमाद्रि या नांवाचा उद्गम व विकास फार बोधप्रद आहे. हेमाद्रीचें पर्यायनांव हेमाडपंडित असें आहे. हेमाडपंडित खरोखरच मोठे विद्याव्यासंगी व सनातन-धर्माभिमानी होते असें त्यांच्या नांवावर आढळणाऱ्या 'चतुर्वर्गचिंतामणि' वगैरेसारख्या महान् संस्कृत ग्रंथांवरून स्पष्ट दिसत आहे. देवगिरीदरबारीं हे महा-प्रधान होते, महानुभावांचे कट्टे द्वेष्टे होते, तरी मराठीची ध्वजा उंच फडकावण्याच्या कामीं यांची विधायक कामगिरी फार मोठी आहे. अशा या थोर व प्रतिष्ठित महाप्रधानाच्या 'हेमाड' या नांवांतील हेंगाडेपणा घालविण्याकरितां हेमाडाचें 'हेमाद्रि' असें रूपांतर झालें असावें असें दिसतें. कारण 'हेमाड' याचा मराठींतून कांहींच अर्थबोध होत नाहीं; आणि तत्कालीन मराठी अभिमानाला 'हेमाड' पेक्षां हेमाद्रि हें नांव परवडलें असल्यास नवल नाहीं. हेमाडचें संस्कृतीकरण होऊन 'हेमाद्रि' झालें; तरी महा-राष्ट्राच्या कानाला हेमाद्रि हें नांवहि आज कसेसेंच वाटल्याशिवाय रहात नाहीं.

आतां प्रश्न असा कीं ' हेमाड ' म्हणजे तरी काय ? हेमाड हा मराठी उच्चारांतील शब्द आहे. अप्प > आपा > आबा; नित्य > निच्च > नीच या प्रकारच्या द्वित्वयुक्त उच्चाराचे शब्द मराठी बोलींत जमत नाहींत; म्हणून त्यांत किंचित् फरक होवून हे शब्द भाषेंत रूढ होतात. 'हेमाड'चेंही तसेंच झालें आहे. हेमाडचें मूळ रूप ' हेम्माड ' असें आहे,

हेम्माड हा अर्वाचीन स्वरूपांतला शब्द झाला. याची पूर्वपीठिका बरीच प्राचीन आहे. जुन्या कानडींत ' हेम्माड ' शब्द निराळ्या स्वरूपांत आढळतो. पेर्माडि > पेम्माडि > हेम्माडि अशी ही परंपरा आहे. कौंतलींतील ही लकब ध्यानांत येण्यास जुन्या कानडींकडून बरीच मदत मिळणार आहे. प्राचीन शिलालेखांतून हा शब्द बऱ्याच ठिकाणीं आढळतो.

गंगराजाचा कि. श. ८७० च्या सुमाराचा एक शिलालेख प्रसिद्ध झाला आहे (Epigraphia Karnatica, Vol. III. Nj 75). त्यांत या शब्दाचीं दोन निरनिराळीं रूपें दृष्टीस पडतात. " सत्यवाक्य कोंगुणीवर्मा धर्ममहाराजाधिराजाच्या नंदगिरिनाथ श्रीमा (न् ?)...... राजमल्ल पेर्मान-डिगळ् " याचा उल्लेख येतो. याच शिलालेखांत पुढें (६ व्या ओळींत) ' पेर्माडि ' असा प्रयोगहि येतो.

राष्ट्रकूट कन्नरदेवाच्या वेळचा (कि. श. ९२२) लेख यांत राष्ट्रकूट कृष्णराजाच्या बहिणीचा नवरा पेर्म्माडि बूतार्य गंगराजाचें नांव येतें. (South Indian Inscriptions, p. 22; Historical Grammar of Old Kannada by Dr. Gaip. 208.)

पेर्म्माडि, पेर्म्मानडि अशा दोन स्वरूपांत हा शब्द प्राचीन लेखांतून वरचेवर येतो. या शब्दाचें औचित्य कळण्यास संस्कृत 'महापादाः' हा वाक्प्रचार ध्यानांत आणावा. अडि म्हणजे पाद. पिरि > पेर् म्हणजे मोठें, महान्. या वरून 'पेर्म्मानडि' किंवा 'पेर्म्माडि' हा शब्दप्रयोग महान्, थोर या अर्थी मोठ्या व्यक्तींच्या नांवापुढें लावीत असत हें उघड होत आहे. 'श्री-पाद' शब्दाप्रमाणें, हा सन्मानार्थक शब्दच पुढें व्यक्तिनामा-प्रमाणें वापरांत येऊं लागला. हेमाडपंडित हें नांव

या प्रकारचेंच एक उदाहरण आहे.

संस्कृतीकरण पावलेल्या हेमाद्रीचें मूळ हेम्माडि > पेर्माडि यांत असलेलें प्राचीन लेखांवरून निश्चितपणें आपणांस कळूं शकतें. पण महाराष्ट्र < मऱ्हाट > वऱ्हाट, यांवर प्रकाश पाडणारे शिलालेख किंवा ताम्रपट मिळणें अशक्यच असल्यानें मऱ्हाट-महाराष्ट्र-वऱ्हाडांतील सुसंगति जाणण्यास हेमाद्रीसारख्या नांवांच्या अभ्यासांत प्रत्ययास येणाऱ्या गोष्टींवरच भिस्त ठेवणें अनिवार्य झालें आहे.

एल्लम्मा अथवा रेणुकादेवीचा पंथ

'लीळाचरित्रां'त यल्हो किंवा एल्हो हें नांव बऱ्याच ठिकाणीं येतें. स्वरादि एकाराचे शब्द यकारादि लिहिण्याची प्रथा बऱ्याच ठिकाणीं आहे. पण शुद्ध रूप 'एल' होय. 'एल्हो' नांव बहुधा स्त्रियांचेंच असतें. कारण हें नांव देवीचें आहे. पण एल्होबाईप्रमाणें एल्हनभटहि 'लीळाचरित्रां'त भेटतात. (III ३६ व ५३ वगैरे). या नांवाची कांहीं मंडळी श्रीचक्रधरांचे शिष्य बनून कर्णाटांतून आली असावी असा तर्क करण्यास सकृत्-दर्शनीं जागा आहे. पण महानुभावांचे ग्रंथ चाळून पाहतां हें नांव त्या काळीं वऱ्हाडप्रांतींच रूढ होतें असें उघडकीस येतें. महाराष्ट्राची आद्य कवयित्री जी महदंबा तिच्या कनिष्ठ भगिनीचें नांव एल्हायी असें होतें ('विविधज्ञानविस्तार' १९२७ पा. २२१), असें प्रा. वा. न. देशपांडे यांनीं दिलेल्या महदंबेच्या वंशवृक्षावरून कळतें. 'लीळाचरित्रां'त निरनिराळ्या २-३ घराण्यांतील नांवांतून 'एल्हो' असलेलें उघडकीस येतें.

एल्हो हें नांव एल्लम्मा या नांवाच्या देवीवरून घेतलेलें आहे यांत वाद नाहीं. आपल्या कुलदेवताचें किंवा उपास्य देवतेचें नांव आपल्या घराण्यांतील मुलाबाळांना ठेवण्याची प्रथा या देशांत बरीच जुनी आहे. 'लीळाचरित्रा'वरून एल्हो हें नांव एकापेक्षां अधिक घराण्यांतून रूढ होतें असा पुरावा मिळत आहे. यावरून १३-१४ व्या शतकांपर्यंत यल्लमा ही वऱ्हाडांतील जनांची उपास्य देवता होती असें म्हणावें लागतें.

एल्लम्मा म्हणजे 'सर्वांची आई' (एल्ल=सर्व), जगदंबा. कर्णाटांत आजहि एल्लम्मा ही बहुजनसमाजाची कुलस्वामिनी आहे. बेळगांवजिल्ह्यांतील परशुगड-(सवदत्ती) जवळ या देवीचें मोठें क्षेत्र आहे. शिवाय उपक्षेत्रें जागोजाग बरींच आहेत. धारवाड जिल्ह्यांतील सवणूरजवळ मातापूर येथें एक रेणुकाक्षेत्र आहे. तेथेंहि एल्लम्माची यात्रा भरते.

'लीळाचरित्रां'त मातापूर (वऱ्हाडच्या परिसरांतील) क्षेत्राचा उल्लेख आहे. मातापूर या नांवावरूनच तें जगन्मातादेवीचें क्षेत्र आहे हें उघड होत आहे. आतां ही देवी कोणती, याचा उलगडा स्थानपोथी या महानुभाव क्षेत्रांचें वर्णन करणाऱ्या प्राचीन ग्रंथावरून होत आहे. मातापुरांत एकवीरा देवी मुख्य असून त्या ठिकाणीं जमदग्नि व परशुरामाचीं देऊळें आहेत, असें स्थानपोथींत नमूद आहे. श्रीचक्रधरांच्या प्रवासांत त्यांना मातापुराशिवाय दुसरीकडे लागलेल्या एकवीरेच्या देवळाची माहिती 'लीळाचरित्रां'त आहे. स्थानपोथींत दहा एकवीरेचीं ठिकाणें नमूद आहेत. 'लीळाचरित्रां'तच एकवीरा नांवाच्या एका बाईचा उल्लेखहि पण आहे. यावरून एल्हो या नांवाला शह देऊन एकवीरा हें नवें नांव पुढें येऊं पाहात असलेलीं चिन्हें दिसत आहेत. एल्हो हें नांव ४०-५० वर्षापूर्वींच्या मंडळींना जें दिले गेलें, तें बदलणें एकाएकी शक्य नव्हतें. पण या देवीचा निर्देश करतेवेळीं कोठें चुकूनहि एकवीरेला एल्लम्मा असें ग्रंथकारानें लिहिलेलें नाहीं. मातापूर गांवाच्या नांवांत तें कोणत्या देवीवरून आलें याचा बोध होत नसला तरी 'एळौर' एळापूर आधुनिक वेरूळ ऊर्फ एल्लोरा या ग्रामनामांत एल्लूर किंवा एल्लापुराचा ध्वनि कानीं पडतो.

एल्लम्मा हें नांव कर्णाटकांत सुद्धां ब्राह्मणवर्गांत विशेष रूढ नाहीं. एल्लप्पा नांवाचा ब्राह्मण क्वचित् आढळतो; पण एल्लम्मा नांवाची बाई त्याहूनहि विरळा. ब्राह्मण या देवीला रेणुका किंवा एकवीरा या नांवानेंच मुख्यतः ओळखतो. 'एकवीरा' म्हणण्यांत, ब्राह्मणवर्गाची आपल्यावर उपकार करणाऱ्या परशुरामाची माता म्हणून, तिजविषयीं कृतज्ञता व्यक्त होत असावी असें वाटतें. 'लीळाचरित्रां'तील एल्हो नांव ब्राह्मणघराण्यांतील स्त्रीपुरुषांचें आहे, ही गोष्ट विशेष चिंत्य आहे.

एल्लम्मापंथांत तिच्या पतीच्या नांवाला विशेष महत्त्व दिसत नाहीं; पण परशुरामाचें नांव एकवीरा एल्लम्माबरोबर येतेंच. 'लीळाचरित्रां'त परसैया, परशराम नांवाचे गृहस्थ आहेत. एकाइ, जोगाइ नांवाच्या स्त्रिया एल्लम्मापंथाचा महिमा दर्शवितात.

एल्लम्मा क्षेत्राला एकाई, जोगाई या नांवानें ' उदो ' ' उदो ' करीत भक्तजनसमूह चालतांना आजहि पाहावयास मिळेल.

एल्हणेश्वर नांवाच्या देवळाचा उल्लेख येतो. एल्हणेश्वर हें शिवालय असावें यांत शंका नाहीं. पण शिवालयाचें एल्हणेश्वर हें नांव पर्यायानें तत्कालीन वऱ्हाडांतील एल्लम्माचा महिमाच दर्शवीत आहे. श्रीमंत सुखवस्तू गृहस्थ एकादें देऊळ बांधून त्यांत स्थापिलेल्या देवाला आपलें नांव जोडून देत असत. या प्रकारच्या कांहीं घटनांचा उल्लेख ' लीळाचरित्रां'त येतो. बैजाई नांवाच्या राणीनें असेंच एक शिवालय स्थापिलें असल्याचें एका लीळेंत वर्णन आहे. प्रस्तुत एल्हणेश्वर या देवळाच्या निर्मितीस कारण झालेला कोणी एक एल्हण (= एल्लणा) हा एक सुखी श्रीमंत गृहस्थ वऱ्याच दिवसांपूर्वी होऊन गेला. त्यानें बांधलेल्या या एल्हणेश्वराच्या देउळाचा उल्लेख ' लीळाचरित्रां'त येतो; यावरून सामान्य जनांची देवता एल्लम्मा ही वऱ्हाडांत श्रीमंतांची व प्रतिष्ठित ब्राह्मणवर्गाची कुलदेवता किंवा इष्टदेवता झाली होती हें स्पष्ट होत आहे.

वऱ्हाड-खानदेशकडे पूर्वी रेणुका किंवा एकवीरादेवी एल्लम्मा या नांवानेंच पूजा घेत होती, ही गोष्ट कोणत्याहि शिलालेखांत आपणांस आढळण्याचा संभव फारच क्वचित् आहे; पण व्यक्तिनामांच्या अभ्यासांत, अशा बारीक, पण सांस्कृतिक दृष्टीनें अत्यंत महत्त्वाच्या गोष्टींची खातरजमा पटते.

आमाण किंवा अम्मण

देवगिरीच्या महादेवराय नांवाच्या राजाला एक मुलगा होता. त्याचें नांव आमणदेव असें होतें.

हेमाड < हेम्माडप्रमाणें आमण < **अम्मण** असें याचें मूळ रूप होय. अम्मण यांत दोन शब्द आहेत. अम्म + अण, ' अण ' हें अण्ण या सन्मानार्थक शब्दाचें संक्षेपरूप होय.

अम्म शब्द संस्कृत ' अम्ब ' पासून निष्पन्न झाला आहे. अम्ब > अम्म हा तद्भव शब्द घडण्यास जी विशिष्ट उच्चारपद्धति कारण झाली ती लक्षांत घेतल्यास, या प्रकारचीं तद्भव रूपें कोणत्या विशिष्ट जनभाषेंतून निर्माण झालीं असावींत याचा अंदाज करतां येणें शक्य आहे. पण तो प्रश्न येथें प्रस्तुत नाहीं. ' अम्ब ', अम्बा हें स्त्रीवाचक नांव असून पुरुषांना कसें आलें, हा प्रश्न फार कुतूहलजनक आहे.

एल्हो हें नांव स्त्री व पुरुषांस ठेवलेलें 'लीळाचरित्रां'त आढळतें. तोच प्रकार ' अम्म ' या नांवांतही घडलेला आहे. कर्णाटकांत देवीला ' अम्मनवरु ' म्हणण्याचा प्रघात आहे. अम्म < अव < **आवा** < **आउ**; शेवटचीं दोन रूपें मराठींत आजहि आढळतील. अव्वे, अव्वे हीं स्त्रियांचीं नांवें ५–७ व्या शतकापासून लेखांतून आढळतात. पंप व रन्न कवींनीं अम्म शब्द पुल्लिंगी वापरलेला आढळतो. द्रोणाचार्यांना सन्मानानें ' अम्म ' असें म्हटलेलें रन्नकवीच्या काव्यांत दिसून येतें. संस्कृत ' तात ' सारखा तो वडील या अर्थी शब्द वापरलेला दिसतो. पण तो शद्ब मुळांत पुल्लिंगी नव्हे; माता या अर्थाचा अंब या संस्कृत शद्बापासून निष्पन्न झालेला आहे.

पुरुषांना स्त्रियांच्या नांवानें ओळखण्याच्या या प्रकारांत ही रीत मुळांत मातृप्रधान कुटुंबपद्धतीची असल्याची सूचना तर मिळत नसेल ना ? स्त्री आणि पुरुषांच्या नांवांत अजून विशेष फरक नसलेला कर्णाटकांतील कांही समाजांत पहावयास मिळतो. पुरुष माळप्पा तर त्याची स्त्री माळव्वा – अशा प्रकारें नवराबायको या दोघांच्या नांवांत साम्य असणारीं पतिपत्नींचीं नांवेंहि आढळतात.

महानुभावपंथाच्या पूर्वीच्या आचार्यांपैकीं बारुदव भट हें नांवहि या प्रसंगीं चिंत्य आहे.

आजच्या महाराष्ट्रांत एल्होपंत किंवा एल्लुताई ब्राह्मणवर्गांतच काय प्रतिष्ठित मराठ्यांतहि किती आढळतील याची शंका आहे. बारुदेव तर शोधून काढण्यांत बहुतेक निराशाच पदरीं येईल असें वाटतें.

' लीळाचरित्रां'त देमती किंवा देमाई या नांवाच्या स्त्रीचा उल्लेख आहे. (II. ११; III. २१; V.१३८). कर्णाटांत देमप्पा व देमव्वा अशीं नांवें आढळतात; पण ब्राह्मणांत माझ्या ऐकण्यांत हीं नांवें आलीं नाहींत. देवराव पुष्कळ आहेत. पण 'लीळाचरित्रां'तील देमाई ही बाई ब्राह्मणज्ञातींतील असावी असें दिसतें. विजयनगरच्या देवरायनामक राजाच्या एका राणीचें नांव देमती असें होतें. पति व पत्नीचें नांव जवळजवळ एकच असतें असें जें वर उल्लेखिलें आहे, त्याला देवराय व देमती हें आणखी एक उदाहरण होय.

कर्णाटांत ' देमव्वा ' ही ग्रामदेवता आहे. आजहि खेडोपाडीं ही देवी पाहण्यास मिळेल. देमव्वाची दुसरी बहीण दुर्गव्वा. या दोनही देवी एकाच वेळीं पूजिल्या जातात. सांर्थीच्या आजारांना आपल्या गावांत थारा मिळूं नये याकरितां या देवीचा मोठा उत्सव केला जातो. देमव्वा व दुर्गव्वांच्या लाकडी मूर्तीची स्थापना करून मोठी जत्रा भरत असते. देमव्वाला लालभडक रंग तर दुर्गव्वाला हिरवागार रंग लावलेला असतो. या रंगांच्या संकेताचें रहस्य काय असावें वगैरे गोष्टींत शिरणें येथें अप्रस्तुत होय.

' लीळाचरित्रां'तील देमाई नांवावरून त्या काळा-पर्यंत (१३ व्या शतकापर्यंत) वऱ्हाडप्रांतीं देमाई देवी तेथील जनांकडून मान्यता मिळवीत होती असें म्हणणें अवास्तव होणार नाहीं.

यादवकाळापर्यंत एल्लम्मा, देमव्वा, अम्मा > अंबा (= देवी) महाराष्ट्रांतील दैवतें होतीं असें विधान करण्यास वरील प्रकारचीं व्यक्तिनामें आपणांस भाग पाडीत नाहींत काय ?

'लीळाचरित्रां'तील ' आलेया ' हें नांव अभ्यसनीय आहे. "एल्हो : स्नाकरी जाए : गेली : आंघोळी केली: माळियातें म्हणीतलें : आलेया : कांहीं वाया देया कां " (III. ३६). या वर्णनावरून. 'आलेया' हें नांव एका माळ्याचें होतें असें स्पष्ट होत आहे.

दुसऱ्या एका लीळेंत ' आलेया ' नांवाचा शेतकरी भेटतो. ' मग साधे (एल्होचें टोपण नांव) शेतकरी-यापासी गेली ' आणि ' आलेया चणादे कां ' (V. १४१) तिनें अशी विनंति केली.

ब्राह्मण ' आलया ' सुद्धां त्याकाळीं वऱ्हाडांत होते ! एल्हो श्रीचक्रधरांच्या दर्शनास निघाली; वाटेंत तिनें " ती रुवाचे गहुं दळिये घेतले : तीं रुवाचे तिनिगुळ-भेले घेतले : एतें असतिः तंव तन्हैलीः एका ब्राह्मणाचे या घरां पाणी पेयावेया गेली. आलेया पाणी पेवों सुवाः तिया पाणी पेयावेया सूदले : " (V. १४३).

यादवकाळीं 'आलेया' हें नांव वऱ्हाडांतील समाजा-च्या सर्व थरांतून रूढ असलेलें दिसून येत आहे.

तेराव्या शतकांत गुजराथेंतहि हें नांव बऱ्याच प्रति-ष्ठित वर्गांतून रूढ असलेलें त्या काळच्या लेखांवरून स्पष्ट होत आहे. पुरुषांत आल्ह, आल्हण व आल्हा हीं नांवें (क्रि. श. १२३१) वाण्यांत आढळतात. राजघराण्यांतील एका स्त्रीचें नांव आल्हणदेवी असें होतें (क्रि. १२१०) (' Studies in the Historical and Cultural Geography and Ethnography of Gujarat; pp. 205; 206.)

कर्णाटांत ११६० क्रि. शकाच्या सुमारास लिंग-पंथाची चळवळ फार जोरांत होऊन गेली. या पंथाचा नेता म्हणून अल्लय्या किंवा अल्लमप्रभूचें नांव विशेष विख्यात आहे. यापूर्वींहि ' अल्ल ' नांव रूढ असावें. अल्लमप्रभु हा लिंगपंथाचा प्रवर्तक म्हणून समजला जात असला तरी हा योगमार्गांतील एक गुरुहि गणला जात असे. ' हठयोगप्रदीपिकें'त मत्स्येंद्रगोरखां-च्या यादींत अल्लमप्रभूचें नांवहि गुरुपरंपरेंत नमूद आहे. गुजरात व महाराष्ट्रांत अल्लमप्रभु हा लिंगपंथीय गुरु या नात्यानें प्रसिद्ध असण्यापेक्षां शैवसंप्रदायी एक मोठा योगी म्हणून नांवाजलेला असणें शक्य आहे.

या योगी अल्लमाच्या कीर्ति-प्रभावाचे पडसाद एक-नाथांचे गुरु जनार्दनस्वामींच्या वेळेपर्यंत कानीं पड-तात. श्रीजनार्दनस्वामींना अवलियारूपानें अल्लमानें दत्तस्वरूपांत दर्शन दिलें, अशी एक आख्यायिका आहे. 'महाराष्ट्रसारस्वतां'त श्री. वि. ल. भावे यांनीं ती नमूदहि केली आहे.

यादवकाळीं वऱ्हाडांत गांवोगांवीं लिंगाचीं देउळें होतीं असें स्थानपोथीवरून कळतें. श्रीचक्रधरांनीं ' शूद्रवेप ' घेऊन केलेली लीला या दृष्टीनें महत्त्वाची आहे. लिंगपंथीय जंगम गुरूंचें अनुकरण करून दाख-वलेलें तें वर्णन आहे (V. २३२). " सोरटी सोम-नाथु : आवंढें नागनाथु : परळी वैजनाथुः " वगैरे " सहस्रलिंगा : कोडिलिंगा : एक दंडवत " असें म्हणत हिंडणारे जंगम आजहि कर्णाटांत दिसतील. स्थलनामावरून गुजराथेंतही १३ व्या शतकांत लिंगाचीं देउळें व त्यांचे शैवपंथ विशेष प्रचारांत होते असें डॉ. संकालिया यांनीं अनुमान केलें आहे.

या शैव लिंगपंथाच्या चळवळीच्या आघाडीवर श्रीअल्लमादि कांहीं कर्णाटकीय प्रमुख होते. ओहिलय्या नांवाचा गुजरातेकडील वीरशिवभक्त होऊन गेल्याचें तत्कालीन इतिहासांत नमूद आहे. वऱ्हाडांतहि या लिंगपंथाची चळवळ खोलपर्यंत पसरली होती असें

निदर्शनास आणणारीं कांहीं व्यक्तिनामें 'लीळाचरित्रां'त आढळतात.

सांगेया हें नांव एक अशांपैकीं आहे. एका लीळेंत सांगेया नावाचा एक 'गोरूवे' राखणारा मुलगा येतो. (I. २६). शैव कुणब्यांत हें नांव आजहि कर्णाटांत रूढ आहे. संगमेश्वर हें नांव आज महाराष्ट्रांत कोठें प्रचारांत आहे किंवा नाहीं याची निश्चित माहिती कळत नाहीं. पण आलेया, सांगेया या नांवांतील शेवटचें 'एया' उपपद महाराष्ट्रांत रूढ नसावें असें म्हणण्यास हरकत नाहीं. 'एया' हें 'अय्या' या शब्दाचें मराठी रूप होय. संस्कृत आर्य शब्दापासून अय्य, अय्या- एया हा शब्द निष्पन्न झाला आहे.

'लीळाचरित्रां'त इंद्रंभटासारख्या ब्राह्मणालाहि इंद्रेया असे संबोधिलेलें आहे. पससेया, इंद्रेया या प्रकारच्या उदाहरणांवरून वऱ्हाडांतहि पूर्वी शैव ब्राह्मणांत नांवापुढें अय्य–एया हें उपपद लावीत होतें हें निश्चित होतें. दक्षिणेंत ही प्रथा आजहि चालू आहे. पण महाराष्ट्र व उत्तरकर्नाटक या भागांत 'अय्या' हें उपपद लिंगवंतधर्मपंथाची मंडळी आपलें वैशिष्ट्य असें मानूं लागल्यामुळें ब्राह्मणांतून 'अय्य' हे उपपद मागें पडलें. पण म्हैसूर, दक्षिण कन्नड, कोडगु भागांत चिंदबरय्या, रामय्यासारखीं नांवें ब्राह्मणांत आढळतील. तमिळ देशांतील 'अय्यर्' शब्द 'अय्य' याचें बहुवचनान्त रूप होय. 'अय्यर्' हे तमिळ शैव ब्राह्मण आहेत.

सन्मानार्थ उपपदें

महाराष्ट्रीय नांवांतील वैशिष्ट्य दाखविणारीं उपपदें आज निराळीं स्वतंत्र आहेत. पंत, राव, जी यांसारखीं उपपदें नांवापुढें असलीं कीं तीं महाराष्ट्रीय नांवें आहेत, असें अनुमान काढण्यास हरकत नाहीं.

आजचा 'राव' शब्द जुन्याकाळीं 'राय' अशा स्वरूपांत रूढ होता. राज > राय > राव. 'राय' आजहि कर्णाटांत रूढ आहे; चाउंडराय वगैरे प्राचीन नांवावरून कानडींत ६–७ व्या शतकाइतकी याची जुनी परंपरा आहे. राव किंवा राय आज ब्राह्मणांच्या नांवापुढेंच मुख्यतः दिसलें तरी प्राचीन काळीं राजघराण्यांत हें नांव वापरणें प्रथम रूढ होऊन नंतर महाप्रधानादिकांत रूढ होत आलें.

अप्पा – अप्पासाहेबसारख्या कांहीं नावांतून अप्पा या टोपणनांवांवाचून राम, गोविंद वगैरे सारख्या नांवापुढें अप्पा सन्मानार्थी लावण्याचा प्रघात महाराष्ट्रांत आज कोठेंच नसेल.

'लीळाचरित्रां'त आपदेवभट येतो. अप्पाभट या आधुनिक नांवासारखें तें असावें. वळियेपा नांवाचा गौळी एका लीळेंत भेटतो. वळियेपा यांतील 'एपा' हें अप्पा याचेंच मराठी रूप आहे. अप्पा असें उपपद गौळी वगैरे वर्गांत त्या काळीं रूढ असावें असें दिसतें.

अम – भिल्लम-गुंडमसारख्या प्रमुख विख्यात नांवांतून आढळणारें सन्मानार्थी उपपद १३ व्या शतकापर्यंत महाराष्ट्रांत मोठ्या मर्यादेचें असें समजलें जात होतें यांत शंका नाहीं.

अम हें अम्म या शब्दाचें मराठी उच्चारांतील रूप होय. 'अम्म' विषयीं यापूर्वी चर्चा झाली आहे.

अण – विल्हण–नागणासारख्या नांवांतून शेवटीं आढळणारा 'अण' शब्द अण्ण याचेंच संक्षेपरूप होय. 'लीळाचरित्रां'त चक्रधरांचे पट्टशिष्य नागदेवाचार्य याला मोठ्या प्रेमानें हाक मारतेवेळीं 'नागणा' असें संबोधिलेलें आढळेल. पण आज महाराष्ट्रांत ही रूढि मागें पडली आहे. अण्णंभट, अण्णाराव यासारख्या नांवांतून हा शब्द कांहीं ठिकाणीं कानीं पडतो. 'आणो' नांवाची व्यक्ति 'लीळाचरित्रां'तहि आहे.

'लीळाचरित्रां'त व ज्ञानेश्वरींत बऱ्याच ठिकाणीं वाक्याच्या शेवटीं बा, पा, मा सारखे शब्द वापरलेले आढळतात. मोठ्या प्रेमळ व आत्मीयतेच्या संभाषणांतून बोलण्याच्या वेळीं 'असें होत नाहीं का, बाबा ?' अशा प्रकारें बाबासारखे शब्द शेवटीं घालण्याचा प्रघात आजहि रूढ आहे. ज्ञानेश्वरींतील 'बा' चें 'a term of addressing a man' असें स्पष्टीकरण डॉ. मु. गं. पानसे यांनीं दिलें आहे. ('Linguistic Peculiarities of Jnaneshwari, p. 457). पण तेच 'पा' विषयीं तें पादपूरणार्थ अव्यय ('an expletive particle') असें मानतात. 'मा' चें स्पष्टीकरण करतेवेळीं पादपूरणार्थक व सार्थ असलेले दोनहि प्रकारचे प्रयोग त्यांच्या नजरेस आल्याचें दिसते [मा, मां (ind.) then, therefore or moreover, again, although, even then; it is used as an interrogative and expletive; p. 412).

व्यवहारांत नित्य रूढीनें झिजून, निरर्थक बनून मोडक्यातोडक्या स्वरूपांतील शब्द ' अव्यय ' स्वरूपांत भाषेंत आढळतात. पण प्रारंभापासून ते तसे नसून सार्थ पूर्ण शब्द असतात. अप्पा > अपा > पा, अप्पा > आपा > आबा > बा; अम्मा > आमा > मा याप्रमाणें पा, बा व मा या आज पादपूरणार्थ वाटणाऱ्या शब्दांची निष्पत्ति झाली आहे. इंग्रजींत प्रत्येक वाक्यागणिक ' you see ' म्हटल्याशिवाय पुढे बोलताच न येणारे प्रघात आहेत. ज्ञानेश्वरींतील याचप्रकारच्या यादींत ' गा ' चाहि समावेश होतो. कानडींत अको > अगो हा शब्द वापरला जातो. या अगोचा पडसाद ' गा ' त ऐकू येत आहे. आधुनिक व्यवहारबोलींत ' अका नानु हेलिद्दे अल्ल ? ' — " अगा किंवा गा, मी सांगितलें नव्हतें काय ? " यासारख्या वाक्यांतून हा प्रकार ऐकावयास मिळतो.

द्विभाषाज्ञान प्रचलित होतें

शितावरून भाताची परीक्षा या म्हणीप्रमाणें वरील व्यक्तिनामें १३ व्या शतकांतील महाराष्ट्र-(तोहि पैठण केंद्राचा अस्सल गाभा असलेल्या)-समाजाचें ओझरतें दर्शन घडवीत नाहींत काय ? ' लीळाचरित्र'कारांनीं नमूद करून ठेवलेला आधुनिक पद्धतीचा हा एक ' sample survey ' च नाहीं काय ?

या वरील प्रकारच्या नांवावरून गोदावरीच्या उत्तर-भागांत महाराष्ट्रीय समाज अजून पूर्णपणें महाराष्ट्रीय बनला नव्हता, त्याचें मराठीकरण जोरांत चालू होतें असें अनुमान करण्यास जागा आहे. महादेवराय व रामचंद्र-रायादिकांच्या वेळीं हा प्रयत्न योजनापूर्वक चालल्याचें हेमाडपंडिताच्या चरित्रावरून कळून येतें. महानुभावीय महात्म्यांनीं यापूर्वींच मराठीची गुढी उभी करण्याचा संकल्प केलेला सुप्रसिद्ध आहे.

अशा प्रकारचे जागृत प्रयत्न चालू असल्यावेळच्या काळांतील हीं नांवें ' लीळाचरित्रां'त आपणांस उपलब्ध होत आहेत. अशा प्रकारची ही पार्श्वभूमि लक्षांत घेतली असतां, या प्रदेशांत या काळीं " it implies a certain amount of bilingulism - at least for a time " असें तुलनात्मक भाषा-शास्त्रांच्या अभ्यास करणाऱ्यांच्या भाषेंत म्हणावयास हरकत दिसत नाहीं. मराठीभाषेच्या पृथक्करणांत या गोष्टीला भक्कम पुरावा मिळत आहे. श्री. चिं. गं. कर्वे व श्री. दाते यांनीं तयार केलेल्या ' महाराष्ट्रशब्दकोशां'-तील अनेक शब्दांच्या व्युत्पत्त्या त्याचप्रमाणें प्रा. कृ. पां. कुलकर्णींच्या ' व्युत्पत्तिकोशां'तील व्युत्पत्त्यांवरून ही गोष्ट उघडकीस येत आहे.

एल्हो वगैरे हीं नांवें वऱ्हाडांत बाहेरून आलीं असें म्हणतां येईल काय ? तसें झालें तर लखियब्बा, धाडि-यप्पा, आमण यांसारख्या राजघराण्यांतील नांवापासून संगेया, बळिवेपा यांसारख्या खेडूतांपर्यंत समाजाच्या उभ्या-आडव्या सर्व विभागांतूनहि बाहेरचीं अर्थात् " परकीय " नांवें आलीं असें विधान करावें लागणार आहे ! मुसलमानांचा व नंतर पाश्चिमात्यांचा इतका संबंध आला. पण समाजाच्या सर्व थरांतून तीं नांवें पसरलेलीं दिसत नाहीं. लीलासारखें नांव ' लिली ' वरून आलें असें म्हणावें हवें तर; पण सुलताना किंवा मेरी नांवाला हिंदु स्त्रियांत प्रतिष्ठित असें स्थान मिळाल्याचें दिसत नाहीं. " परकीय " म्हणाव-याचें झाल्यास या प्रकारच्या नांवांची परंपरा देवगिरी-यादवांच्या उदयापासूनच असलेली दिसते; व पुढें शेवटच्या २ – ३ राजांच्या वेळीं या परंपरेला कलाटणी मिळाली. गुंडमप्रभू गोविंदप्रभू बनतात; हेमाडी हेमाद्रि होतात.

ही परंपरा किती प्राचीन असावी, असा एक महत्त्वाचा मुद्दा येथें डोकें वर काढीत आहे. माझ्या मतें, मराठी भाषा जितकी प्राचीन तितकी ही परंपरा-हि प्राचीन होय. मराठी भाषेंतील मिरवणें, नडणें, तुंबणें, विरणें यासारखे धातू व श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांनीं म्हटल्याप्रमाणें अवयववाचक व आप्तसंबंधी शब्द कानडी व मराठी भाषेंत सारखे आहेत, ही गोष्ट जोंपर्यंत खोटी किंवा निराधार अशी ठरत नाहीं तों-पर्यंत मराठी भाषेच्या जन्मकाळींच या दोन्हींहि जनांचा निकट संबंध होता, ही गोष्ट कोणालाहि कबूल करावी लागणार आहे. तुलनात्मक भाषाशास्त्राचा याला पुरेपूर पाठिंबा आहे.

केवळ व्यक्तिनामांच्या आधारेंच केलेला हा तर्क नव्हे; तर याला लीळाचरित्रांतील ग्रामनामांचाहि पण पाठिंबा कसा मिळत आहे हें पुढील लेखांत पाहूं.

आचार्य शं. द. जावडेकर

भूदान - आंदोलन आणि सत्याग्रही समाजवाद

भारताला स्वातंत्र्य प्राप्त झाल्यानंतर येथील जनतेंत निर्माण झालेली सत्याग्रही शक्ति सामाजिक क्रांतीच्या रूपानें प्रकट होईल आणि तिच्या प्रभावानें येथें समाजवादी क्रान्ति घडून येईल हा विचार म. गांधींच्या लेखांतून व भाषणांतून अनेकवार प्रकट झालेला होता. तथापि, गांधीजींच्या निधनानंतर ही घटना कशी घडून येणार आणि सत्याग्रही शक्तीला समाजवादी आंदोलनाचें स्वरूप कसें व कोणाकडून दिलें जाणार याबद्दल कांहीं काळ सर्वत्र अंधार पसरल्यासारखें दिसत होतें. आचार्य विनोबा यांनीं भूदानयज्ञाचें आंदोलन सुरू केल्याबरोबर सर्वत्र पसरलेला हा अंधार एकदम नाहींसा होऊं लागला आणि खेड्यापाड्यांत पसरलेल्या जनतेमध्य एक नवें चैतन्य संचार करीत असल्याचें दिसूं लागलें. स्वातंत्र्यसंग्रामाच्या काळांत लोकांतील त्यागबुद्धीला आणि समाजनिष्ठेला ज्या प्रकारचें आवाहन दिलें जात होतें व ज्या आवाहनामुळें ती त्यागबुद्धि समाजनिष्ठेच्या रूपानें प्रकट होत होती त्या प्रकारचें आवाहन विनोबांनीं दिलें आणि ही त्यागबुद्धि भू-दानाच्या रूपानें प्रकट होऊं लागली. कांहीं थोडे लोक का होईनात पण आपल्या मालकीची जमीन समाजांतील बेकारीचें व विषमतेचें समूल उच्चाटन करण्याच्या कार्यासाठीं अर्पण करूं लागले. अशा रीतीनें आर्थिक विषमतेच्या निर्मूलनाचा यज्ञ सुरू झाला. हळूं हळूं या यज्ञाचें स्वरूप आणि साध्य विशद होऊं लागलें ही केवळ आर्थिक विषमतेच्या यातना सुसह्य करण्यासाठीं चालूं झालेली चळवळ नसून त्या विषमतेचें पूर्ण निर्मूलन करून जमीनीवरील स्वामित्वाचा हक्क नष्ट करण्यासाठीं व नवी समाजरचना निर्माण करण्यासाठीं सुरूं झालेली ही चळवळ आहे अशी घोषणा विनोबांनीं केल्याबरोबर भारतांत समाजवादी क्रांति घडवून आणण्याची उत्कंठा बाळगणारे श्री. जयप्रकाश यांच्यासारखे क्रांतिकारक या आंदोलनांत वेगानें ओढले गेले. हळूं हळूं हें आंदोलन केवळ जमीनीवरीलच स्वामित्व संपुष्टांत आणणारें नसून सर्वच संपत्तीचें स्वामित्व परमेश्वराचें आहे व आपण सर्व त्या परमेश्वराचे सेवक आहोंत या भूमिकेवर नवी समाजरचना उभारण्यासाठीं हें आंदोलन सुरूं झालेलें आहे, अशी घोषणा विनोबांनीं केली. त्याबरोबर श्री. जयप्रकाश यांच्या मागोमाग त्यांचा सर्व समाजवादी पक्ष या आंदोलनास पाठिंबा देण्यास पुढें सरसावला आणि आचार्य कृपलानी यांनीं गांधीवादी विचारसरणीवर भारतांत सामाजिक क्रांति घडवून आणण्याच्या उद्देशानें जो एक नवा पक्ष स्थापन केला होता तोहि या आंदोलनाच्या प्रभावानें समाजवादी पक्षांत विलीन होऊन त्या दोघांचा एक नवा **प्रजा-समाजवादी पक्ष** निर्माण झाला. या पक्षानें भू-दानयज्ञाच्या आंदोलनाचें क्रां ति का र क स्वरूप ओळखून त्याला आतां अधिकृत मान्यता दिलेली आहे.

देशांतील सत्ताधारी कॉंग्रेसपक्षानें सुद्धां या आंदोलनास आपला नैतिक पाठिंबा दिलेला असून संपत्तीचें स्वामित्व व्यक्तींचें नसून समाजाचें आहे अशा विचाराची सामाजिक क्रान्ति घडून येण्याची आवश्यकता त्या पक्षानेंहि मान्य केली आहे. कॉंग्रेस पक्ष व प्रजासमाजवादी पक्ष या दोन राजकीय पक्षांप्रमाणेंच जो कोणत्याहि राजकीय पक्षांत सामील न होतां जनतेची विधायक सेवा करणारा लोकसेवक वर्ग आहे, तो तर आचार्य विनोबांच्या या यज्ञकार्यांत प्रथमपासूनच सामील झालेला आहे. भारतीय स्वातंत्र्याच्या सत्याग्रहसंग्रामांत या तीन शक्ती सहकार्यानें भाग घेत होत्या. त्याचप्रमाणें त्या शक्ती आज भू-दानयज्ञाला पाठिंबा देण्याच्या निमित्तानें सामाजिक क्रांतीच्या कार्यांत एकत्र गोविल्या जात आहेत. आणि त्यांपैकीं प्रत्येक शक्ति हें कार्य आपलें आहे असें म्हणून त्याचा प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करीत आहे.

या लेखाचा हिन्दी अनुवाद 'सर्वोदया'च्या गेल्या मार्चच्या अंकांत प्रसिद्ध झाला आहे.— का. सं.

सत्याग्रह, लोकशाही आणि समाजवाद

गेल्या तीन शतकांत युरोपखंडांत लोकशाही आणि समाजवाद या सामाजिक ध्येयांचा उदय झाला आणि त्या ध्येयांच्या प्रेरणेनें व उपासनेनें आधुनिक युरोपीय संस्कृतीला एक प्रभावी आणि प्रगतिपर स्वरूप प्राप्त झालें. सतराव्या शतकापासूनचा युरोपखंडाचा इतिहास हा लोकशाही व समाजवाद या दोन ध्येयांच्या संस्थापनेसाठीं केलेल्या प्रयत्नांचा इतिहास होय, असें म्हटल्यास तें बरेंचसें यथार्थ होईल. या दोनहि ध्येयांचा मूळ उगम ख्रिस्ताच्या सत्यनिष्ठेंत व अहिंसा-वृत्तींत आढळतो असें प्रतिपादन करणारे अनेक विचारवंत व धर्मनिष्ठ लोक या काळांत युरोपांत होऊन गेले. मात्र ख्रिस्ताच्या जीवननिष्ठेंतून लोकशाही व समाजवाद या ध्येयांची प्रेरणा ज्यांनीं घेतली, त्यांनीं त्या ध्येयांच्या संस्थापनेसाठीं ख्रिस्तानें उपदेशिलेल्या अहिंसक मार्गाचा उपयोग केला नाहीं. यामुळें या ध्येयांनीं प्रेरित होऊन केलेल्या प्रयत्नांतून खरी लोकशाही व खरा समाजवाद यांचा उदय न होतां लोकशाहीला धनिकशाहीचें आणि समाजवादाला हुकूमशाहीचें स्वरूप प्राप्त झालें. युरोपीय लोकशाही धनिकशाहीच्या आहारीं गेल्यामुळें तिच्यांतून साम्राज्य-शाहीचा उदय झाला. आणि समाजवादी क्रांतीनें हिंसक साधनाचा अवलंब केल्यामुळें हुकुमशाही-चें सर्वंकष स्वरूप तिला प्राप्त झालें. यामुळें आधुनिक युरोपांत निर्माण झालेल्या संस्कृतीचीं दोन शकलें पडलेलीं आज दिसत आहेत. आणि त्यांच्या संघर्षांतून युरोपीय संस्कृतीची राखरांगोळी होत आहे.

आधुनिक युरोपीय संस्कृतीचा हा इतिहास लक्षांत घेऊनच महात्मा गांधींनीं लोकशाही व समाजवाद यांच्या संस्थापनेसाठीं कराव्या लागणाऱ्या क्रांतीचा अहिंसक मार्ग सत्याग्रहाच्या रूपानें शोधून काढिला. सत्याग्रह हा एक सामाजिक क्रान्तीचा मार्ग आहे आणि या सामाजिक क्रांतीचें उद्दिष्ट मानव-समाजांत सत्ययुगाची संस्थापना करणें हें आहे असें म. गांधींनीं अनेकवार प्रतिपादन केलें होतें. त्याचप्रमाणें या अभि-प्रेत सामाजिक क्रान्तीचें स्वरूप लोकशाही व समाज-वादी असें असणारच हेंहि त्यांनीं वारंवार बोलून दाखविलें होतें.

असें असलें तरी लोकशाही राज्य आणि समाजवादी क्रांति हे विचार अथवा हीं ध्येयें आधुनिक युरोपांतून इकडे आलीं असल्यामुळें आणि आधुनिक युरोपीय संस्कृति ही केवळ भौतिकवादी असल्यामुळें त्यांचा सत्याग्रहाच्या आध्यात्मिक मार्गाशीं अथवा निष्ठेशीं कसा मेळ बसवावयाचा याचा उलगडा अनेक विचारवंत समाजवाद्यांना व गांधीवाद्यांना झालेला नव्हता. पण भूदान–आंदोलन सुरू झाल्यापासून समाजवादी व गांधीवादी म्हणविणारे बहुतेक सर्व विचारवंत या आंदोलनांतून आपणांस अभिप्रेत असणारी सामाजिक व आर्थिक क्रान्ति घडून येणार आहे असें म्हणून त्या आंदोलनांत सामील झाले आहेत. आचार्य विनोबा भावे यांनीं “ या आंदोलनास सर्व पक्षांनीं पाठिंबा दिल्यास सामाजिक व आर्थिक क्रान्ति घडून येऊन एकवर्ग समाज स्थापन होईल आणि दण्डधारी राज्य-संस्थेची गरज न ठेवितां सर्व समाज आपलें नियमन व नियंत्रण स्वयंप्रेरित अनत्याचारी व सर्वोदयनिष्ठ सेवावृत्तीनें करू लागेल ” असें वारंवार घोषित केलें आहे. त्यांच्या या घोषणांतून समाजवादी क्रान्तीचें सर्व रहस्य अंतर्भूत झालेलें आहे हें कोणाहि विचारवंतास पटण्यासारखें आहे. सत्याग्रहाच्या आध्यात्मिक निष्ठें-तून लोकशाहीचें व समाजवादी क्रान्तीचें ध्येय कसें निर्माण झालें याबद्दल आश्चर्य वाटणाऱ्यांनीं हें लक्षांत घेतलें पाहिजे कीं आधुनिक युरोपांतहि या ध्येयांचा उदय ख्रिस्ताच्या आध्यात्मिक संदेशांतूनच झालेला आहे. ख्रिस्तानें वर्णिलेलें परमेश्वरी साम्राज्य भूतलावर अव-तीर्ण व्हावें आणि त्यानें उपदेशिल्याप्रमाणें विश्व-कुटुम्बाची वृत्ति धारण करून समाजांतील सर्व घटकांनीं परस्परांशीं समतेनें व बन्धुभावनेनें वागून सर्वांच्या स्वातंत्र्याचें संरक्षण करावें हेंच ध्येय युरोपांतील समाज-वाद्यांनींहि पुरस्कारिलेलें आढळतें. फक्त या ध्येयांच्या संस्थापनेसाठीं त्यांनीं अनुसरलेला मार्ग ख्रिस्ताच्या शिकवणीशीं पूर्णपणें विरोधी असा आहे व म्हणूनच म. गांधींचा मार्क्सवादी क्रान्तिकारकांना विरोध होता. पण हा विरोध व्यक्त करीत असतां त्यांनीं लोक-शाहीच्या व समाजवादी क्रान्तीच्या ध्येयांना केव्हांहि विरोध दर्शविला नाहीं. इतकेंच नव्हे तर त्यांनीं प्रत्येक वेळीं त्या ध्येयांचा पुरस्कारच केलेला आढळून येईल.

लोकशाहीच्या ध्येयांत राज्यसंस्थेचें प्रभुत्व प्रजेकडे आहे आणि समाजवादी क्रांतीच्या ध्येयांत संपत्तीचें

स्वामित्व कोणाहि व्यक्तीचें नसून तें सर्व मानव-समाजाचें आहे अशी दोन तत्त्वें अंतर्भूत झालेलीं आहेत. सत्याग्रही तत्त्वज्ञानांतहि परमेश्वराचें राजकीय प्रभुत्व आणि सर्व संपत्तीवरील त्याचेंच स्वामित्व हीं तत्त्वें अंतर्भूत असल्यानें या तत्त्वांच्या अनुरोधानेंच लोकशाहीच्या व समाजवादाच्या ध्येयांना सत्याग्रही तत्त्वज्ञान मान्यता देऊं शकतें. समाजांतील सर्व सत्तेचें अंतिम प्रभुत्व परमेश्वराकडे आहे या तत्त्वानुसार वागत असतां प्रजेला, सत्ताधाऱ्यांनीं केलेल्या अन्यायाविरुद्ध झगडण्याचें सामर्थ्य प्राप्त होत असतें आणि सर्व संपत्तीचें स्वामित्व परमेश्वराकडे आहे या तत्त्वानुसार धनिकांनीं केलेल्या आर्थिक अन्यायाविरुद्ध व विषमतेविरुद्ध झगडण्याची प्रेरणा मिळते. राजाच्या सत्तेऐवजीं प्रजेची सत्ता आणि व्यक्तीच्या स्वामित्वाऐवजीं समाजाचें स्वामित्व अशा धोरणानें लोकसत्तेच्या व समाजवादाच्या क्रांतीस चालना देण्याऐवजीं त्या क्रांत्या परमेश्वराचें प्रभुत्व व त्याचेंच स्वामित्व संस्थापन करण्यासाठीं आहेत या धोरणानें या क्रान्त्यांना चालना दिली असतां त्यांतून वर्गद्वेषाचा अग्नि पेटत न जातां परमेश्वरी राज्याच्या संस्थापनेसाठीं कराव्या लागणाऱ्या स्वार्थत्यागाच्या व तपश्चर्येच्या वृत्ती फैलावूं लागतात.

युरोपांत सतराव्या शतकांत इंग्लंडांत जी प्युरिटन क्रांति झाली तिला क्रॉम्वेलप्रभृति क्रांतिकारकांनीं प्रथम सैतानी सत्तेविरुद्ध पुकारलेल्या परमेश्वरी सत्तेच्या संस्थापनेसाठीं कराव्या लागणाऱ्या धर्मयुद्धाचें स्वरुप देण्याचा प्रयत्न केला होता. पण ही क्रान्ति शस्त्रबळानें करण्याचा त्यांचा मार्ग खऱ्या परमेश्वरी राज्याकडे नेणारा नव्हता. "तुमच्या मार्गानें भूतलावर परमेश्वरी साम्राज्य स्थापन होणार नाहीं" असा इशारा त्याचवेळीं जॉर्ज फॉक्स यानें क्रॉम्वेलला दिला होता. पण त्यावेळीं त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं व युरोपांत सुरूं झालेलें हें क्रांतिकार्य अखेरीस वर्गयुद्धाच्या भोवऱ्यांत सांपडून त्यांतून धनिकशाहीची सैतानी सत्ता निर्माण झाली. या धनिकशाहीच्या सैतानी सत्तेविरुद्ध झगडण्यासाठीं म्हणूनच कार्ल मार्क्सनें कामगारशाहीच्या बड्या सैतानास आवाहन दिलें आणि या कार्याची पूर्तता रशियांतील बोल्शेव्हिक पक्षानें केली. बोल्शेव्हिक क्रांतीलाहि परमेश्वरी सत्तेचें फल न येतां एकपक्षीय हुकूमशाहीचें फलच आल्याचें आज दिसत आहे. अर्थात् याच काळांत परमेश्वरी राज्याच्या संस्थापनेचा खरा मार्ग दाखवून देणारा एक महात्मा भारतांत जन्मास आला आणि त्यानें लोकशाही व समाजवाद या ध्येयांसाठीं कराव्या लागणाऱ्या क्रांत्यांतून परमेश्वरी राज्याच्या संस्थापनेचा मार्ग कसा चोखाळावा तें दाखवून दिलें. अशा रीतीनें आधुनिक युरोपांत सुरूं झालेल्या पण तेथें अयशस्वी झालेल्या क्रांतिकार्याचें नेतृत्व आधुनिक भारताकडे आज आलेलें आहे.

मालकी हक्काविरुद्ध क्रान्ति

अनियंत्रित राजसत्तेविरुद्ध लोकसत्ताक क्रान्ति होत असतां, सत्याग्रहाच्या उपासकांनीं लोकसत्तेच्या बाजूनें लढा करण्यास पुढें यावें हें म. गांधींनीं स्वतःच्या नेतृत्वानें प्रत्यक्षच दाखवून दिलें. पण भारतांत स्थापन झालेली लोकसत्ता धनिकांच्या हातीं जाऊं नये म्हणून मालकी हक्काविरुद्ध सत्याग्रही क्रान्ति करुन संपत्तीवरील व्यक्तीचें स्वामित्व नाहींसें करण्याचें आणि वर्गहीन समाज निर्माण करण्याचें कार्य त्यांच्या पुढील पिढीला करावें लागत आहे. या कार्यास प्रारंभ करण्याचें श्रेय भू-दान-आंदोलनाचे पुरस्कर्ते आचार्य विनोबा यांनीं संपादन केलें आहे. लोकसत्तेची स्थापना आणि तिचें शुद्धीकरण हीं दोनहि कार्यें सत्याग्रहानें व्हावयाचीं तर समाजाची उभारणी वैयक्तिक धनसंग्रहावर होता कामा नये, हें म. गांधींचें असंग्रहाचें तत्त्व भारतीय लोकसत्तेच्या आजच्या राज्यघटनेंत अंतर्भूत झालेलें नाहीं. ही राज्यघटना प्रचलित समाजांतील द्विवर्ग आर्थिक घटना आणि वैयक्तिक धनसंग्रह यांच्या रक्षणाच्या धोरणावरच उभारलेली आहे. यामुळेंच जमीनीवरील वैयक्तिक स्वामित्व नष्ट करण्याची सुधारणा करणारे कायदे ही राज्यघटना बदलल्यावांचून करितां येत नाहींत, हाच समाजवादी विचारांच्या लोकांचा तिच्यावर मूलग्राही आक्षेप आहे. आणि गांधीवादी म्हणविणाऱ्यांनाहि, त्या राज्यघटनेंत गांधीवादी तत्त्वांचा अंतर्भाव झाला आहे असें म्हणतां येत नाहीं, असें असलें तरी ही राज्यघटना आज राष्ट्रांत प्रस्थापित झाली असून ती बहुमान्यहि झालेली आहे असें म्हणतां येईल; कारण ही राज्यघटना बनविणारा व तिच्यांत मूलग्राही फरक करूं न इच्छिणारा राजकीय पक्ष आज सार्वत्रिक निवडणुकीनंतर अधिकारावर आलेला आहे. अशा परिस्थितींत आजच्या

सामाजिक व आर्थिक घटनेंत बद्धमूल झालेलें व राज्य-घटनेनें सुरक्षित बनविलेलें खाजगी धनसंग्रहाचें तत्त्व बदलून घेऊन सामाजिक स्वामित्वाचें तत्त्व समाजाकडून व राज्यसंस्थेकडून मान्य करवून घेण्याची क्रान्ति कशी घडवून आणावयाची हाच आजच्या भारतापुढील महत्त्वाचा प्रश्न आहे. हा प्रश्न आपल्या हातीं घेऊन तो विशिष्ट कालमर्यादेंत सोडवून दाखविण्याची प्रतिज्ञा आचार्य विनोबा यांनीं केली आणि या कार्यास समाजवादी पक्षाप्रमाणें अधिकारारूढ कॉंग्रेस पक्षानेंहि आपला नैतिक पाठिंबा दिला. याचवेळीं खाजगी मालकी हक्कांच्या आधारावर उभारलेल्या आर्थिक घटनेचें व राज्य-घटनेचें जीवित नैतिक दृष्टीनें संपुष्टांत आलें. समाजवादी क्रांतीच्या तत्त्वाला सत्याग्रही तत्त्वज्ञानाचा, इतकेंच नव्हे तर सत्याग्रही आंदोलनाचाहि पाठिंबा देऊन आजच्या भारतीय लोकशाहीच्या राज्यघटनेचा विधाता असा जो कॉंग्रेसपक्ष त्याचाहि नैतिक पाठिंबा मिळवून देण्याचें महान् कार्य आचार्य विनोबा यांनीं प्रत्यक्ष करून दाखविलें आहे. सतराव्या शतकांतील ब्रिटनमधील प्युरिटन क्रान्ति व अठराव्या शतकाच्या अखेरीस फ्रान्समध्यें झालेली फ्रेंच क्रान्ति यांपैकीं कोणत्याहि क्रान्तीच्या वेळीं खाजगी मालकी हक्कांच्या तत्त्वाला एवढा जबरदस्त नैतिक आघात पोंचलेला नव्हता. भूदान-आंदोलनांतून जनतेमध्यें जी स्वार्थत्यागाची व तत्त्वनिष्ठेची क्रान्तिकारक प्रेरणा जागृत होत आहे, त्या प्रेरणेंतून एक नैतिक विचारक्रान्ति घडून येत आहे. ही विचारक्रान्ति अखेरीस या राष्ट्रांत सामाजिक, आर्थिक व राजकीय क्रान्ति घडवून आणल्यावांचून राहणार नाहीं. ज्या लोकांना भारत स्वतंत्र झाल्यानंतर कोणत्याहि प्रकारच्या सत्याग्रही आंदोलनाची अथवा क्रान्तीची भाषा खपत नव्हती, त्याच लोकांना आतां सामाजिक व आर्थिक क्रांतीची घोषणा करावी लागत आहे. ही त्यांची घोषणा प्रत्यक्ष क्रांति घडवून आणण्याचा मार्ग चोखाळणारांना उपकारक ठरल्यावांचून राहणार नाहीं. देशांतील सुप्त जनता जागृत होऊन ज्या क्रांतीची घोषणा करूं लागते ती क्रांति घडून येण्यास केवळ निश्चयाच्या बळाचीच आवश्यकता असते. हें निश्चयाचें बळ जनतेच्या अंगीं जागृत करण्याचें कार्यच आचार्य विनोबा यांच्यासारख्या तपोधनांनीं करावयाचें असतें. आज तें कार्य सुरू झालेलें आहे व त्यांचीं ध्येयें स्पष्ट स्वरूपानें जनतेंत फैलाविलीं जात आहेत.

अध्यात्मवृत्ति आणि सामाजिक क्रान्ति

भारतांत राष्ट्रीय स्वातंत्र्याचा लढा चालू असतांना त्याला आध्यात्मिक अधिष्ठान देण्याचा विचार एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस स्वामी विवेकानंद यांच्या काळापासून पुढें आला. म. गांधींनीं या आध्यात्मिक अधिष्ठानाचें स्वरूप अधिक विशद केलें आणि त्याचें रूपांतर अहिंसक लढ्यांत केलें. यामुळें भारतीय राष्ट्रवाद हा आध्यात्मिक व अहिंसक वृत्तीचा झाला व तो अंतर्मुख बनला. भारतीय राष्ट्रवादाला असें अंतर्मुख स्वरूप प्राप्त होतांच राष्ट्रीय क्रांतीच्या लढ्याचें रूपांतर सामाजिक व आर्थिक क्रांतींत होण्याची प्रवृत्ति त्यांत स्पष्टपणें दिसूं लागली. ही प्रवृत्ति वाढवून तिचें सामाजिक व आर्थिक क्रांतींत विकसन व संवर्धन करण्याचें कार्य आज आचार्य विनोबा हे करीत आहेत. भारतीय राष्ट्रवादानेंच असें अंतर्मुख बनून सामाजिक व आर्थिक क्रांतीचें कार्य सुरू केलें असल्यामुळें, या राष्ट्रांत राष्ट्रवादाला युरोपखंडांतल्याप्रमाणें प्रतिगामी स्वरूप प्राप्त झालें नाहीं. अध्यात्मनिष्ठा आणि अहिंसावृत्ति यांच्या बळावर तोच राष्ट्रवाद समाजवादी क्रांतीचें कार्य करूं लागला आहे. राष्ट्रीय लढ्याच्या काळांत राष्ट्रवाद व समाजवाद या दोन शक्ती एकाच कॉंग्रेस-संस्थेंत नांदत होत्या. आज त्याच शक्ती कॉंग्रेस-पक्ष व समाजवादी पक्ष अशा राजकीय पक्षांत विभागल्या गेल्या असल्या तरी त्या दोनहि शक्तींचें मुख समाजवादी दिशेलाच वळलेलें आहे. या दोनहि पक्षांना सामाजिक क्रांतीच्या आध्यात्मिक व अहिंसक अधिष्ठानाचें महत्त्व पटलेलें आहे. अहिंसक क्रांतीच्या मार्गानें कमी-अधिक वेगानें प्रगति करूं इच्छिणारे कॉंग्रेस व प्रजासमाजवादी असे दोन राजकीय पक्ष आज या देशांत निर्माण झाले आहेत असें म्हणण्यास कांहीं प्रत्यवाय नाहीं. या दोनहि पक्षांचें राजकारण समाजवादी दिशेनेंच चालू असलें तरी समाजवादी क्रांतीचें भवितव्य, त्यापैकीं तीव्र वेगानें प्रगति करूं इच्छिणाऱ्या राजकीय पक्षाला जनतेचा कितपत व किती लवकर पाठिंबा मिळतो, यावर अवलंबून आहे.

सामाजिक क्रांतीचें कार्य आध्यात्मिक वृत्तीनें चालू ठेविलें असतां या क्रांतीसाठीं कराव्या लागणाऱ्या

अनुक्रमणिका

लढ्याचें स्वरूप दोन वर्गांच्या स्वार्थांतील लढा असें न राहतां त्याला न्यायसंस्थापनेच्या लढ्याचें स्वरूप प्राप्त होतें. न्यायसंस्थापनेसाठीं प्रत्येकानें आपला स्वार्थ सोडला पाहिजे आणि त्या स्वार्थत्यागामुळें भोगावे लागणारे क्लेश हे आनंदानें सहन केले पाहिजेत ही वृत्ति चेतविण्याचें कार्य सुरूं झालें असतां वर्गावर्गांतील द्वेषभावना जागृत होत नाहीं. हा लढा अहिंसक साधनांनींच चालू असला तरी समाजांतील सर्व वर्गांत न्यायसंस्थापनेची प्रेरणा जागृत होते व समाजाची न्यायबुद्धि संघटित होऊन ती सामाजिक अन्यायाविरुद्ध असहकार करण्यास प्रवृत्त होते. अशा रीतीनें रूढ सामाजिक व आर्थिक घटनेमुळें जे अन्याय चालू असतात व त्यांतून जी द्वेषभावना फैलावत असते त्या अन्यायाविरुद्ध सामाजिक न्यायबुद्धीनें असहकार पुकारतांच तो अन्याय चालू ठेवणारांचें सामर्थ्य नष्ट होतें. अशा रीतीनें सामाजिक क्रांतीचें कार्य हें दोन वर्गांतील स्वार्थामधील झगडा चालू ठेवण्याचें काम नसून तें सामाजिक न्यायबुद्धीला जागृत करून तिचा प्रभाव सामाजिक व आर्थिक घटनेवर पाडण्याचें कार्य आहे अशी दृष्टि सत्याग्रही क्रान्तितंत्रामुळें प्राप्त होऊं लागते. या जागृत सामाजिक न्यायबुद्धीचा प्रभाव समाजावर पाडीत असतां व त्या समाजाच्या घटनेचें परिवर्तन घडवून आणीत असतां अत्याचाराचा व हिंसेचा उपयोग करावयाचा नाहीं या सत्याग्रही निष्ठेमुळें या संघर्षांतून एकपक्षीय हुकूमशाहीची निर्मिति होण्याचा धोका टळतो. सामाजिक क्रांतीचें कार्य हें सामाजिक घटनेला न्यायाचें, नीतीचें अथवा खऱ्या धर्माचें अधिष्ठान निर्माण करण्याचें कार्य आहे अशी निष्ठा जागृत झाली म्हणजे समाजाच्या बाह्य घटनेंतील क्रांतीबरोबरच त्याच्या अंतरंगांतहि क्रान्ति घडून येऊं लागते. काम, क्रोध आणि लोभ या वृत्तींना चालना देऊन नव्हे तर या तीन वृत्तींतून मुक्त होऊन समाजाला आत्मोन्नतीचा मार्ग दाखवून देणारे सत्याग्रही नेते आपल्या उदाहरणानें आणि सामाजिक क्रान्तीवरील अविचल निष्ठेनें समाजाच्या अंतरंगांत ही क्रांति घडवून आणतात. सामाजिक घटनेंतील बाह्य क्रांतीच्या बरोबर ही अंतरंगक्रांति घडवून आणणें किंबहुना या अंतरंगक्रांतीच्या प्रेरणेनेंच बाह्य सामाजिक क्रांतीचें संचालन करीत राहणें हेंच या आध्यात्मिक व अहिंसक क्रांतीचें वैशिष्ट्य व श्रेष्ठत्व आहे. या क्रांतींतून निर्माण होणारा एकवर्ग समाज अखेरीस समाजवादांतून आत्मराज्याकडे म्हणजेच दण्डहीन सामाजिक अवस्थेकडे जाण्याचा मार्ग मानवाला दाखवून देऊं शकेल. मानवी अंतःकरणांतील न्यायबुद्धि अनेक प्रकारच्या अन्यायांनीं व जुलुमांनीं दडपून गेली असतां व सर्वत्र अन्यायाचें व जुलमाचें साम्राज्य पसरलें असतां त्या न्यायबुद्धीला जागृत, संघटित व प्रभावी बनविण्याचें हें क्रांतितंत्र समाजाच्या भौतिक गरजांप्रमाणें नैतिक व आध्यात्मिक गरजांचेहि प्रश्न सोडवून दाखविणारें आहे. याच्या अवलंबनानें समाजधारणा आणि आत्मोन्नति किंवा लोकसंग्रह व मोक्षप्राप्ति हीं दोन्हींहि कार्यें मानवाला एकदमच साधतां येतील. या क्रांतिकार्यांत भौतिक व आत्मिक उन्नतींत भेद किंवा विरोध उरत नाहीं. म्हणूनच हा क्रांतीचा मार्ग मानवसमाजाला जसा भौतिक आपत्तींतून मुक्त करूं शकेल तसाच तो त्याला काम, क्रोध व लोभ या आत्मविनाशक त्रिविध नरकाच्या द्वारांपासून दूर नेऊन आत्मप्राप्तीचा स्वर्गहि ऐहिक जीवनांत उपभोगण्याचा मार्ग दाखवून देऊं शकेल. आधुनिक युरोपांत भौतिक व आत्मिक उन्नतीकडे अद्वैतभावनेनें पाहण्याची ही दृष्टि नष्ट झाल्यामुळेंच मानवसंस्कृतीवर आज आपत्तींची परंपरा ओढवली आहे. या आपत्तींच्या परंपरेंतून मुक्त होण्याचा मार्ग सत्याग्रही तंत्रानें समाजवादी क्रांति घडवून आणल्यानें मानवसमाजाला दिसूं लागेल. हें कार्य करण्यास भूदानयज्ञाच्या आंदोलनानें सुरवात केली आहे. हें पाहून भारतीय जनतेंत आत्मविश्वासाचा उत्साह आज निर्माण होत आहे. या उत्साहाला लवकरच भरती येईल आणि भारतांतील सर्व राजकीय पक्ष या क्रांतिकार्यांत वेगानें ओढले जातील अशी आशा आज वाटूं लागली आहे. राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या प्राप्तीनंतर कांहीं काळ सर्वत्र फैलावलेला नैराश्याचा अंधार नष्ट करून या उत्साहाचा प्रकाश पसरविण्याचें कार्य भूदानयज्ञाचें आंदोलन आज मोठ्या प्रमाणावर करीत आहे. याच दृष्टीनें हें आंदोलन म्हणजे सत्याग्रही समाजवादाच्या संस्थापनेचेंच आंदोलन होय असें मी समजतों.

श्री. लक्ष्मीनारायण भारतीय

संपत्तिदान-यज्ञाचें धर्म-कार्य

संपत्तिदानयज्ञ अजून भूमिदानाइतका व्यापक होऊं शकला नाहीं आणि आंदोलनाचें स्वरूप तर त्याला अद्याप यावयाचेंच आहे. वस्तुतः अजून संपत्तिदाना-संबंधीं निर्माण झालेले गैरसमज व भ्रम यांचें निवारणच करावें लागत आहे. भूमिदाना-विषयींहि बरेच गैरसमज व भ्रम उत्पन्न झाले होते. विशेषतः 'दान' शब्दानें बऱ्याच जणांना या यज्ञाचें मर्म समजून आलें नाहीं, कारण 'दान' म्हणजे 'उर्वरित वाटणें', 'भीक देणें' हाच अर्थ लोकांत आतांपर्यंत रूढ होता. अजूनहि तो आहेच. पण दान म्हणजे 'सम विभागणी' हाच अर्थ भूमिदानयज्ञाचा गाभा आहे, हें आतां लोकांना समजूं लागलें असून भूमिदानयज्ञ लोकांच्या अंतःकरणांत व मेंदूंत रुजूं लागला आहे. "जमीन व्यक्तीच्या मालकीची नाहीं देवाची, समाजाची आहे" हा विचार जनता आत्मसात् करीत आहे. पण संपत्ति-दानाचा मूळ विचार अजून लोकांना ग्रहण झालेला नाहीं; इतकेंच नव्हे, तर आतां-आतांपर्यंत निकटवर्ती-यांना पण त्याचें मर्म उकललें नव्हतें. संपत्तिदान म्हणजे पैसा घेणें, येवढेंच स्वरूप त्याला मिळूं पहात होतें. त्यामुळें या विचाराला व कार्याला आंदोलनाचें किंवा प्रसाराचें स्वरूप मिळण्यास अद्यापि बराच अवधि लागेल. आणि वस्तुतः संपत्तिदानाचें जें मर्म आहे, तें पहातां त्याबद्दल घाई करण्यांतहि अर्थ नाहीं, असें वाटतें. कारण याची कल्पना खोल खोल रुजवायची आहे, निव्वळ व्यापक करायची नाहीं. संपत्तिदानांत वस्तुतः 'संपत्ति' शब्द व्यापक अर्थानें आलेला आहे. भूमिदानांत 'भूमि' शब्द एकाच अर्थानें आलेला आहे. 'संपत्तिदान' या शब्दांत 'दान' नव्हे, तर 'संपत्ति' शब्दानेंच बरेच गैरसमज उत्पन्न केले आहेत व 'संपत्तिदान' म्हणजे 'पैसा-दान' व "पैसादान म्हणजे नवीन असें कांहींच नाहीं" हा भ्रम उत्पन्न होऊं शकला. संपत्तिदानांत 'पैसादान' आहेच, पण तो अशा प्रकारें कीं पैशांतील सत्त्वच नष्ट व्हावें. म्हणून संपत्तिदानाचा वास्तविक अर्थ अगोदर समजून घेणें अपरिहार्य झालें आहे.

आर्थिक क्रांतीचें साधन

भूमिदानानें भूमिक्रांति जशी घडवून आणायची आहे, तशी संपत्तिदानानें आर्थिक क्रांति घडवून आणायची आहे, हें आज सांगितलें जात आहे. व तें बऱ्याच अंशीं सत्यहि आहे. पण भूमीची न्याय्य वांटणी झाली कीं जसें भूदानाचें कार्य संपतें, तसें संपत्तीची न्याय्य वांटणी झाली कीं संपत्तिदानाचें कार्य संपतें असें नव्हे; तर संपत्तिदानयज्ञ हें जीवन-कार्यच बनणारें आहे. भूमिदानानें जसा 'भूमि-विचार' दिला, तसा यानें 'अर्थ-विचार' दिला, हें खरें; पण मुख्यतः यानें 'धर्म-विचार'च दिलेला आहे, या लेखांत मुख्यतः 'धर्म-विचारा'चेंच आपणांस विवेचन करावयाचें आहे. 'अर्थ-विचार' आजच्या विषमतेच्या व अन्याय्य वांटणीच्या निराकर-णार्थ अपरिहार्य आहे व संपत्तिदानाचें तात्कालिक कार्यहि तेंच होऊं शकते, हें खरें. पण शेवटीं तें कांहीं काळापुरतेंच आहे, हें मानलें कीं मुख्य विचार पुढचाच करावा लागतो.

संपत्तिदानांत सर्वां-अगोदर जें काम करावयाचें, तें म्हणजे पैशाला आलेली आजची प्रतिष्ठा नि सामर्थ्य मिटवून माणसाची प्रस्थापना करावयाची. आज मानवतेच्या बरोबरीनेंच नव्हे, तर माणसाला लाथाडून पैसा जीवन बनत चालला आहे! आणि पैशाच्या फांदीवर बसून, तिला तेथेंच कापून हें करावयाचें आहे. आज संपत्ति म्हणजे 'पैसा' व दान म्हणजे 'भीक वाटणें' असाच समज रूढ आहे. हा समज मोडून लोकांत एक धर्मप्रवृत्ति उत्पन्न करण्याचें कार्य संपत्तिदानयज्ञाला करावयाचें आहे धर्मशाळा बांधणें, शिष्यवृत्त्या देणें, संस्था चालविणें, गोरगरीबांस धान्य-कपडे वाटणें वगैरे जे दानांचे प्रकार आज

विद्यमान आहेत, त्यांहिपेक्षा बलवत्तर नि महत्तर कार्य संपत्तिदानाला करावयाचें आहे. आज त्याचें स्वरूप थोडक्यांत असें आहे कीं आपल्या संपत्तीचा, आपल्या उत्पन्नाचा एक अंश, सहावा किंवा दहावा किंवा बारावा, सतत, तहह्यात संपत्तिदानांत अर्पण करावयाचा. विनोबांच्या मध्यस्थीनें आणि विनोबा सांगतील त्याप्रमाणें त्याचा विनियोग करायचा. विनोबा त्याचा विनियोग शेतकऱ्यांना बैल-आउतें, अवजारें वगैरे देण्यांत, विहिरी बांधून देण्यांत नि लोकसेवकांना जीवनवेतन देण्यांत करतील. जोंपर्यंत विनोबा असा आदेश देत नाहींत, तोंपर्यंत ठेव म्हणून तो अंश, तो हविर्भाग आपल्याजवळ ठेवायचा; स्वतः कांहीं विनियोग सुचवायचा असेल तर तोहि सुचवायचा. असें त्याचें थोडक्यांत स्वरूप आहे. अर्थातच येथें पैसा आलाच. एक अंश उत्पन्नाचा देणें म्हणजे मासिक दोनशें रुपये मिळत असतील तर महिन्याला त्यापैकीं वीस रुपये, दहावा हिस्सा देणें. म्हणजे वीस 'रुपये' इकडे आले व तिकडे अवजारें वगैरे आणावयास ते खर्च करावयाचे म्हणजे तेथेंहि 'रुपये' येतातच. 'घेणें' व 'खर्च करणें' जर पैशाचेंच काम आहे तर पैशाची मान्यता, अवास्तव प्रतिष्ठा कशी कमी करावयाची हाहि प्रश्न आहे. परंतु 'रुपये घेणें नि खर्च करणें' संपत्तिदानाचें 'कार्य' आहे, स्थूल रूप आहे. तें बाजूला सारून, त्याला लाथाडून आज पुढें सरतां येत नाहीं. कारण आज परिस्थितीच तशी आहे. पैशाशिवाय एक पाऊल पुढें पडूं नये, अशीच जणूं समाज-रचना बनली आहे. उत्पादनाच्या वस्तूंचा 'स्थानिक' विनियोगहि पैशाच्याच आधारें होऊं शकतो. तो नसेल तर त्या वस्तू तेथेंच निरुपयोगी म्हणून पडल्या राहतील. सर्वगुणसंपन्न असा मुलगा किंवा मुलगीहि घरांत फार दिवस 'बेकार' राहूं देणें आज पालकांना शक्य नाहीं व पैशाच्या अभावीं, तो जर कमावत नसेल तर, त्याचे ते सर्व गुण आज मातीमोल आहेत! अशा प्रकारें आज परिस्थिति आहे. साऱ्या जीवनालाच ज्यानें ग्रासून टाकलें आहे, त्याला बाजूला काढतांनाहि स्पर्शाशिवाय कसें काढतां येईल? स्पर्श करावा लागेल, हात लावावा लागेल, उपयोग घ्यावा लागेल. तें 'कार्य' अपरिहार्य आहे, पण तें करीत असतांनाच **कांचन-मुक्ति** साधायची आहे.

पण हें कार्य करीत असतांना मनांत हेतु आहे. पैशाला नष्ट करण्याचें कार्य हेतूच्या पूर्तीसाठींच असल्यामुळें हेतूवर कार्यक्रमाचें वर्चस्व होऊं शकत नाहीं हेतूवर पैसा कुरघोडी करूं शकत नाहीं. मानवतेचीं चिरंतन तत्त्वें आज ज्या पैशानें झांकून टाकिलीं आहेत, तीं मोकळीं करून त्यांचें तेज समाज-जीवनांत पसरविण्याचें काम संपत्तिदानाला करावयाचें आहे. हें त्याचें सर्वांत मोठें वैशिष्टय आहे. नाहीं तर 'पैशाचें दान' व 'संपत्तिदान' यांत मुळींच फरक उरला नसता! पैसा संपूर्णपणें नष्ट होईल असें आम्ही म्हणत नाहीं, पण पैशानें होणारी मानव्याची खरेदी-विक्री थांबवावयाची आहे. विटा घर बांधण्याच्या कामीं फार येतात. पण घरें न बांधलीं तर त्या तशाच पडून राहतात. पैशाची परिस्थिति अशी आणायची आहे. म्हणजेच पैशाचें वास्तविक स्वरूप त्याला प्राप्त करून द्यावयाचें आहे. 'जड' असलेल्याला जडच राहूं द्यायचें आहे, 'चैतन्या'ची जागा घेऊं द्यायचें नाहीं. चैतन्यावर चालत असलेली जडाची अबाध सत्ता घालवायची आहे. हें संपत्तिदानाचें तांतडीचें काम आहे, पहिलें पाऊल हें आहे.

उत्पादनसाधनांवर उत्पादकाची मालकी

आज स्वार्थाचा बुजबुजाट वाढला असून केवळ सांठवण्याची, संग्रहाची वृत्ति जोपासली जात आहे, आणि याचें मुख्य कारण हलाखीची परिस्थितीच आहे. ही संग्रहाची वृत्ति कमी केल्याशिवाय पैशाची प्रतिष्ठा कमी व्हायची नाहीं आणि हलाखीची परिस्थिति दूर केल्याशिवाय संग्रहाची वृत्ति कमी करतां येणार नाहीं. असें हें त्रांगडें आणि दुष्टचक्र आहे. म्हणून सुबत्ता नि संपन्नता आणणें हें पायाभूत काम आहे आणि तें पुरें करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे उत्पादनाच्या साधनांवर उत्पादकांचीच मालकी असणें हा होय. एकवेळ ही मालकी भूमिदानाच्या द्वारें स्थापन झाली कीं इतर क्षेत्रांतली, विशेषतः आर्थिक क्षेत्रांतली विषमता विनाश करण्याचा मार्ग मोकळा होतो आणि त्यासाठीं नैतिक शक्तींचा संचय होतो. परकीयांकडून होणारें शोषण बंद झाल्यानंतर स्वकीयांकडून होणाऱ्या शोषणाचें निर्मूलन करण्यासाठीं नैतिक शक्ति व प्रभावशाली मार्गांचें अवलंबन अपरिहार्य असतें. नैतिक शक्ति भूदानाच्या द्वारें मिळत आहे व संपत्तिदानाचा कार्य-

क्रम समोर आहे. स्वकीयांकडून होणारें सर्वांगीण, विशेषतः आर्थिक शोषण बंद करण्याचें कार्यहि संपत्तिदानाला करावयाचें आहे व तेंच त्याचें अर्थकार्य आहे. तें साधत असतांना ही शक्तिवृद्धि होतच राहील. याप्रमाणें दोन शक्तींचें संमीलन होणें अपरिहार्य आहे. अर्थकार्य साधण्यापुरतें हें संमीलन समर्थ आहे. त्यामुळें धर्मकार्यालाहि बळ मिळेल. पायाभूत काम अशा प्रकारें केलें गेलें कीं मग संग्रहवृत्तीची आवश्यकताच भासणार नाहीं. संग्रह स्वतःच्या उपभोगासाठीं आणि मुलाबाळांसाठीं केला जातो. संपन्नता व सुबत्ता आली कीं उपभोगाचा प्रश्न सुटतो व समाजानें जी बाकीची जबाबदारी घेणें अपरिहार्य आहे, ती घेतली कीं संग्रहवृत्तीचें कंबरडेंच मोडलें ! आणि मग पैशाची प्रतिष्ठा घालविण्यालायक वातावरण नि परिस्थिति आपोआपच उत्पन्न होते.

'असंग्रहा'ची पूर्वतयारी

याशिवाय, दात्याकरवींच त्याच्या पैशाच्या सत्कारणीं विनियोगाची जी प्रक्रिया आहे, तीहि हा हेतु साधण्याचें कार्य करीतच असते. आपलें उत्पन्न आपण आपल्या हातानें सतत थोडेफार तरी सत्कारणीं लावीत आहोंत, ही भावना दुबळी भावना नाहीं, पराक्रमी आहे. ती ज्याप्रमाणें साधनशुद्धीकडे प्रेरित करते, त्याचप्रमाणें पैसा हा जीवनांतील 'राम' नाहीं, या दृष्टिकोनाचेंहि दर्शन घडवते. दात्यालाच बांधून घेण्याचें जें हें कार्य आहे तें फार महत्त्वाचें कार्य आहे. ' दात्याकरवीं – त्याच्यासमोर – जागृत जाणीव-पूर्वक त्याच्या पैशाचा विनियोग सतत करण्याची प्रक्रिया म्हणजे त्याला असंग्रही वृत्तींत हळूहळू बांधून घेण्याची दोरीच आहे. आपल्याला द्यायचें, सतत द्यायचेंच आहे, आणि तेंहि मोबदल्यांत कीर्ति सुद्धां न अपेक्षितां, तर उगाच संग्रह कां वाढवावा, असा व्यवहार्य विचार अंतःकरणांत उदित झाल्याशिवाय रहात नाहीं. "खोऱ्यानें पैसा ओढावा नि खोऱ्यानें वांटावा" हें गोंडस तत्त्व भ्रमजाळच आहे. कारण खोऱ्यानें ओढत असतांना खोऱ्यानेंच वांटण्याची वृत्ति उत्पन्न होत नाहीं. सांठवण्याची, वाढवण्याचीच वृत्ति उत्पन्न होते. दानाची इच्छा झाली तरी मुळाशीं हेतु प्रायश्चित्ताचा किंवा कीर्तीचा असतो. उलट 'अपरिहार्य देणें' आलें कीं 'अवास्तव संग्रहा'ची भावना क्षीण होत जाते व कांचनमुक्ति साधत जाते.

अशा प्रकारें सर्व बाजूंनीं पैशाच्या महत्त्वाचें उच्चाटन चालू ठेवतांना आणि तो पैसा 'मातीं'त घालीत असतांना पैसा 'पैसा'च राहील, 'देव' बनणार नाहीं व चैतन्यावर जडाचें आक्रमण होणार नाहीं हें संपत्तीदानाचें 'तात्कालिक कार्य' (किंवा अर्थकार्यहि पाहिजे तर म्हणा), साधीत असतांनाच धर्मकार्याचा पाया टाकला जातो नि संपत्तिदानाचें धर्मकार्य साधण्याचा मार्ग सुकर होतो.

समाजाच्या ऋणाची फेड

संपत्तिदानाचें धर्मकार्य हें आहे कीं, व्यक्ति हा समाजाचें अंग असून समाजाकडून मिळणाऱ्या पोषणाचें ऋण फेडण्याचें त्याचें कर्तव्य त्याला जीवनभर पार पाडावयाचें आहे. समाजापासून जें घेतो, तें दुसऱ्या रूपानें देणें आहे याची सतत जाणीव व अंमलबजावणी. समाजाच्या, राज्याच्या गरजा व्यक्तीनें आपण होऊन पुरवावयाच्या आहेत. हीच 'देण्याची वृत्ति' निर्माण करावयाची आहे. 'कां द्यायचें' नि 'कधीं द्यायचें' ही भावना हें धर्मकार्य माणसाच्या अंतःकरणांत बिंबवितें, 'किती द्यायचें' याचेंहि मार्गदर्शन करतें. आज माणसाच्या अंतःकरणांतून देण्याची वृत्ति समूळ गेली नाहीं. तो पै-पैसा या ना त्या धार्मिक कार्यांत, दया म्हणून देतच असतो. पण त्याचें हें देणें निराळें नि समाजाचें कर्ज, जें रोज आपण घेतों, तें रोज फेडणें निराळें होय. त्याच्या अंतःकरणांत हीच भावना रुजवायची आहे कीं ज्याप्रमाणें वैयक्तिक जीवनांत वेतन, पारिश्रमिक, मदत वगैरे घेऊन त्याची परतफेड काम, नोकरी, साहाय्य वगैरे रूपानें आपण करतों, त्याप्रमाणें समाजाकडून अदृश्य स्वरूपांत आपलें जें सामाजिक नि आध्यात्मिक पोषण सतत होत आहे, त्याची परतफेड कोणत्या ना कोणत्या स्वरूपांत सतत करीत राहणें आपलें कर्तव्य आहे. पैसा कमावीत असेल तर पैसा, शरीर कमावीत असेल तर शरीर, बुद्धि कमावीत असेल तर बुद्धि त्याला द्यायची आहे. म्हणजेच संपत्तीमध्यें सर्व कांहीं येतें. संपत्ति म्हणजे पैसाच तेवढा नव्हे. म्हणूनच 'सर्व संपत्ति रघुपति की आही' असें म्हटलें जाते. जें कांहीं देणें इमानेंइतबारें शक्य आहे, तें देत रहावें अशी वृत्तीच निर्माण करावयाची आहे. आज ज्याप्रमाणें दया-

मैत्री-करुणा वगैरे भावना आपल्या अंगभूत वृत्ती बनल्या आहेत, त्याप्रमाणें समाजाच्या ऋणाच्या फेडीची भावनाहि अंगभूत वृत्ति व्हावयास हवी. समाज-पुरुषाला कुटुंबाचें अंग बनवावयाचें आहे. हेंच संपत्ति-दानाचें धर्मकार्य आहे. म्हणजेच जीवनांत 'सर्वात्म-भावने' ची स्थापना करावयाची आहे, नि हीच संपत्तिदानाच्या धर्मकार्याची परिणति होत.

कालपुरुषाची मागणी

याप्रमाणें संपत्तिदानाला जें ध्येय साधावयाचें आहे, तें दोन टप्प्यांत आहे : पहिला टप्पा आहे, 'जडाला चैतन्यावर प्रभुत्व गाजवतां येऊं नये.' म्हणजे जडाला जडच राहूं देणें. आणि दुसरा टप्पा आहे, 'चैतन्य–स्वरूपी मानवांना एका दुव्यांत जोडून समूहशक्तीची निर्मिति करणें' म्हणजेच 'सर्वात्मभाव' प्रस्थापित करणें आणि त्याला अशा प्रकारें शक्तिशाली बनवणें कीं जडानें पाहिजे तर चैतन्यांत रूपांतर व्हावें, पण जडानें चैतन्याच्या वाटेस मात्र जाऊं नये. हेंच संपत्ति-दानाचें पूर्ण धर्मकार्य आहे आणि तें आजीवन साधनेनें नि नियमनानें साधावयाचें आहे.

आणि हें नियमन मुख्यतः अर्थनियमनच होय. यासाठीं पहिला कार्यक्रम म्हणजे आपल्या संपत्तीला, उत्पन्नाला नि खर्चाला सहा दहा किंवा बारा भागांत बांधून टाकणें, नि मग त्यांपैकीं एका एका भागानें द्यावयाला सुरवात करून शेवटीं एक भागच राखावयाचा नि सर्व देऊन टाकायचें ! यांत देण्याची, थोडयापासून सुरवात करून जास्तींत जास्त देण्याची प्रक्रिया महत्त्वाची असली तरी त्याचा पाया संपत्ति 'बांधून' टाकण्यांतच आहे. ही बांधण्याची प्रक्रियाहि मोठी मौजेची आहे. अखेर संपत्ति बांधली कशी जाऊं शकते ? प्रत्यहीं लाखो-क्रोडोंनीं वाढणारा पैसा ६, १०, किंवा १२ भागांत कसा वांटला जाऊं शकतो ?–तो असा कीं जितकें उत्पन्न होईल, तें लाखो क्रोडोंत न मोजतां हिश्श्यांत मोजलें जाइल. म्हणजे वाटेल तितकें उत्पन्न होवो, तें ६–१०–१२, या येवढ्याच हिश्श्यांत मानलें जाईल व त्यांपैकीं एक हिस्सा समाजाला द्यावा लागेल. आज हा कार्यक्रम प्रत्यक्ष चालू आहे ! आज 'एक' देऊन 'पांच' राखणें लोकांना पटतें. पण 'पांच' देऊन 'एक' राखणें पटत नाहीं ! पण एक देणें जसें मानवलें, तसें हळू हळू तें वाढवीत जाणेंहि मानवेल.

याप्रमाणें संपत्तिदानाचें धर्मकार्य मानवजीवनाचें सार्थक घडवून आणणारें असून तें 'याच देहीं याच डोळां' होणारें आहे. आज काळाचीच ही मागणी आहे आणि काळपुरुषाच्या मागणीला धुडकावून लावण्याची ताकद मानवांत नाहीं. कारण ही मागणी न्याय्य, नैतिक नि विचार–शुद्ध आहे. आज इतकें परिवर्तन अशक्य कोटींतलें मानण्याचीहि मुळीच गरज नाहीं, कारण संपत्तिदानाचा पुरस्कार आतां सामान्य जनता करूं लागली आहे. लाखों एकर जमीन मिळाली आहेच. सहावा–षष्ठांश प्रत्यक्ष दिला जात आहे. पैसा हा जड असून तुच्छहि आहे आणि अपरिग्रह हा नुसता सद्गुण नसून ती एक शक्तीहि आहे, याचें भान होऊं लागलें आहे, संपत्तिदानाच्या कार्य-क्रमाचा पहिला हप्ता पुरा होऊं लागला आहे. शेवटचा हप्ता म्हणजे ह्याला आवश्यक ती 'वृत्ति' निर्माण व्हायला थोडा वेळ लागेल; पण तीहि अशक्य कोटींतली गोष्ट मुळींच राहिली नाहीं. विनोबा म्हणतात त्याप्रमाणें "संग्रह हें पाप आहे आणि संग्रहाची गरजच नाहीं, कारण घरोघर असलेली संपत्ति सर्वांसाठींच आहे" अशी एक वेळ ही जाणीव उत्पन्न झाली कीं त्यांतूनच एक नैतिक शक्ति उत्पन्न होईल. ही जाणीव आज होतच चालली आहे. फक्त परिस्थितीच माणसाला आप्पल-पोटी बनवीत आहे. पण तिच्या निराकरणाचा मार्गहि आक्रमला जात आहे, आणि तो म्हणजे उत्पादनाच्या साधनांवर उत्पादकांचीच मालकी असणें. भूमिदाना-करवी हेंच सुरूं झालें आहे.

'श्री हरि'

पैशाची माया फार विचित्र आहे ! तिच्या पाशांत शेतकरी अडकून पडला आहे. व्यापारी तर तिला जीव कीं प्राण मानतो ! ... व्यापारी आपल्या वही-खात्यावर 'श्री हरि' लिहून ठेवीत असतो. 'श्री हरि' याचा अर्थ श्रीचें हरण करणारा ! कोणत्याहि उपायानें खूप पैसा मिळविणें हाच त्याचा 'श्री हरि' आहे.

—आचार्य विनोबा ('सर्वोदय' एप्रिल–अंकावरून).

श्री. वालजी गोविन्दजी देसाई

आपण शंभर वर्षें जगूं या !

जीवेम शरदः शतम् ।

–ऋक्संहिता (१ : ६६ : ३६)

भद्रं कर्णेभिः शृणुयाम देवाः
भद्रं पश्येमाक्षभिर्यजत्राः ।
स्थिरैरङ्गैस्तुष्टुवाँसस्तनूभिर्
व्यशेम देवहितं यदायुः ।

– ऋ. सं. (१ : ८९ : ८)

'हे देवांनो, कानांनीं आम्ही चांगल्या रीतीनें हरिकथा वगैरे शुभ गोष्टी ऐकूं. डोळयांनीं आम्ही चांगल्या रीतीनें सूक्ष्म गोष्टी पाहूं. शरीरानें निरोगी राहून, देवस्तुति करीत देवहित आयुष्य आम्ही उपभोगूं.'

वरील ऋचा अभ्यास सुरूं करण्यापूर्वीं शान्तीसाठीं जप करण्याची आहे (तै. आरण्यक १:३२:२-३). तिच्यावर भाष्य करतांना सायणाचार्य लिहितात कीं देवहित आयुष्य म्हणजे ११६ किंवा १२० वर्षें :[1]

" यत् आयुः षोडशाधिकशतप्रमाणं विंशत्यधिकशतं प्रमाणं वा देवहितं देवेन प्रजापतिना स्थापितं तत् व्यशेम प्राप्नुयाम ॥ " – सामसंहिता (२:९:३:९:२).

छान्दोग्य-उपनिषदांत (प्रपाठक ३, खंड १६) मनुष्याच्या आयुष्याचे तीन भाग केले आहेत. त्यांची बेरीज ११६ वर्षें होते. त्यांत सांगितलें आहे : "जसें प्रातःसवनांत जी गायत्री गायिली जाते त्या गायत्रीचीं २४ अक्षरें असतात; तशीं पुरुषयज्ञाच्या प्रभातांत २४ वर्षें असतात. त्याचप्रमाणें माध्यंदिनसवनांत गायिल्या जाणाऱ्या त्रिष्टुभाचीं ४४ अक्षरें असतात, तशीं पुरुषयज्ञाच्या मध्यान्हांत ४४ वर्षें असतात. आणि तृतीय सवनांत गायिल्या जाणाऱ्या जगतीचीं ज्याप्रमाणें ४८ अक्षरें असतात त्याचप्रमाणें पुरुषयज्ञाची सन्ध्या (संध्याकाळ) ४८ वर्षांची असते. " २४ + ४४ + ४८ = ११६. इतकें आयुष्य भोगणारा महिदास ऐतरेय नांवाचा ऋषि होऊन गेला. अल्पायुषी झालेलें आपण महिदासाचें नामस्मरण करूं या. कारण त्याचें जो स्मरण करील तो ११६[2] वर्षें जगेल अशी भगवती श्रुतीची प्रतिज्ञा आहे :

" स ह षोडशं वर्षशतम् अजीवत् । प्र ह षोडशं वर्षशतं जीवति य एवं वेद । " – छां. उ. ३ : १६.

दीर्घजीवनाचें सार्थकहि कशांत आहे याचें वर्णन पुढील सुभाषितांत आढळून येईल :

यज्जीव्यते क्षणमपि प्रथितं मनुष्यैर्
विज्ञानविक्रमयशोभिरभज्यमानम् ।
तन्नाम जीवितमिह प्रवदन्ति तज्ज्ञाः
काकोऽपि जीवति चिरं च बलिं च भुङ्क्ते ॥ ४३ ॥

'एक क्षणभरच जगलों परंतु ज्ञानानें, पराक्रमानें व कीर्तीनें जगलों तरी जीवन सार्थक आहे. नाहीं तर कावळा कुठें चिरंजीवी नाहीं आणि पोट भरीत नाहीं ?'

पुढील वचनें पहा :

१ जीव वस्ससतं गग्ग अपराणि च वीसतिम् ।
जीव त्वं सरदो सतम् । – १५५ 'गग्गजातक' (कोसम्बोल २ : १६)
नराणां कुञ्जराणां च विंशोत्तरशतं विदुः । – वैद्यनाथः ('जातकपारिजात')

२ दुसरी एक गणना आहे. २१ वर्षेंपर्यंत मनुष्याच्या शरीराची वाढ होत जाते. म्हणून माणसाचें जास्तींत जास्त (मॅक्झिमम्) आयुष्य २१ × ५ = १०५ वर्षें. – (जॉन ओनील – 'यू अँड द युनिवर्स' वॉशबर्न). २५ × ६ = १५० अशी गणना सुद्धां करतात. आणखीहि एक वचन पहा :

' जीवन्नरो भद्रशतानि पश्येत् । '
' मनुष्य जर जगला तर तो पांचशें शुभ गोष्टी बघतो ' ।

प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर

खड्यांची लढाई

जित राष्ट्राचा अपमान सहन न झाल्यामुळें सर्व मराठे सरदार अखेरीस एकत्र आलेले दिसले अशी लढाई खड्यांची (ता. ११ मार्च १७९५) होय. नाना फडणीसांच्या कारस्थानाचा तो परमोच्च बिंदु व हिंदुस्थानच्या इतिहासांतील एक संस्मरणीय टप्पा. मराठ्यांचे सर्व गुण तसेच हिंदूंचे सर्व अवगुण या युद्धांत दृष्टीस पडतात. कोणत्या कारणामुळें हिंदुमुसलमानांचा प्रश्न आपणांस सोडवितां आला नाहीं त्याचाहि बोध आपणांस या युद्धाच्या फलश्रुतीनें होतो.

बाळाजी विश्वनाथानें दक्षिणच्या सहा सुभ्यांच्या चौथाई सरदेशमुखीचा हक्क मराठी राजासाठीं दिल्लीस जाऊन आणला. निजाम-मराठ्यांच्या सर्व लढाया मुख्यतः या हक्काच्या वसुलीसाठीं झाल्या. मराठे प्रबळ असत तेव्हां हे हक्क वसूल होत व आपसांतील फाटाफुटीमुळें ते दुर्बल होत तेव्हां खालावणारा निजाम पुनःपुनः जीव धरी. नारायणरावाच्या वधानंतर निजाम बारभाईच्या कारस्थानांत सामील झाला. म्हणून नाना फडणीस व सवाई माधवराव पेशवे त्याचे अनन्य ऋणी झाले. पेशवे व निजाम यांच्या दौलतींत वेगळेपणा राहिला नाहीं व राहूं नये अशी उभयपक्षीं समजूत झाली. पण चौथाई सरदेशमुखी व घासदाणा या हक्कांच्या उत्पन्नावर तर मराठी राज्य अवलंबून. त्यालाच खो घालण्याचा प्रयत्न निजामाचा कुटिल मुत्सद्दी मुषीर–उलमुल्क यानें या वेळीं चालविला. इंग्रजांच्या मदतीचा त्यास आधार वाटत होता. महादजी शिंदे व नागपूरकर भोसले पुण्याच्या ब्राह्मणी पेशवाईविरुद्ध आपणांस मिळतील अशी त्यास आशा वाटत होती. तसेंच फ्रेंच सरदार रेमू यानें तयार केलेल्या कवायती फौजेच्या बळावर 'आपण नाना फडणीसास खडे चारूं' अशा वल्गना तो करावयास लागला. पेशव्यांना व नानास गोसावी बनवून काशीस लावून देण्याचा बकवा निजामाच्या दरबारांत सुरूं झाला. पेशवा दिल्लीच्या बादशहाचा वकील–इ-मुत्लक ऊर्फ सर्वाधिकारी झाल्यामुळें त्याचा दक्षिणचा सुभेदार निजाम यावरहि मालकी हक्क निर्माण झाला होता. त्याचें व महादजी शिंद्यानें सर्व मोगल राज्यांत म्हणजे निजामाच्या प्रदेशांत गोवधबंदीचें जें फर्मान काढलें होतें त्याचें वैषम्य सर्व मुसलमानांस वाटत होतें. वकीलांच्या बोलाचालीवर प्रश्न सुटण्याची आशा दाखवून आंतून आपली तयारी पुरी होण्यास वेळ सांपडावा म्हणून त्यानें मीरआलम नांवाचा वकील सन १७९४ च्या जुलै महिन्यांत पुण्यास पाठविला होता. इंग्रजांचा पुण्याचा वकील मॅलेट व हैदराबादचा इंग्रज वकील कर्कपॅट्रिक हे दोघे याबाबत समजूत घालण्याचा प्रयत्न करीत होते. पण मुषीरचें डोकें चढलें असल्यामुळें कोणतीहि तडजोड न होतां, युद्धाशिवाय गत्यंतर नाहीं अशीं मराठ्यांची खात्री झाली. म्हणून या सर्व वेबनावाचें मूळ जो घमेंडखोर मुषीर, तोच आपल्या हवालीं करावा अशी पेशव्यानें पर्यायानें मागणी सुरूं केली. निजामाच्या बेदरच्या छावणींत भांडांचा तमाशा होऊन, त्यांत पेशवे व त्यांचे सरदार-मुत्सद्दी यांचीं सोंगें पेशव्यांचा वकील गोविंदराव काळे यास खिजवण्यासाठीं दाखविण्यांत आली तेव्हां हाच मुद्दा युद्धाचें तात्कालिक कारण ठरला.

जानेवारी १७९५ च्या आरंभीं निजाम बेदर सोडून पश्चिमेकडे येत राहिला. लढाईत पहिली आगळीक मुषीरच्या सैन्यानें केली. त्यानें आंबेजोगाई या क्षेत्राचा विध्वंस केला. तेथें देवीसमोर गाई कापणें व ब्राह्मणांवर जुलूम करणें असले प्रकार झाले. त्यामुळें तेरा ब्राह्मण कुटुंबांनीं अब्रू बचावण्यासाठीं आपल्या घरांत स्वतःस कोंडून घेऊन त्याला आग लावून दिली. बीस ब्राह्मणांनीं जिभा हासडून जीव दिला. बायका बाटवल्या-

प्रस्तुत भाषण प्रा. त्र्यं. शं. शेजवलकर यांनीं पुणें रेडिओवरुन केलें. तें येथें पुणें रेडिओ अधिकाऱ्यांच्या परवानगीनें प्रसिद्ध केलें आहे — का. सं.

अशी वार्ता पुण्यास येऊन थडकली. अर्थात् पेशव्याला त्वरा करून आपलें सैन्य नगरच्या वाटेनें पुढें सरकविणें भाग झालें. हरिपंताचा पुत्र बाबा फडके व दौलतराव शिंदे हे सीना नदी ओलांडून जामखेड तालुक्यांत शिरले उत्तरेकडून याचवेळीं जिवबादादा बक्षी पेरूच्या हाताखालील कंपू घेऊन पैठणास येऊन पोंचला व शिंद्याच्या घोडदळाचा मुख्य देवजी गवळी यानें बीड जिल्ह्यांत धुमाकूळ घालण्यास सुरवात केली. रघूजी भोसलेहि नागपूर सोडून वऱ्हाडच्या सीमेवर येऊन पोंहोचला. निजामानें रेमूच्या हाताखालील कंपू बार्शीकडे लुटालुटीस पाठविला. ही फेब्रुवारीच्या आरंभींची स्थिति. निजामाचा एक बेत, जर पेशव्यांचें सैन्य शिंदे व भोसले यांस मिळण्यासाठीं औरंगाबादच्या सुमारास सटकलें तर आपण परिंड्याच्या मार्गानें, थेट पुण्यावर जाण्याचा होता. पण मराठे या वेळीं अतिशय सावधतेनें वागत होते. त्यांनीं आपलें सैन्य निजामाचा रोख कळेपर्यंत एकत्र आणलेंच नाहीं. फेब्रुवारीच्या मध्यास निजाम पारगांवला आला व तेथें त्यानें आपल्या सैन्याची एकत्र पहाणी केली व त्याचें बळ गोविंदराव वकीलास दाखविलें. निजामाचें हें सैन्य एक लाखावर असून पेशव्यांच्या सैन्यापेक्षां कोणत्याहि बाबतींत कमी नव्हतें. खुद्द पेशव्यांच्या हातांखालील सैन्य ५०,००० वर असून त्यांत होळकर, शिंदे व नागपूरकर भोसले मिळाले म्हणजे तें सवा-लाखावर होणार होतें. नाना फडणीसाच्या सल्ल्यानें गोविंदरावानें निजामास या वेळीं निक्षून सांगितलें कीं तुम्ही मोहरीचा घाट उतरून खर्ड्यावरून परिंड्याचा मार्ग धरूं नये. पण हें न ऐकतां निजाम मार्चच्या आरंभीं घाट उतरला व खर्ड्याच्या उत्तरेस तेलिंगसीस त्याचा तळ पडला. तेव्हां युद्धास खरी सुरवात झाली. यापूर्वीं पेशवेहि मुळामुठेच्या कांठानें वर सरकत भीमा ओलांडून नगर जिल्ह्यांतील श्रीगोंदें तालुका ओलांडून सीनेवर दाखल झाले. नंतर सीना ओलांडून पूर्वेस खडकत गांवावर जिवबादादा बक्षी शिंद्यांचें उत्तरेंतील सैन्य घेऊन भेटले. खडकापासून खर्डे हा सुमारें वीस मैलाच्या आंतील टापू आहे. पुढें सैन्याचा मुक्काम विंचरना नदीवर धानूर व फकराबाद या गांवामध्यें झाला. व येथेंच पेशव्यांचा पिछाडीचा तळ राहिला. धानूरच्या ईशान्येस रत्नापूर येथें खुद्द पेशव्यांचा डेरा होता व तेथेंच नाना फडणीस, मॅलेट, निजामाचा वकील मीरआलम व रायराया हे होते. निजाम तेलिंगसीस ४ मार्च रोजीं घेऊन पोहोंचला तेव्हां त्याच्या तोंडावर जिवबादादा, बाबा फडके व परशुरामभाऊ पुढें झाले. या युद्धांत परशुरामभाऊला मुख्य सेनापति म्हणून जाहीर करून पेशव्यानें इतर सरदारांना त्याच्या हुकुमा-प्रमाणें वागण्याचा हुकुम सोडला. निजामी फौजेच्या आघाडीच्या तुकड्या आसदअल्लीखान याच्या हाता-खालीं असून तो मुषीराचा उजवा हात होता. पहिल्या दोन दिवसांत या आघाडीच्या तुकड्यांची थोडी गोळागोळी होऊन दहावीस लोक ठार व जखमी झाले. निजाम जास्त पश्चिमेकडे न येतां खर नदीच्या डाव्या तीरानें खर्ड्याकडे चालला. आरंभीं त्याचा बेत खर्ड्यास मुक्काम करण्याचा नसून दक्षिणेकडे परिंड्याचा मार्ग चालण्याचा होता. पण मराठ्यांनीं विचार केला कीं असें करण्यानें युद्धाचा काळ लांबून आघाडीहि दूर जाते, तेव्हां निजामाला पुढें सरकूं द्यावयाचें नाहीं. हा लढाईचा मुख्य नकाशा ठरला.

खर्डे हें गांव नगर जिल्ह्यांतील जामखेड तालुक्यांत अगदीं पश्चिम सीमेवर असून तेथें निंबाळकरांची एक गढी होती. ती गांवाच्या दक्षिणेस नदीपार होती. पुणें ते खर्डे हें अंतर सव्वाशें मैलांच्या आंत असून तेथून बेदर पुढें तितकेंच आहे. मराठ्यांच्या सैन्यानें आपले बुनगे मागें विंचरना नदीवर ठेवलें. लढ्या फौजा पुढें सहासात मैल घोडेगांवावर खर्ड्याच्या पश्चिमेस तितक्याच अंतरावर दाखल झाल्या. उत्तरेकडून दक्षिणेकडे पिंपरगांव, घोडेगांव, वाघे, जवळकें व चिंचपूर अशीं गांवें कणारी नदीवर आहेत व तिला चिंचपुराजवळ तेलंगसीकडून येणारी खर नदी मिळते. ह्या दोन छोट्या नद्यांच्या मधील तीन चार मैल रुंदीचा टापू हें मुख्य युद्धक्षेत्र होय. तेथें दोन्ही फौजा समोरासमोर आल्या.

येथवर पल्ला आला तरी अजून निजामानें गोविंदराव काळयास निरोप दिला नव्हता. मुख्य लढाईपूर्वीं दोनच दिवस त्यानें पेशवे व सर्व मराठे सरदार यांकडे दौलताबादी द्राक्षांच्या डाल्या भेट म्हणून पाठ-विल्या होत्या. आतां सलोखा होण्याचा एकच मार्ग निजामास मोकळा होता. तो म्हणजे या सर्व बेबनावास आद्य कारण जो दिवाण मुषीर त्याला कैद

करुन पेशव्यांच्या ताब्यांत देणें. पण शपथेनें बांधला गेल्यामुळें निजाम तसें कांहीं करीना व मुषीर स्वतः माघार घेईना. मराठ्यांची होळी यावेळीं छावणींतच घोड्यावर बसून साजरी झाली. ता. ७ मार्च रोजीं परशरामभाऊच्या पाठीवर निजामाचें सैन्य नदी ओलांडून आल होतें. तें रात्र पडल्यामुळें माघारीं गेलें. ता. ८ रोजीं निजामानें विश्रांति घेतली. ता. ९ रोजीं त्यानें दक्षिणेकडे दोन मैल अंतर काटलें. मराठ्यांनीं लांबून तोफांची मारगिरी केली पण ते ओलांडून त्याच्या मजबूत गोलावर गेले नाहींत. ता. १० रोजीं निजाम पुनः थांबला. ता. ११ बुधवार रोजीं त्यानें मराठ्यांना मागें टाकून परिंड्याच्या रोखें मोठ्या पहांटे कूच केलें. तेव्हां मराठेहि नदीच्या कांठानें त्याशीं समांतर पुढें सरकूं लागले. सकाळीं दहाच्या सुमारास मोगल लष्कर खर्ड्याचे नैऋत्येस पांच मैलांवर तरडगांव खेड्याच्या सुमारें होतें. येथेंच मुख्य चकमक ऊर्फ लढाई झाली. नदीच्या कांठच्या एका टेकाडावर परशुरामभाऊ व बाबा फडके तोफा डागण्यासाठीं जागा ठरवीत असतांच मोगल स्वार त्वरेनें त्यांच्यावर दौडत आले. ते खोलांत असल्यामुळें त्यास दिसले नाहींत. अकस्मात् गांठल्यामुळें परशुराम-भाऊस कपाळावर व हातावर हलकी जखम लागली. त्याच्या शेजारीं उभा असलेला त्याचा चुलतपुतण्या विठ्ठलराव व चिंतामणभट खाडिलकर ठार झाले व व बाबा फडके, बबूराव वैद्य, गोविंदराव पिंगळे हे मागें पळाले. ही बातमी जासुदाकडून कळतांच उत्तरे-कडून जिवबादादा व दक्षिणेकडून नागपुरकरांचा विठ्ठलपंत परांजपे सुभेदार हुजरातीच्या मदतीस आले. भोसल्यांनीं बाणांनीं व पेरूच्या तोफांनीं मोग-लांचें घोडदळ उधळून लावलें. तेव्हां पुनः हुजरात जमून त्यांनीं मोंगलाचा पाठलाग केला. या जोराच्या हल्ल्यांत त्यांचा अंबारींतील सरदार लालखान ठार झाला व रावरंभा निंबाळकर, भारामल, आसदअल्ली हे जखमी होऊन मागें हटले. मराठ्यांस जय मिळाला. एवढें होईपर्यंत रात्रीची सहा घटका वेळ झाली.

एवढ्यानें निजामाच्या सैन्यास कांपरें भरलें. रात्री-च्या काळोखामुळें चंद्र उगवेपर्यंत कोणास धीर पुरेना. विशेषतः अंबारींत बसलेल्या निजामाच्या जनान्यांत हलकल्लोळ माजला. या जनान्यांत रक्षणास स्त्रियांचें खास पलटण होतें. त्यांच्या आरडा-ओरडीमुळें खुद्द निजामाचा विचार सुटून तो दक्षिणे-कडे पुढें सटकण्याऐवजीं ईशान्येकडे खर्ड्यास परतला व त्यानें तेथील लहान गढीचा आश्रय घेतला. युद्ध-शास्त्रदृष्ट्या त्यानें घोडचूक करुन स्वतःला कोंडून घेतलें. खर्ड्याच्या तिन्ही बाजूस डोंगर असून नदी-कडची एकच उघडी बाजू मराठी फौजांनीं रोखून धरिली. निजामाचा फ्रेंच सरदार रेमू याला परत फिर-ण्याचा हुकूम आला तेव्हां त्याला आश्चर्य वाटलें; पण हुकुमापुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं. निजाम आपल्या जनान्यासह व खजिना घेऊन पहांटेच्या चार घटका रात्रीस गढींत शिरला व बाकीचें सैन्य त्याच्या पाठो-पाठ भीतीनें मागें फिरलें. सैन्याबरोबरील बाजार व बुनगे सर्व खर्ड्याच्या दक्षिणेकडील ता. ११ च्या तळावर तसेच राहिले. तसेच तोफा, दारुगोळा, सामान लादलेलीं उंटें व बैल हेहि मागें राहिले. मराठ्यांची फौज रात्रीं पहाऱ्यावर उभी होतीच. तिला सकाळ होताच सर्व बनाव कळून चुकला व त्यांनीं हा सर्व तळ लुटून फस्त केला. उत्तरेकडून पेरूचे कवायती सैन्य व तोफा त्याची मोहरीघाटानें परत जाण्याची वाट व नदीचें व विहिरीचें पाणी रोखून उभ्या राहिल्या. दक्षिणेकडून पेशव्यांची हुजरात व भोसल्यांचें घोडदळ तोफा पसरुन उभें राहिलें. निजामानें एक दिवस कसा-तरी टिकाव धरला. पण दुसऱ्या दिवशीं अन्न व पाणी याचा त्याच्या फौजेंत अगदीं तुटवडा पडल्या-मुळें त्यानें पेशव्याकडे ‘ लढाई बंद करा ’ असें बोलणें लाविलें व ‘ तह तुम्हांस हवा तसा होईल ’ असें सांगितलें. त्यावरुन तोफांची मारगिरी बंद करण्यांत आली. नंतर निजामबरोबर असलेला पेशव्यां-चा वकील गोविंदराव काळे यास तहाच्या अटी ठर-विण्यासाठीं पेशव्यांकडे पाठविण्यांत आलें. हा तहाचा घोळहि पंधरा दिवस पडला होता. कारण अजूनहि निजाम मुषीराला स्वाधीन करीना किंवा तो आपला हेका सोडीना. पण या पंधरा दिवसांत एवढे हाल त्याच्या सैन्याला सोसावे लागले कीं तेंहि बर्दळीवर येऊन त्यानें मुषीराला छावणींत राहणें अशक्य करून सोडलें. तेव्हां अखेर सर्वांच्या शिव्या घेत मुषीर छावणी सोडून गोविंदराव काळ्याबरोबर पेशव्याकडे

ता. २७ मार्च रोजीं येऊन पोंचला. इतक्या उर्मट माणसाचाहि नानानी किंवा पेशव्यांनीं तिलमात्र अपमान केला नाहीं. नाना त्याला पाऊणकोस व पेशवे छावणीबाहेर सामोरे येऊन घेऊन गेले व त्यांनीं त्याचा सन्मानच केला व त्याला आपल्या खास डेऱ्याजवळ रहावयास जागा दिली. मात्र त्याच्या डेऱ्याभोंवतीं चौकी-पहारा ठेवण्यांत आला.

निजामानें तहानें आपली थकलेली चौथाई सरदेशमुखी व घासदाणा यांची बाकी तीन कोट रुपये देऊन फेडण्याचें कबूल केलें. तसेंच सन १७७५ सालीं बारभाईना मिळाल्याबद्दल त्याला देण्यांत आलेला सर्व मुलुख दौलताबादच्या किल्ल्यासहित त्याकडून परत घेण्यांत आला. पण वस्तुतः ही संधि मराठे म्हणते तर निजामाला नाहींसा करण्याचीच होती व तसें करावें असें शिंद्यांचा सेनापति जिवबादादा बक्षी याचा आग्रह होता. पण निजाम आयत्या वेळीं उपयोगी पडला होता म्हणून नानानीं व त्याचा पुष्कळ दिवस घरोबा चालत आला म्हणून पेशव्यांनीं तसें कांहीं करण्याचें मनांतहि आणलें नाहीं. वस्तुतः यानंतरहि तो तहाच्या अटी पाळण्यांत चुकवाचुकवी करतांना आढळतो. पण शरण आलेल्यास जीवदान देण्याची सर्व हिंदूंची मनोवृत्ति यावेळीं मराठ्यांनींहि अनुसरली. याचाच परिणाम निजामशाही पुढें दीड शतकें मराठ्यांना व अखिल भारताला बाधण्यांत झाला ही गोष्ट इतिहासज्ञांना सांगणें नकोच.

या युद्धाची बातमी संपूर्णपणें देणारीं पांचशें मोडी पत्रें अजूनहि अस्तित्वांत आहेत. त्यांवरून कितीतरी बारकाव्याच्या व मनोरंजक हकिगती आपणांस कळतात. निजामाच्या हाताखालील रावरंभा निंबाळकर, घाटगे, पांढरे, सुंगीकर राजे, रायरायां, नेमिवंत प्रभृति अनेक मराठे या युद्धांत असल्यानें हें युद्ध एका अर्थी आपसांतीलच युद्ध भासत होतें. ते येऊन पेशव्यांकडील सरदारांना आपला मुलुख राखण्यासाठीं विनंति करीतच होते व पेशव्यांचे सरदार त्यांना परोपरीनें मदत करून राखीतच होते. प्रत्येक मराठे सरदाराचा स्वतंत्र वकील निजामाकडे जात येत होताच. दिल्लीच्या बादशहाला या जयाची बातमी त्याच दिवशीं खास दूत पाठवून जिवबादादानें कळविली, ती फक्त सात दिवसांत दिल्लीस जाऊन पोंहोचली. बादशहानें आनंद होऊन चार कासिदांस आठ सोन्याचीं कडीं दिलीं व ते पुन्हा दहा दिवसांत परत जिवबादादाला ता. २९ मार्च रोजीं येऊन भेटले. या युद्धांत दुर्बिणींचा उपयोग सेनापति करीत होते. आपल्याकडील धान्य व पीठ शत्रूला विकून चार पैसे करणारे काळेबाजारवालेहि दिसतात. हुजुरातीचा मुख्य बाबा फडके याला 'पुढें न जातां मागें परत' म्हणून सांगून अवसान खते करणारा भास्करराव चाफेकर; तो परत फिरत नाहीं म्हणून कपाळ बडवून घेणारा महादजी शितोळे; त्याची निर्भर्त्सना करून पुनः ईरे आणणारा जिवबाचा जासूद; घाबरून पळणारे मुत्सद्दी पिंगळे व वैद्य; तहानेनें व्याकुळ झाल्यामुळें निःशस्त्र नागडे-उघडे येऊन नदीचें पाणी पशूप्रमाणें तोंडानें पिणारे सैनिक; मुषीर पेशव्याकडे येतांना त्याला शिव्याशाप देणारे सैनिक, बाणी व बकाल; निजामकडून वकीलाबरोबर पाठविलेलीं मिठाईचीं तबकें; पेशव्याकडे पाठविला जाणारा भाजीपाला व द्राक्षें, महाळुंगें, डाळिंबें; सवाई माधवराव पेशव्याची रत्नापूरच्या छावणीतील दिनचर्या; सर्व मराठे सरदारांबरोबर छावणींतहि असलेले त्यांचे देव; छावणींतील उपवास; रामनवमी उत्साह व हजार ब्राह्मणांचें भोजन; ऐन लढाईच्या वेळींहि मधून मधून चालणारें गायन-वादन व नाच; तसेंच बुद्धिबळाचा व गंजीफाचा खेळ; जखम्यांची व्यवस्था व सैनिकांना बक्षिसें; आणि म्हातारा जुनाट माहितगार महादाजीपंत गुरुजी याचें एक महिन्यानंतर पुण्याहून मुद्दाम माहिती देण्यासाठीं छावणींत येणें — अशा कितीतरी मनोरंजक, उद्बोधक माहिती देणाऱ्या व हृदयाला भिडणाऱ्या गोष्टी आपणाला कळतात.

यंत्रें तीन प्रकारचीं आहेत : (१) वेळ वांचविणारीं यंत्रें जशीं विमानें, रेडिओ – हीं आम्हांला हवींत. (२) विनाशक यंत्रें – हीं आम्हांला नकोत. (३) कापडगिरण्यांसारखीं उत्पादक यंत्रें – त्यांच्या आम्ही विरुद्ध नाहीं. आम्हांला एवढेंच वाटतें कीं, बेकारी व लोकसंख्येची इकडून तिकडे मोठी ये–जा होणार नाहीं, अशा रीतीनें व क्रमानें हीं यंत्रें वापरलीं जावींत. त्या दृष्टीनें चर्खा हा मला उत्तम उपाय वाटतो. पण तो अर्थात् सार्वकालिक व सार्वभौम नव्हे. आमच्या देशाला प्रस्तुत काळीं तो योग्य आहे. प्रत्येक देशाला, नेहमींच नव्हे.

—आचार्य विनोबा (परदेशी वृत्तपत्र-प्रतिनिधीला दिलेल्या मुलाखतीवरून.–'हरिजन' १०।४।५४

श्री. रतनलाल पी. भंडारी

प्रेतावरचे पैसे !

“ राम बोलो भाई राम ! ” चा आवाज घुमत होता. पुढें भजनी मंडळी चालली होती. मृदंग आणि टाळ भजनाच्या चरणाला साथ देत होते. पंचमहाभूतांत लवकरच विलीन होणाऱ्या निस्तेज शरीरावरून खुर्दा उधळला जात होता. डोळयांत आलेले अश्रू पुसत कांहीं स्त्रिया प्रेतापाठीमागून चालल्या होत्या. त्या दुःखी जनसमूहांत दहापांच भिकारी मात्र एकमेकांकडे असूयेनें पहात होते. त्यांच्या नजरेंत आनंद आणि असूया ह्यांचें विचित्र मिश्रण दिसत होतें. मुठींत सांठविलेला खुर्दा अंगावरच्या लक्तरांतील धडक्या खिशांत लपविण्याची त्यांची घाई चालली होती. प्रेताच्या मुखावर आपल्या पदरानें वारा घालीत एक स्त्री चालली होती. तिच्या जवळच हातभर अंतरावर एक इसम एका पिशवींतून मुठी भरभरून खुर्दा काढून तो प्रेतावरून उधळीत होता. खुर्दा उधळण्यांत विशिष्ट पद्धत होती. तो अशा प्रकारें खुर्दा उधळी कीं गोळा करण्यासाठीं धडपडणाऱ्या भिकाऱ्यांची चांगलीच धांवपळ व्हावी !

पैसे उधळले जात होते आणि डांबरी सडकेवर त्यांचा आवाज होत होता. दोन आण्याची एक चवली खण् खण् करीत रामच्या पायाजवळ येऊन पडली. भकासपणें तो त्या चवलीकडे पहात राहिला. मी हातांत सायकल घेऊन फिरत फिरत चाललों होतों. त्याच्याकडे माझें लक्ष गेलें.

मी रामला चांगलाच ओळखीत होतों. त्याची आई बिछान्याला खिळलेली होती. जन्मभर कष्ट करून रखमानें त्याला तुळशीच्या रोपट्याप्रमाणें वाढविलें होतें. तें चिमुकलें रोपटें सांवटूं नये म्हणून ती हरतऱ्हेनें खबरदारी घेत होती. कधीं कधीं ती माझ्याकडे येई आणि आशेनें भरलेल्या नेत्रांनीं म्हणे : “ बाबा ! ही सारी धडपड रामसाठीं. मी त्याचे फार लाड करते म्हणून तूं रागावतोस खरा; पण माझ्या साऱ्या आशा त्याच्यावर आहेत. ” ती असें बोलूं लागली म्हणजे मी एखादे वेळीं रागावून म्हणे : “ रखमा, जवळ घेऊन बस त्याला. नुसता लाडोबा करून ठेवला आहेस ! ” कधीं कधीं मात्र मला तिच्या त्या प्रेमाचें कौतुक वाटावयाचें. तिच्या डोळयांत सदैव तरळत असलेलें भविष्याचें चित्र आणि कर्तव्यपूर्तीचा आनंद बघून माझ्या रागाचा पारा वितळून जात असे.

आज सकाळींच राम माझ्याकडे आला होता. त्याचा चेहरा कोमेजून गेला होता. डोळयांच्या कडा पाणावलेल्या होत्या. तो भरपूर रडला असल्याचा भास होत होता. काय झालें असेल, मला कसलीच कल्पना नव्हती. मी मनांत विचार करीत होतों. गरीबांना अनंत दुःखें, अनंत अडचणी. त्यांचें जीवन म्हणजे खरा यज्ञ. सद्‌गदित आवाजांत राम मला म्हणाला होता : “ शशीदादा ! अरे आई पहा कशी करतेय् ती. ” मी घाईघाईनें कपडे घातले आणि त्याच्याबरोबर निघालों.

रामच्या घरीं आज मी प्रथमच गेलों होतों. रखमा माझी खोली वेळेवर झाडायची, चार गोष्टी बोलायची आणि निघून जायची. त्यामुळें तिच्या घरीं जाण्याचा कधीं प्रसंगच आला नव्हता. रखमा एका लहानशा छपरींत रहात होती. तिच्या त्या छपरींत दारिद्र्याच्या खुणा सर्वत्र पसरलेल्या होत्या. जमिनीला ओल सुटली होती. दोन फाटक्या वहाणा केरसुणीच्या कुशींत लपलेल्या होत्या. केराचा ढिगारा केरसुणीच्या खालीं तसाच पडलेला होता. नुकतीच पेटूं घातलेली चूल धुमसत होती. सारा धूर छपरींत कोंडला होता. छपरीच्या आढयांतून धूर हळूंहळूं बाहेर पडत होता. सारी छपरी जणुं आंतून पेटली होती. कोपऱ्यांत एक ताट आणि दोनतीन पितळेचीं भांडीं तेथल्या त्या दारिद्र्याला उठाव देत होती. तिथेंच जवळच एक पोतें अंथरून रखमा झोपलेली होती. ती कण्हत होती. क्षीण होत चाललेल्या आत्म्याचें जणुं रुदनच होतें तें ! मी तिच्याजवळ जात म्हटलें, “ रखमाई, काय होतंय् ग तुला ? ”

तिनें आपल्या तोंडांवरुन मुसकटून घेतलेली सतरंजी दूर केली. आपले कण्हणें रोखून धरीत ती म्हणाली : " राम, कशाला त्रास दिलास त्याला. थोड्या वेळांत बरें वाटेल मला. " क्षणभर रोखलेला श्वास तिनें सोडून दिला. मी तिच्या कपाळाला हात लावून पाहिलं. जळत होतं नुसतं तें. मी लगबगीनें तिचा निरोप घेऊन खोलीवर आलों. रामजवळ पॅल्युड्रिनच्या गोळ्या देत मी त्याला म्हणालों, " राम, आईला चहा-टून दे या. "

राम गेला, पण त्याच्या नजरेंतील असहायता मला बोंचल्याशिवाय राहिली नाहीं. इतक्यांत मला आठवण झाली. मी त्याला हांक मारुन परत बोलाविलें आणि त्याच्या हातांत चवली ठेवीत मी त्याला म्हटलें, " राम, हे पैसे घे आणि चहा व साखर आण. दूध येथूनच घेऊन जा. "

रामनें कृतज्ञतेनें माझ्याकडे पाहिलें होतें आणि भावनेच्या आवेगानें दुःखाला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्या गालावरुन आंसवें घरंगळलीं होतीं. क्षणभर काय करावें हेंच मला सुचेना. मी त्याला जवळ ओढून घेतलें. तुम्ही जर कधीं सुकलेल्या गुलाबावर पडलेले पाण्याचे थेंब पाहिले असतील तर त्याच्या त्या आंसवांतील भावनाकुलतेची कल्पना येईल तुम्हांला. मी त्याची हनुवटी वर उचलीत म्हणालों, " रडतोस वेड्या. बरं वाटेल हो तुझ्या आईला. जा, तिला चहा करुन दे. "

राम डोळे पुशीत न बोलतांच निघून गेला होता. परंतु तेव्हांपासून मला दिवसभर एकप्रकारच्या उदासीनतेनें घेरुन टाकलें होतें. माझ्या त्या उदासीनतेंत असहायता होती.

सकाळचा तो प्रसंग अजूनहि माझ्या डोळ्यापुढें होता. रामचा विचार अजूनहि चालूच होता. त्यानें आपल्या पायाखालीं चवली दाबून धरली होती. त्याच्या मुद्रेवर असंख्य भावनांची व्याकुळता हेलावत होती. क्षणांत तो खिन्न दिसे तर क्षणांत भेदरट. त्यानें कावऱ्याबावऱ्या नजरेनें आजूबाजूला पाहिलें आणि चटकन् ती चवली उचलली. जवळजवळ पळतच तो ' रीगल'मध्यें शिरला. क्षणभर तो माझ्या नजरेआड झाला. मला त्याचा अत्यंत राग आला होता. मनांतील पूर्वीची अनुकंपा एकदम कुठें दडी मारुन बसली कोण जाणे ! मी रागानें रीगलमध्यें शिरलों. राम कॉउंटरवर पैसे देत होता. मी त्याच्या मुठीकडे पाहिलें. त्यानें ती अगदी घट्ट दाबून धरली होती. मी त्याच्यावर जवळजवळ खेकसलोंच. " तिकडे आई तुझ्यासाठीं मरमर मरते आहे आणि तूं मात्र गोळ्या खात गांवभर हिंड. राम, मूठ उघड पाहूं ती ! "

तो कावराबावरा झाला. त्याचे हात थरथरत होते आणि डोळयांतील अश्रू धरणीची भेट घेण्यासाठीं आतुरले होते. त्यानें मूठ उघडली तों काय ! त्याच्या तळहातावरची पॅल्युड्रिनची गोळी माझ्याकडे पहात हंसत होती. मी क्षणभर शरमेनें मान खालीं घातली !

इस्लामचें ऐतिहासिक कार्य

इस्लामनें नव विचाराचीं दोन शस्त्रें निर्माण करावयास साहाय्य केलें : एक, प्रायोगिक विज्ञान आणि दुसरें बुद्धिवादी तत्त्वज्ञान. या दोन साधनांमुळें नव सामाजिक क्रान्ति घडून यायला अनुकूल परिस्थिति उत्पन्न झाली.

मध्ययुगीन असंस्कृतपणाच्या वेबंदशाहींतून युरोपला मांडवलदारी उत्पादनपद्धतीनें सोडविलें. या मांडवलदारी उत्पादनपद्धतीनें बुद्धिवादी तत्त्वज्ञानाच्या सामर्थ्यशाली साधनानें ख्रिस्ती धर्मशास्त्र व कॅथॉलिक चर्चची आध्यात्मिक मिरासदारी या दोहोंशीं झगडा करुन दोहोंनाहि पराभूत केलें. हें बुद्धिवादी तत्त्वज्ञानाचें साधन पहिल्यांदा ग्रीसमधील प्राचीन विचारवंतांनीं शोधून काढलें. **अरब पंडितांनीं** त्याची अत्यंत काळजीपूर्वक जतन करुन त्यांत अत्यंत मोलाची भर घातली. **अरब पंडितांकडून** तें साधन अर्वाचीन संस्कृतीच्या संस्थापकांकडे आलें. **अरबी मरुभूमींतल्या या भटक्या जमातींनीं** इस्लामच्या धार्मिक निशाणाखालीं जें ऐतिहासिक महत्त्वाचें युद्ध सुरुं केलें तें एक हजार वर्षें धीरे धीरे आगे कूच करीत राहिलें. त्या युद्धाचें रणक्षेत्र तीन खंडांतून पसरलें होतें. शेवटीं, युरोपमध्यें १८ व्या शतकांत प्रबोधन घडवून आणणाऱ्या क्रांतिकारकांनीं निधर्मी निशाणाखालीं विजय मिळवून त्या युद्धाचा शेवट झाला.

—मानवेन्द्रनाथ रॉय, ' The Historical Role of Islam ' मधून

अनुक्रमणिका

‘ डेफिसिट फिनॅन्सिंग ’ बद्दल कांहीं विचार: प्रा. अ. ना. लोथे

तुटीचें अर्थकारण

सनातनवादी अर्थशास्त्रज्ञांनीं अंगीकारलेलें अ-नियंत्रणवादी (laissez–faire) धोरण जाऊन राष्ट्राच्या आर्थिक प्रगतीकरितां सरकारी आर्थिक धोरण जास्त प्रभावी ठरतें असा विचारप्रवाह नव्या अर्थ-शास्त्रांत बळावला. विशेषतः पहिल्या महायुद्धानंतर जी जागतिक मंदी आली त्या मंदीमुळें निरनिराळ्या प्रकारचीं आर्थिक धोरणें पुरस्कारिलीं गेलीं. शासनपद्धति आर्थिक व्यवहाराशीं सुसंगत नसल्यास सामाजिक जीवनांत संघर्ष निर्माण होतात. म्हणून ज्या मूलसिद्धान्तावर शासनसंस्था आधारलेली आहे, त्यांना अनुसरून देशांतील अर्थ-व्यवस्था व राजस्व–नीति (Public Finance) असावयास पाहिजे. सध्याच्या काळांत सरकारचें कार्यक्षेत्र व उद्दिष्टें व्यापक होत आहेत. कल्याणकारी सरकार जनतेचें जीवनमान सुधारील आणि आर्थिक विषमता दूर करील, ह्या समाजहितकारक उद्दिष्टानुरूप अर्थव्यवस्था प्रस्थापित करण्यांत सरकारी फडणिशी नीति फार प्रभावी ठरते. अर्थव्यवस्थेंत व्यापारचक्रादि आपत्ती कालक्रमानें उद्भवत असतात. ह्या आपत्ती आर्थिक व्यवस्थेंतील प्रवाहामुळें आपोआप नाहींशा होत नाहींत. त्याकरितां विशिष्ट धोरणच स्वीकारणें भाग पडतें. त्याचप्रमाणें पूर्ण वृत्तिमत्त्व (full employment) प्रस्था-पित करावयाचें असल्यास सरकारला विशिष्ट योजना आंखावी लागते. अशी योजना कार्यान्वित करण्याकरितां सरकार उद्दिष्टांनुसार आपलें आर्थिक धोरण बदलतें भारतामध्यें पंच-वार्षिक योजना फलद्रूप करण्याकरितां तुटीच्या अंदाजपत्रकी धोरणाचा उपयोग होत आहे. त्यामुळें ह्या आर्थिक धोरणाला सध्या विशेष महत्त्व प्राप्त झालें आहे. ह्या धोरणाचें भारतावर संभाव्य परि-णाम काय होतील ह्याचा विचार करण्यापूर्वी तुटीचें अर्थकारण (deficit financing) म्हणजे काय ह्याचा थोडा खुलासा करणें आवश्यक आहे.

सरकारी तिजोरींत कर, सरकारी धंद्यांचें उत्पन्न, कर्जें इत्यादि मार्गांनीं पैसा जमा होत असतो. आणि ह्या उत्पन्नांतूनच नेहमींचा मुलकी खर्च भागविण्यांत येत असतो. परंतु पुष्कळ वेळेला सरकारच्या गरजा वाढतात आणि म्हणून सरकारी खर्च वाढत असतो. नेहमीच्या मार्गांनीं उत्पन्नांत तावडतोब वाढ करणें शक्य नसतें. खर्च करणें अत्यंत आवश्यक असल्यास अशा वेळेस उत्पन्नाच्या तुटीची व्यवस्था चलनविस्तार करून केली जाते. विशिष्ट धोरण अंगीकारीत असतांना सरकारला नेहमीपेक्षां जादा खर्च करणें भाग पडत असेल, किंबहुना जास्त खर्च करण्यावरच योजनेची यश-स्विता अवलंबून असेल तर अशा वेळेस सरकार मध्य-वर्ती अधिकोषा-(Bank)करवीं जास्तीच पैसा निर्माण करून उत्पन्नाची तूट भरून काढील. शक्य तोंवर कर, कर्जें इत्यादींनींच काम भागविलें जाईल. जवळ असलेल्या रोकड शिलकेचा देखील उपयोग करण्यांत येईल. परंतु इतकें करूनहि जर खर्चाच्या प्रमाणांत उत्पन्न वाढलें नाहीं, तर सरकारला अगतिक होऊन जरूरीपुरतें जादा चलन निर्माण करावें लागतें. ह्यालाच ‘ तुटीचें अर्थकारण ’ असें म्हणतात.

भांडवलशाही अर्थव्यवस्थंत खाजगी गुंतवणूक कमी पडते म्हणून मंदी निर्माण होते आणि मंदीमुळें बेकारीसारख्या आपत्ती उद्भवतात. ही तात्कालिक मंदी दूर करण्याकरितां सरकारनें पुढाकार घेऊन नवीन नवीन सार्वजनिक कामें सुरू करून जर त्यांवरील खर्च वाढविला तर ह्यामुळें बऱ्याच बेकार लोकांना रोजगार मिळेल, त्यांचें उत्पन्न वाढेल, बऱ्याच वस्तूंकरितां मागणी वाढेल आणि त्यामुळें उत्पादकांना उत्पादन करण्यास प्रोत्साहन मिळेल. मंदी जाऊन तेजीस सुर-वात होईल. ह्या तात्कालिक उपायांचा परिणाम देखील दीर्घकाल टिकणारा नसतो. सरकारी उत्पन्नापेक्षां सरकारी खर्चाचें प्रमाण वाढविण्याची आणि ही तूट चलनवाढ करून भरून काढण्याची आवश्यकता ह्यापूर्वी प्रामुख्यानें युद्धकालांतच भासली. युद्धकालांत खर्चाच्या वाढीच्या प्रमाणांत

उत्पादन वाढत नाहीं कारण हा खर्चच मुळीं उत्पादक स्वरूपाचा नसतो. उपभोग्य वस्तूंचें उत्पादन वाढत नसल्यामुळें जीवनावश्यक वस्तू दुर्मिळ बनतात आणि त्यांच्या किंमती भरमसाट वाढतात. त्यामुळें बचत देखील फारशी होऊं शकत नाहीं. बचतीचा अभाव आणि उपभोग्य वस्तूंची चणचण ह्यामुळें युद्धकालांत सरकारच्या वाढत्या खर्चाचा म्हणजे पर्यायानें चलन-वाढीचा परिणाम किंमती भरमसाठ वाढण्यांत होतो. त्यामुळें चलनवाढ झाली कीं किंमती वाढतातच अशी ठाम समजूत झालेली असते. ह्यापूर्वी तुटीच्या अर्थ-व्यवस्थे-(deficit dfinancing) चा उपयोग दूरगामी आर्थिक प्रगति घडवून आणण्याकरितां फारसा करण्यांत आला नव्हता. त्यामुळें ह्या धोरणाच्या यश-स्वितेबद्दल सर्वसाधारण जनतेच्या मनांत शंका अस-ल्यास नवल नाहीं. अर्धविकसित देशांमध्यें सर्वांगीण आणि कायम स्वरूपाची आर्थिक प्रगति साधण्याकरितां ह्या धोरणाचा कितपत उपयोग होऊं शकेल हेंच आपल्या दृष्टीनें सध्या महत्त्वाचें आहे.

आर्थिक विकास होण्याकरितां देशांतील सर्व उत्पा-दन-साधनांची उत्पादकता वाढविणें अपरिहार्य असतें. उत्पादकता वाढल्यानेंच राष्ट्रीय उत्पन्न वाढेल, जीवन-मान उंचावेल आणि एकंदर आर्थिक स्थिति सुधारेल. उत्पादकता वाढविण्याकरितां आतांपर्यंत उपयोगांत न आणलेलीं उत्पादनसाधनें उपयोगांत आणावीं लाग-तात. भांडवली मालाचें उत्पादन वाढवावें लागतें, योग्य तंत्रविज्ञानविषयक शिक्षण, आरोग्य इत्यादींनी श्रमिकां-ची कार्यक्षमता वाढविणें आवश्यक असतें आणि संयोजकांना उत्पादन वाढविण्याकरितां प्रेरणा (in-centive) द्यावी लागते. भांडवलाची निर्मिति (capital-formation) आणि वाढ हीं आर्थिक विकासाकरितां अत्यंत आवश्यक आहेत. उत्पादन वाढविण्याकरितां पुरेसें भांडवल गुंतविलें गेलें पाहिजे आणि तें गुंतविण्याकरितां पुरेशी बचत झाली पाहिजे.

नेहमीच्या परिस्थितींत अधिकोष (Bank) उत्पा-दकांना योग्य तारणावर कर्जें देतात आणि ह्या कर्जाचा विनियोग उत्पादन वाढविण्याकडे केला जातो. उत्पादनाचें परिमाण वाढविण्याकरितां, नैसर्गिक साधनें, मजूर इत्यादि घटक कामावर लावण्याकरितां उत्पादकांना अधिक किंमत द्यावी लागते. उत्पादक वस्तूंप्रमाणेंच उपभोग्य वस्तूंच्या उत्पादकांनाहि उत्पादनघटकांना अधिक किंमत देणें भाग पडतें. अशा रीतीनें वस्तूंचा उत्पादनव्यय वाढला म्हणजे त्यांच्या किंमती देखील वाढूं लागतात. बँकांनीं केलेल्या प्रत्यय-विस्तारा-(credit expan-sion)-मुळें किंमती वाढतात. परंतु ही किंमतीची वाढ नेहमी वाईटच असते असें नाहीं. किंमती वाढल्यामुळें उपभोग कमी होतो आणि परिणामतः झालेली बचत भांडवल-निर्मितीच्या उपयोगास येते. गुंतवणूक वाढली आणि त्याबरोबर जर बचत वाढली नाहीं, तर गुंतवणूक आणि बचत ह्यांतील समतोलपणा राखण्याकरितां जास्तीची बचत किंमती वाढून घडून येते. ऐच्छिक संचय (Voluntary Savings) कमी पडल्यास त्याची तूट सक्तीच्या संचया-(for-ced savings) नें, मूल्य-यन्त्रणा (price me-chanism) भरून काढते. अधिकोष-व्यवस्थेनें उत्तेजित केलेली गुंतवणूक मर्यादित असते. कारण अधिकोषांचा प्रत्ययविस्तार त्यांच्याजवळील रोकडींनीं मर्यादित असतो. अप्रगत राष्ट्रामध्यें भांडवलनिर्मिति मोठ्या प्रमाणावर घडवून आणण्याकरितां खाजगी आणि सरकारी अशा दोन्हींचें गुंतवणुकीचें परिमाण बचतीच्या परिमाणापेक्षां जास्त झाल्यास मूल्यवाढ संभवते. गुंतवणुकीवरील खर्चाच्या वाढीमुळें निष्पन्न झालेली उत्पन्नाची तूट चलनविस्तार करून जर भरून काढली तर मूल्यवृद्धि होईल. परंतु वर सांगितल्याप्रमाणें ही मूल्यवृद्धि नेहमींच वाईट असते असें नाहीं. कारण ह्या मूल्यवृद्धीनेंच सक्तीचा संचय घडवून आणला जातो.

परंतु ही किंमतीची वाढ जर आवर्ती (recurring) स्वरूपाची ठरेल तर तिला मूल्यवृद्धि न म्हणतां मूल्या-तिवृद्धि (inflation) असें म्हटलें पाहिजे. वस्तूं-च्या किंमती वाढतात, त्यामुळें राहणीचा खर्च वाढतो, मजुरी वाढते, उत्पादनव्यय वाढतो आणि त्याचा परिणाम पुन्हा वस्तूंच्या किंमती वाढण्यांत होतो. सरकारी खर्चाच्या वाढाव्यामुळें उत्पन्नांतील तूट चलना-चें परिमाण वाढवून भरून काढल्यास मूल्यातिवृद्धि होईलच असें सांगतां येत नाहीं. त्याचबरोबर अशा अतिवृद्धीचा संभव मात्र जरूर असतो हेंहि तितकेंच खरें. त्यामुळें तुटीच्या प्रबन्धनाचा वापर फारच सावध-गिरीनें करावा लागतो. हें धोरण गृहीत उद्दिष्टें साध्य

करण्याच्या दृष्टीनें उपकारक होईल किंवा अपकारक होईल हें उद्दिष्टाच्या स्वरूपावर अवलंबून राहील. लढाईसारख्या अनुत्पादक गोष्टीकरितां खर्च वाढविल्यास तुटीच्या अर्थसंकल्पी धोरणाचा परिणाम आर्थिक दृष्टीनें हितकारक ठरणार नाहीं. भांडवलनिर्मितीसारख्या उत्पादक कार्याकरितां जर तुटीची व्यवस्था चलनविस्तारानें केली तर त्याचे परिणाम काय होतील हें चलनविस्ताराच्या परिमाणावर अवलंबून राहील. किती जास्त पैसा अर्थव्यवस्था पेलूं शकेल हें प्रथम पाहिलें पाहिजे. चलनपुरवठा वाढल्यामुळें उत्पादनशक्तीला चालना मिळेल आणि त्यामुळें लोकांचें उत्पन्न वाढेल. हा पैसा कर वाढवून, देशान्तर्गत कर्जें उभारून आणि बचतीला उत्तेजन देऊन सरकारनें आपल्याकडे खेंचला पाहिजे. ह्या उपायांमुळें आवश्यकतेपेक्षां जास्त पैसा आर्थिक व्यवस्थेंत खेळता राहणार नाहीं आणि चलनातिविस्ताराचे दुष्परिणाम दिसणार नाहींत. सारांश, (१) अनुकूल वातावरण (२) चलनवाढीचें परिमाण (extent) आणि (३) जास्तीचा पैसा ओढून घेण्याचे परिणामकारक उपाय — ह्या तीन प्रमुख गोष्टींवर तुटीच्या अर्थकारणाची यशस्विता अवलंबून असते.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर भारतामध्यें ह्या धोरणाचे काय परिणाम होतील हें पाहिलें पाहिजे. देशाची आर्थिक प्रगति साधण्याकरितां, जनतेचें जीवनमान सुधारण्याकरितां सर्वकष स्वरूपाची पंचवार्षिक योजना (१९५१–५६) अंमलांत आणली जात आहे. हीं उद्दिष्टें साध्य करण्याकरितां वर नमूद केल्याप्रमाणें भांडवलनिर्मिति अत्यंत आवश्यक आहे. पंचवार्षिक योजनेंत निरनिराळ्या विकास-योजनांवर २०६९ कोटि रुपयांचा भांडवली खर्च करण्याचें योजिलें होतें. परंतु गेल्या वर्षी बेकारीचें वाढतें उग्र स्वरूप लक्षांत घेऊन एकूण खर्चाचा आंकडा १७५ कोटी रु. नीं वाढविण्यांत आला. इतका खर्च शक्य तोंवर करादि नेहमींच्या साधनांनीं उत्पन्न वाढवून, कर्जें आणि परकीय मदत घेऊन चालवावा आणि इतकें करूनहि जर अंदाजपत्रकी तूट राहिलीच तर तितकी तूट रिझर्व्ह बँकेकरवीं जादा पैसा काढून भरून काढावी असें योजिलें आहे. २९० कोटी रु. इतकी तूट वरील प्रकारें भरून काढावी लागेल असा अंदाज नियोजनसमितीनें केला होता. अपरिहार्य असेल तेव्हांच चलनवाढ करावी अशी सावधगिरी आतांपर्यंत बाळगण्यांत आली. योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत केन्द्रीय सरकार आणि राज्यसरकारें मिळून अंदाजें १००० कोटि रु.चा भांडवली खर्च करण्यांत आला आहे. राहिलेल्या दोन वर्षांत जवळजवळ १२४५ कोटि रु. खर्च व्हावयाचे आहेत. इतका खर्च जर केला गेला तर योजनेंतील विकासकार्यक्रम पुरा केला जाईल. योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत विकासयोजनांवरील खर्चाची गति मंद होती. कारण योजिल्याप्रमाणें साधनांची जुळवाजुळव करणें इत्यादि गोष्टी दिरंगाईच्या असतात. त्यामुळें प्राथमिक अवस्थेंत विकासकार्यक्रमाची गति मंद असणें अपरिहार्य असतें. परंतु ह्यापुढें योजनेच्या सफलतेच्या दृष्टीनें आवश्यक साधनांचें परिमाण वाढविणें अतिशय जरूर आहे. त्याकरितां खर्चाची गति वाढविलीच पाहिजे.

ह्या वर्षीच्या अंदाजपत्रकांत भांडवली खर्चाचें प्रमाण वाढविण्याचा अर्थमंत्र्यांचा निर्धार प्रतिबिंबित झाला आहे. नवीन वर्षासाठीं भांडवली खर्चाकरितां १४५ कोटि ७५ लक्ष रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ह्याव्यतिरिक्त चालू वर्षासाठीं १६० कोटि रु. आणि पुढील वर्षासाठीं २१४ कोटि रु. राज्यसरकारांना कर्जें म्हणून द्यावे लागतील. अपेक्षित उत्पन्न धरून एकूण तुटीचा अंदाज २५० कोटि रु. चा करण्यांत आला आहे. ही तूट तितक्या रकमेची ट्रेझरी बिलें रिझर्व्ह बँकेला विकून भरून काढण्यांत येणार आहे. अनुमानित तुटीपेक्षां प्रत्यक्ष तूट जास्त निघण्याचा देखील संभव दृष्टीआड करतां येणार नाहीं. प्रत्यक्ष तुटीची रक्कम त्या त्या वेळेच्या परिस्थितीवरच अवलंबून राहील. सध्याच्या अंदाजाप्रमाणें २५० कोटि रु. इतकी चलनवाढ भारताची अर्थव्यवस्था पचवूं शकेल काय हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

कोणत्याहि विकासयोजनेच्या प्रगतीमधील मुख्य अडचण म्हणजे श्रम, कच्चा माल, भांडवली माल इत्यादि आवश्यक साधनांची दुष्प्राप्यता. चलन वाढविलें म्हणजे त्याबरोबरच इतर उत्पादक साधनें वाढतीलच असें निश्चितपणें सांगतां येत नाहीं. परंतु पैशाचा सांठा वाढला म्हणजे जीं साधनें निकामी पडलेलीं असतात ती उत्पादनांत आणलीं जातात. उद्योग-

अनुक्रमणिका

प्रधान आणि प्रगत अर्थव्यवस्थेंत जर मंदीमुळें कांहीं साधनें पूर्ण राबविलीं जात नसतील तर अशा वेळेस चलनवाढीमुळें हीं साधनें उपयोगांत आणलीं जाऊं शकतात. परंतु ज्या अर्थव्यवस्थेंत जास्तीचीं साधनें उपलब्ध नाहींत आणि आणखी वाढण्याचीं कांहींच शक्यता नाहीं, अशा ठिकाणीं पैशाचा पुरवठा वाढला तर त्याचा परिणाम किंमती भरमसाट वाढण्यांत होतो. चलनातिविस्ताराचे दुष्परिणाम दिसूं लागतात. भारतामध्यें बरींच उत्पादक साधनें उपयोगांत आणलीं गेलीं नाहींत याबद्दल दुमत नाहीं. मानवी श्रमाची विपुलता तर पुष्कळच आहे. परंतु नुसती श्रमशक्ति असूनच चालत नाहीं. तर जोडीला इतर उत्पादक साधनें देखील असावीं लागतात. श्रमशक्तीव्यतिरिक्त उत्पादन वाढवण्याकरितां आवश्यक असलेलीं साधनें (उदा०— शेत-जमीन, शेतीचीं साधनें, प्राथमिक भांडवल इ०) देखील हिन्दुस्थानांत उपलब्ध आहेत. इतकीं उत्पादक साधनें उपयोगांत आणलीं गेलीं नाहीं म्हणून पैशाच्या पुरवठ्यांतील वाढ अपकारक न ठरतां उपकारकच ठरेल. त्याचप्रमाणें अनेक उद्योगधंद्यांतील यंत्रसामग्रीची उत्पादनशक्ति तिच्या अंतिम मर्यादेपर्यंत राबविली गेलेली नाहीं. बहुसंख्य जनतेचें वास्तविक उत्पन्न कमी असल्यामुळें क्रयशक्तीचा बराच अभाव आहे. त्यामुळें कारखान्यांत तयार झालेल्या मालाला प्रभावी मागणी नाहीं. त्यामुळें उत्पादन वाढविलें जात नाहीं. यंत्रशक्तीचा पुरेपुर उपयोग केला जात नाहीं. चलनवाढीमुळें आणि त्यामुळें निष्पन्न होणाऱ्या विकास–कार्यक्रमांवरील खर्चाच्या वाढीमुळें लोकांचें उत्पन्न वाढेल, क्रयशक्ति वाढेल आणि उत्पादित वस्तूंकरितां मागणी प्रभावी होईल. वाढलेल्या उत्पन्नापैकीं सर्वच भाग अन्नवस्त्रादि आवश्यक गरजांवर खर्च होणार नाहीं. त्यांपैकी कांहीं भाग भांडवल-निर्मितीकरितां उपयोगांत येऊं शकेल. अर्थात् त्याकरितां उपभोगांवर नियंत्रण ठेऊन जनतेच्या बचती एकत्रित करुन त्या उपयुक्त (mobilise) करणें आवश्यक आहे.

यंदा आपल्या अंदाजपत्रकी भाषणांत सध्याचें आर्थिक वातावरण संकल्पित प्रमाणावर पैशाची वाढ करण्यास अनुकूल आहे, असा विश्वास अर्थमंत्र्यांनी प्रकट केला. दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण झालेल्या मूल्यातिवृद्धीचा दाब आतां ओसरूं लागला आहे. १९५३ च्या मध्यापासून किंमती हळूंहळूं उतरत आहेत. १९५३ मध्यें उत्पादनक्षेत्रांत डोळ्यांत भरण्यासारखी वाढ झाली. साखर, ज्यूट, लोखंड व पोलाद हे कांहीं धंदे वगळल्यास, इतर खाजगी उद्योगधंद्यांत उत्पादनाचे उच्चांक गांठले जात आहेत, हें खालील कांहीं आंकड्यांवरून दिसून येईल.

वरील कांही आंकडे निश्चित प्रगतीचे द्योतक समजायला हरकत नाहीं. शेतीच्या बाबतींत तर अनपेक्षित प्रगति दिसून येत आहे. धान्याचें उत्पादन

'औद्योगिक उत्पादनाचा निर्देशांक

(१९४६ = १००)

	१९५०	१९५१	१९५२	१९५३ (जानेवारी – सप्टेंबर)
साधारण निर्देशांक	१०५	११७.२	१२८.९	१३३.८
कोळसा	११०.८	११८.८	१२५.४	१२५.४
सिमेंट	१६१.५	२०७.२	२२९.३	२३७.८
कागद	१०२.७	१२४.४	१२९.७	१३३.२
सुती कापड	९३.८	१०४.३	११७.७	१२६.६
रासायनिक द्रव्यें	२२१.२	२६०.२	३८८.८	४८९.२

[ही माहिती 'The Eastern Economist' – च्या 'Special Budget Number' (1954-55) वरून घेतली आहे.]

वाढलें आहे आणि अंगीकृत केलेल्या निरनिराळ्या कृषिविषयक आणि त्या धंद्याला पोषक अशा विकास-योजनांमुळें हें उत्पादन आणखी वाढत जाणार याबद्दल शंका नाहीं. परंतु त्याचबरोबर निसर्गाचें साहाय्य मात्र मिळालें पाहिजे. चालू उत्पादन उचलूं शकेल, इतकेंच नव्हे तर आणखी वाढणारें उत्पादन खपलें जाईल अशी प्रभावी मागणी पुरेशा गतीनें वाढायला पाहिजे. ह्याकरितां रोजगार वाढून लोकांचें उत्पन्न वाढणें आवश्यक आहे. तुटीच्या अर्थप्रबन्धनानें हेंच कार्य साध्य होणार आहे. नवा पैसा पर्याप्त प्रमाणांत गुंतविला जातो किंवा नाहीं, हें पाहिलें पाहिजे. नवी गुंतवणूक मोठ्या प्रमाणावर घडवून आणणें हेंच अर्थमंत्र्यांच्या तुटीच्या अंदाजपत्रकी धोरणाचें मुख्य उद्दिष्ट आहे. धान्याचें वाढतें उत्पादन आणि वाढतें औद्योगिक उत्पादन ह्या दोन प्रमुख मार्गांनीं वाढता चलनपुरवठा शोषित (absorb) केला जाईल. आणि तो तसा झाल्यास तुटीच्या प्रबन्धनामुळें किंमती भरमसाट वाढतील ही भीति निराधार आहे असेंच म्हणावें लागेल. इतकें असूनहि जर जरूरीपेक्षां जास्त पैसा खेळता राहिला तर तो जास्तीचा पैसा सरकारी कर्जें, अल्प बचतीचा कार्यक्रम आणि वाढती आयात ह्यांनीं ओढून घेतां येईल. ७४२ कोटी रु. ची स्टर्लिंग गंगाजळी शिल्लक असतांना आवश्यक ती आयात वाढविणें कठिण जाणार नाहीं.

भारतांत मिश्र अर्थव्यवस्था असल्यामुळें पंच-वार्षिक योजनेंत उद्योगधंद्यांत खाजगी भांडवलाला देखील वाव देण्यांत आला आहे. खाजगी उद्योगपतींना उत्पादन वाढविण्याकरितां आवश्यक ती प्रेरणा सध्या मिळत आहे. आणि ती आणखी मिळत राहील. उत्पादक कार्यांवरील वाढत्या खर्चामुळें लोकांची क्रय-शक्ति वाढेल. युद्धकालापासून साधारण जनतेची उप-भोग-प्रवृत्ति (propensity to consume) वाढली आहे. वाढती क्रयशक्ति आणि वाढती उप-भोगप्रवृत्ति ह्यामुळें प्रभावी मागणी जास्त होऊन उत्पादकांस आवश्यक तें प्रोत्साहन मिळेल. त्याचबरोबर खाजगी उद्योपतींना भांडवलाची अडचण पडूं नये म्हणून 'औद्योगिक-विकास-अधिकोष' (Industrial Development Corporation) स्थापन करण्याचें योजिलें आहे. सरकारी आणि खाजगी अशा दोन्ही आघाडीवर भांडवलनिर्मितीची क्रिया द्रुतगतीनें वाढावयास पाहिजे. हें कार्य तुटीचें अर्थकारण करील असा विश्वास वाटण्यास बरीच जागा आहे. आवश्यक वस्तूंच्या किंमती, परदेशी व्यापार, प्रत्यय-(credit)-विस्तार आणि अनुत्पादक खर्च — ह्यांवर नियंत्रण ठेवल्यास तुटीचें धोरण सध्याच्या परिस्थितींत हितावह ठरेल ह्यांत शंका नाहीं.

गेल्या वर्षीं आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीचें प्रतिनिधि-मंडळ भारतांत आलें होतें. पंचवार्षिक योजनेची पाहणी करून त्याबाबतींत भारत-सरकारला सल्ला देणें हाच त्या मंडळाच्या भेटीचा मुख्य उद्देश होता ह्या मंडळानें योजनेचीं उद्दिष्टें प्रशंसून, योजनेच्या सफलते-च्या दृष्टीनें पैशाचा पुरवठा पुरेसा असणें आवश्यक आहे असें प्रतिपादिलें. त्या दृष्टीनें सरकारचें तुटीचें अंदाजपत्रकी धोरण अनाठायीं नाहीं असा निर्वाळा त्यांनीं दिला. मात्र जागरुकतेचें महत्त्वहि विसरतां कामा नये असा इशाराहि त्या मंडळानें दिला आहे. पुढील तीन वर्षांतील संकल्पित खर्चाचा बराचसा खर्च राज्यसरकारांमार्फत निरनिराळ्या विकास-कार्यांवर व्हावयाचा आहे. ह्याकरितां राज्यसरकारां-नीं केन्द्रीय सरकारावर जास्त विसंबून न राहतां आपलीं उत्पन्नें वाढविण्याचा प्रयत्न करावा. असें केल्यानें तुटीची पोकळी वाढणार नाहीं, अशीहि सूचना करण्यांत आली आहे.

सारांश, तुटीचें अर्थकारण भारताच्या सध्यांच्या आर्थिक प्रकृतीला मानवण्यासारखें आहे, परंतु त्या-करितां वर उल्लेखिलेलीं पथ्यें मात्र सांभाळायला हवींत; नाहींतर रोगापेक्षां औषधच जास्त विघातक ठरेल.

प्रा. श्या. मा. कुलकर्णी

अर्थशास्त्राची परिभाषा

संयुक्तमहाराष्ट्रांतील बहुतेक सर्व विद्यापीठांत अनेक विषय मराठी माध्यमांतून शिकविण्याची व्यवस्था करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. कांहीं विद्यापीठांनीं हा उपक्रम यापूर्वीच सुरू केला आहे. नागपूर विद्यापीठानें मराठी माध्यमाचा आरंभ करून आघाडी मारली. पुणें विद्यापीठांतहि या दिशेनें पावलें पडत आहेत. ओस्मानिया युनिव्हर्सिटीनें नुकतीच हालचाल सुरू केली आहे. तर मुंबई विद्यापीठ आपल्या विशिष्ट स्थानामुळें याविषयीं तटस्थ आहे.

मराठी माध्यमांतून शिकविण्याकरितां जे विषय प्रथम निवडले गेले आहेत, त्यांत अर्थशास्त्राचा अंतर्भाव होतो. विद्यापीठांतील शिक्षणक्रमांत या विषयाची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. हा विषय शिकूं इच्छिणारे विद्यार्थी वाढत आहेत; तसेंच सामान्य माणसांनाहि हा विषय समजणें अवश्य आहे. अशा वेळीं मराठींतून हा विषय अवगत झाल्यास फार मोठी सोय होईल हें खास.

या विषयावर मराठी भाषेंत फारच थोडीं पुस्तकें आहेत. भारतीय भाषांपैकीं फक्त बंगाली भाषेंतच कित्येक पुस्तकें अलीकडे लिहिलीं जात आहेत. या विषयांत मराठी भाषा फारच मागासलेली आहे. दुसरें असें कीं जीं कांहीं पुस्तकें लिहिलीं गेलीं आहेत त्यामध्यें वेगवेगळे पारिभाषिक शब्द वापरले गेले असल्यानें व्यर्थ गोंधळ निर्माण होण्याचा संभव आहे. इंग्रजी भाषेंतील या विषयावरची वाङ्मयसंपदा विपुल आहे. त्यावरून पाहिलें तर या विषयाचें प्राथमिक ज्ञान होण्याकरितां देखील मराठींत कित्येक पुस्तकें लिहिलीं गेलीं पाहिजेत. अर्थशास्त्रीय सिद्धान्तावर व त्यामधील अंगोपांगावर सशास्त्र व सविस्तर चर्चा करणारीं अनेक पुस्तकें तयार झाल्याखेरीज हा विषय विद्यापीठाच्या पातळीवर शिकविणें अशक्य नसलें तरी अवघड आहे खास.

अशीं पुस्तकें लिहावयाचीं म्हणजे पहिली वाण शब्दसंपत्तीची होय. कादंबऱ्या, काव्य, नाटकें, लघुकथा इत्यादि ललित वाङ्मयविलासांत आपली भाषा बरीच संपन्न झाली आहे व या प्रकारची वाङ्मयनिर्मितीहि तींत बरीच विविध व अभिमानास्पद झाली आहे, यांत कांहीं संशय नाहीं. पण शास्त्रीय वाङ्मयास आवश्यक अशा पारिभाषिक संज्ञा व तदनुषंगिक शब्दरचना आपल्या भाषेंत अद्याप अभावानेंच नजरेंत भरते. कोणत्याहि शास्त्रीय विषयाचें विवेचन करावयाचें झाल्यास योग्य व समर्पक असें शब्द हवेतच. त्याशिवाय वर्ण्यविषय समजावून सांगतां येणें शक्य नाहीं. लेखकाच्या किंवा वक्त्याच्या मनांतील अभिप्राय समजण्याकरितां त्यानें वापरलेले शब्द वाचकाला किंवा श्रोत्याला चटकन् कळले पाहिजेत. मातृभाषा माध्यम म्हणून उपयोजिण्याचें हें एक महत्त्वाचें कारण आहे. परकीय भाषेंतील शब्दांचा निव्वळ अर्थ समजावून घेण्याकरितां शिक्षक व विद्यार्थी यांचे निम्मे अधिक श्रम खर्ची पडतात. हा शक्तीचा अपव्यय थांबविण्याकरितां सरळ सोपी अशी भाषा व सर्वतोमान्य असे शब्द पाहिजेत.

कोणत्याहि शास्त्रीय विषयाची परिभाषा ही पूर्णतया निश्चित असली पाहिजे. नाहींतर केवळ शब्दावरच वादंग माजून मुख्य विषय मागेंच राहतो. या दिशेनें आपल्याकडे फारच थोडे प्रयत्न झालेले आहेत. जितके लेखक तितक्या परिभाषा अशी स्थिति आहे. ही स्थिति ज्ञानवर्धनाच्या दृष्टीनें मारक आहे. या सर्व विविध परिभाषा इंग्रजींतील सामान्य परिभाषेवर आधारलेल्या आहेत, व त्या संदर्भानेंच जाणून घेतां येतात. त्या स्वयंपूर्ण नाहींत. हा आधार नाहींसा होताच त्या अर्थहीन होतात. याचाच अर्थ असा कीं, इंग्रजी न समजणाऱ्या वाचकांस त्यापासून व्यवस्थित अर्थ समजणें शक्य नाहीं.

परिभाषेकरितां इंग्रजीचा आधार घेण्यास कांहींच हरकत नाहीं किंवा आरंभीं तो आवश्यक आहे, असें

म्हणणें योग्य होईल. पण चालण्यास शिकतांना मुलाला पांगुळगाडा हवा असतो, म्हणून तो कायमच वापरणें जसें हानिकारक ठरेल, त्याचप्रमाणें आपल्या परिभाषेची भिस्त इंग्रजीवरच ठेवून स्वस्थ बसणें घातक होईल. ती स्वयंपूर्ण करण्याचे जोरदार प्रयत्न झालेच पाहिजेत.

प्रस्तुत लेखाचा मुख्य उद्देश हाच आहे. या विषयावर साधकबाधक चर्चा होणें अवश्य आहे. सांच्यातून विटा काढल्याप्रमाणें ठोकळेबाज शब्द काढून परिभाषा संपन्न होत नाहीं. पारिभाषिक संज्ञा या समर्पक, प्रवाही व अर्थपूर्ण असल्या पाहिजेत. निर्जीव, खडबडीत व क्लिष्ट शब्दामुळें अर्थाऐवजी अनर्थच उद्भवतो. शास्त्रीय वाङ्मय म्हणजे रूक्ष, रसहीन व निर्जीव चर्चा, असें समजण्याचें कारण नाहीं. इंग्रजी वाङ्मयांत अत्यंत अवघड विषयहि सुगम व मनोहारी शब्दांत सामान्य माणसाकरितां लिहिणाऱ्या जुलियन् हक्स्ले, जेम्स् जीन्स्, बर्ट्रँड् रसेल्, आर्थर एडिंग्टन्, हॉग्बेन् इत्यादि लेखकांनी मौलिक भर टाकली आहे. शास्त्रीय वाङ्मय देखील ओघवती भाषेमुळें लोकप्रिय होऊं शकतें व सामान्य माणसालाहि अवघड विषयांत आवड उत्पन्न होते.

यामुळेंच निव्वळ शब्दकोशामुळें वाङ्मय समृद्ध होत नाहीं. वेंचक शब्द व शब्दरचना, परिणामकारक वाक्यरचना, भाषाशैली इत्यादिकांची शास्त्रीय वाङ्मयालाहि अत्यंत आवश्यकता असते. म्हणूनच योग्य पारिभाषिक शब्द निवडले गेले पाहिजेत, त्यांचा शास्त्रीय अर्थ निश्चित झाला पाहिजे व ते पूर्णपणें प्रचलित झाले पाहिजेत. लेखकागणिक वेगवेगळे शब्द वापरले गेल्यास परिभाषा स्वयंपूर्ण व अर्थवाही होणार नाहीं. विशेषतः सामाजिक शास्त्रांचा वर्ण्यविषय अत्यंत संमिश्र व चंचल असल्यामुळें इंग्रजीसारख्या समृद्ध भाषेंत देखील निव्वळ शाब्दिक वाद सारखे चालू असतात व अनेक वेळां शब्द अपुरे पडतात. त्या मानानें सर्वच भारतीय भाषांना अद्याप फारच प्रवास करावयाचा आहे. संस्कृत भाषासंपत्तीची आपल्याला फार मदत होते, हें खरें; पण कांहीं झालें तरी संस्कृत ही प्राचीन भाषा आहे. आधुनिक शास्त्रांनीं त्यावर बरीच मजल मारली आहे, हें नाकारण्यांत कांहीं अर्थ नाहीं. हे सर्व विचार संस्कृतभाषेच्या साहाय्यानें तात्काळ आपल्या भाषेंत मांडता येणें शक्य नाहीं. त्याकरितां नवी शब्दरचना करावी लागेल; नवी वाक्यरचना करावी लागेल; पेलतील असे परकी शब्द-देखील अस्पृश्य मानण्याचें कारण नाहीं. मात्र आपले प्रत्यय व परकी शब्द अशी धेडगुजरी रचना भाषेला हानिकारकच ठरेल.

अर्थशास्त्राविषयींच विचार करावयाचा झाल्यास असें निश्चित म्हणतां येईल कीं, या दिशेनें आपल्या भाषेंत फारच थोडे प्रयत्न झाले आहेत. या विषयावर जीं कांहीं चारदोन पुस्तकें मराठींत लिहिलीं गेलीं आहेत त्यांमधून परिभाषा तयार करण्यावर फारसे श्रम घेतले गेले नाहींत, असें मला वाटतें. अर्थातच हें कार्य एकाद्या व्यक्तीनें बसल्या बैठकीवर करून टाकण्यासारखें नाहीं, हें खरें. आवश्यक ते पारिभाषिक शब्द तयार करून त्यावर निरनिराळया तज्ज्ञ व्यक्तींनीं सांगोपांग चर्चा करावी व परिभाषा निश्चित करावी. याचा असा अर्थ मात्र नव्हें कीं, परिभाषेनें भाषा जखडून टाकावी, किंवा ती लवचिक नसावी. याचा अर्थ इतकाच कीं, एकच शब्द वेगवेगळया अर्थीं किंवा एकाच अथा वेगवेगळे शब्द वापरल्यानें जी अनिश्चितता निर्माण होते, ती नाहींशी करणें अवश्य आहे. तसेंच शब्दकोशांतून शब्द उचलून ते वापरूं लागल्यास भाषा बोजड व निर्जीव होईल, याचें उत्तम उदाहरणच हवें असल्यास डॉ. रघुवीर यांचा 'अर्थशास्त्र-शब्द-कोश' उघडून पहावा. "A rise in price is usually accompanied by a fall in demand, and a fall in price by a rise in demand," हेंच वाक्य रघुवीरांच्या शब्द-कोषीय शब्दांत पुढीलप्रमाणें करावें लागेल : "मूल्याच्या उद्रोहामुळें सामान्यतः अभियाचनपात होतो, व मूल्यपातामुळें अभियाचन-उद्रोह होतो." ठोकळेबाज शब्द-रचना यंत्रांतील काच्यासारखीच होणार ! अशीं शेंकडों उदाहरणें दाखवितां येतील.

पारिभाषिक शब्दांच्या कांहीं कसोटया पुढें सोदाहरण दिल्या आहेत. त्याचप्रमाणें अर्थशास्त्रांतील कांहीं विशेष शब्द व शब्दरचनाहि दिल्या आहेत. पुढें दिलेलें विवेचन निर्दोष किंवा आदर्श आहे, असा माझा दावा नाहीं. फक्त माझे विचार मांडले आहेत. त्यावर चर्चा होऊन परिभाषेला योग्य तें वळण लागावें इतकाच माझा हेतु आहे. उदाहरणें

देतांना कांहीं शब्द व शब्दप्रयोग कांहीं पुस्तकांतूनच निवडलेले आहेत. यांत माझा हेतु त्या लेखकांवर टीका करण्याचा नाहीं. माझ्या विचारांत किंवा शब्दांत ज्या कांहीं उणीवा असतील त्या अधिकारी तज्ज्ञांनीं दूर कराव्यात, अशी माझी विनंति आहे.

पारिभाषिक शब्दांच्या कसोट्या

(१) **परिचितता :** शास्त्रीय विषयांतील बरेचसे पारिभाषिक शब्द सामान्य भाषेंत अपरिचित असतात. रसायनशास्त्र, पदार्थविज्ञानशास्त्र, वैद्यकशास्त्र, औषध-शास्त्र, वनस्पतिशास्त्र, भूगर्भशास्त्र, प्राणिशास्त्र इत्यादि विषयांतील अनेक पारिभाषिक शब्द अपरिचित असतात. कारण या शब्दांनीं एखादी विशिष्ट व नित्य अशी घटना, रचना किंवा गुणविशेष दर्शविलेला असतो, व तो त्या शब्दांतच अनुस्यूत असतो. या शास्त्रांचा वस्तुविषय निश्चित व नित्य असल्यामुळें त्यांतील घटक, घटना व गुणविशेष निश्चित असतात, आणि ते दर्शविणारीं सूत्रें शब्दरूपानें निश्चित केलीं जातात. हे सूत्रबद्ध शब्द सांकेतिक असल्यानें सामान्यांना अपरिचित वाटले तरी तज्ज्ञांना ते फार सोयिस्कर असतात. याउलट सामाजिक शास्त्रांच्या वस्तुविषयाची प्रकृतीच निराळी असते. त्यांतील प्रमेयें स्थितिसापेक्ष असल्यानें परिस्थित्यनुसार बदलत राहतात; त्यामुळें तीं सूत्रबद्ध करणें शक्य नसतें. तसेंच हे बदल इतके विविध, सूक्ष्म व संकीर्ण असतात कीं, त्या सर्वांचें वर्णन यथार्थपणें करूं शकणारी शब्दसंपत्ति कोणत्याच भाषेंत उपलब्ध नाहीं. उपलब्ध शब्दांचाच विस्तार वाढवून किंवा कमी करून, किंवा वळवून हे बदल दाखवावे लागतात; नवे विचार व बदल विस्तारानें वर्णन करून व उदाहरणें देऊन समजावून देणें भाग पडतें. या सर्वांना अचूक लागूं पडतील असे सुटसुटीत व समर्पक शब्द प्रत्येक वेळीं मिळणें शक्य नाहीं. कांहीं वेळां कांहीं प्रचलित शब्दांनाच विशिष्ट तांत्रिक अर्थ देऊन ते नंतर त्याच अर्थानें रूढ केले जातात; उदाहरणार्थ इंग्रजी भाषेंत अर्थशास्त्रांत Multiplier, Liquidity, preference वगैरे शब्द नव्यानें व विशिष्ट अर्थानें रूढ केले गेले आहेत; शिवाय पूर्वीपासून सामान्य भाषेंतीलच शकडों शब्द विशिष्ट तांत्रिक अर्थानें वापरले आहेत. याचें कारण शब्दांचें दारिद्र्य हें तर आहेच; शिवाय नवे शब्द तयार करून ते रूढ करण्यापेक्षां प्रचारांतील शब्दच विशिष्ट अर्थानें वापरणें वाचकांना जास्त मानवतें. नवे शब्द आरंभीं आरंभीं तरी खटकतात व बोजड वाटतात; लेखनाचा ओघ देखील त्यामुळें अडखळल्यासारखा वाटतो. त्या-ऐवजीं सरावांतील शब्दच (विशिष्ट व रूढार्थाहून निराळ्या अर्थानें) वापरलेले अधिक मानवतात. म्हणून परिचित शब्दच शक्यतों अधिक वापरणें इष्ट होय. अर्थात् नवे व प्रारंभीं विचित्र वाटणारे शब्द देखील कालांतरानें रूढ होतात व सुगम वाटूं लागतात. कांहीं वर्षांपूर्वीं कित्येक ‘ सावरकरी ’ शब्द सुरवातीस विचित्र, बोजड व हास्यकारक वाटत असत. पण सांप्रत ते सरसहा वापरले जातात. मात्र लोकांना त्यांची उपयुक्तता पटली पाहिजे.

कांहीं कांहीं शब्दांच्या बाबतींत मात्र या उलट प्रकार होतो. अशा शब्दांचा मूळ अर्थ एक असतो, रूढार्थ निराळाच असतो व रूढार्थ प्रचारांत इतका दृढ झालेला असतो कीं मूळ अर्थानें तो शब्द रूढ करणें लोकांना पटत नाहीं. अशा वेळीं एखादा थोडाफार अपरिचित शब्दच चटकन् प्रचलित होऊं शकतो; उदाहरणार्थ ‘ उपभोग ’ या शब्दाचा मूळ अर्थ सेवन असा आहे, पण मराठी प्रचारांत ‘ समागम ’ या अर्थानें तो वापरला जातो. हा अर्थ नाहींसा करून मूळ अर्थ रूढ करण्यापेक्षां त्याऐवजीं ‘ सेवन ’ हा शब्द Consumption या अर्थी वापरणें जास्त चांगलें. तसेंच कांहीं परिचयांतील शब्द एखादा अर्थ भासवि-तात, पण वाक्यांत उपयोजितांना खटकतात. असे शब्द टाळून समर्पक अर्थाचे योग्य शब्द निवडले पाहिजेत. उदाहरणार्थ, कांहीं मराठी पुस्तकांतून Exchange याचा समानार्थी शब्द ‘ अदलाबदल ’ असा वापरला आहे; “ मुलांची अदलाबदल ” किंवा “ घरांची अदलाबदल ” असा शब्दप्रयोग योग्य आहे पण “ घराची पैशाशी अदलाबदल केली ” असा शब्द-प्रयोग बरोबर होत नाहीं. दोन सारख्या वस्तूंच्या देव-घेवीस ‘ अदलाबदल ’ म्हणतात, दोन वेगळाल्या वस्तू असतील तर हा शब्द लागूं पडत नाहीं. याचाच अर्थ असा कीं अदलाबदल यांचा अर्थ Exchange असा नसून Interchange असा आहे; Exchange या अर्थी ‘ विनिमय ’ हा शब्द मराठींत रूढ आहे; तो त्याज्य मानण्याचे कांहींच कारण नाहीं. जशी अत्यंत संस्कृतप्रचुर भाषा कृत्रिम वाटते, तशीच

सर्व संस्कृत शब्द टाळणारी भाषा बोजड व कर्कश होते. ओढून ताणून आणलेला साधेपणा कांहीं उपकारक ठरणार नाहीं. दोन्ही अतिरेक टाळल्यानेंच भाषा संपन्न व लवचिक होईल.

२. समर्पकताः पारिभाषिक शब्द समर्पक असला पाहिजे, याबद्दल मतभेद होण्याचें कारण नाहीं. समर्पकता म्हणजे इष्ट अर्थ सुलभतेनें व्यक्त करण्याचें सामर्थ्य. प्रत्येक वेळीं अशाप्रकारचा परिपूर्ण शब्द मिळणें अर्थातच शक्य नाहीं. म्हणून निरनिराळ्या समानार्थी शब्दांतून जो अधिक समर्पक असेल तोच निवडला पाहिजे. कांहीं वेळां एकाच शब्दानें संपूर्ण अर्थ व्यक्त होत नाहीं, अशा वेळीं शब्दाला योग्य उपपदें किंवा प्रत्यय जोडून इष्ट अर्थ व्यक्त करतां येतो. कित्येकदां सामासिक शब्द अधिक समर्पक होतो. इंग्रजीचा समानार्थी शब्द कांहीं वेळां उपयोगी पडतो, तर अनेक शब्द वाक्प्रचारांतून निवडून किंवा लक्षणेनें वापरल्यास अधिक समर्पक ठरतात. ज्या त्या शब्दावर व त्यांतून ध्वनित होणाऱ्या अर्थावर ही समर्पकता अवलंबून असते.

३. व्याकरणशुद्धताः हल्लीच्या मराठी लिखाणांत सर्वांत अधिक दुर्लक्ष होतें तें व्याकरणशुद्धतेकडे. अनेक बड्याबड्या लेखकांचें सुद्धां या विषयाकडे दुर्लक्ष झालेलें दिसून येतें. विशेषतः वर्तमानपत्री भाषेनें या बाबतींत फारच गुंडगिरी केलेली आहे. मुद्राराक्षसाच्या नंग्या नाचाखेरीज अनेक विचित्रलीला वर्तमानपत्रांत आढळून येतात. अनुस्वार, विसर्ग, ह्रस्व-दीर्घ, संधि, समास या कशाचाहि मुलाहिजा न बाळगतां वर्तमानपत्रांनीं आपली एक ' तृतीयच ' भाषा तयार केली आहे.

अनेकांना असें वाटतें कीं, व्याकरणाचें प्रस्थ नुसतें निरर्थकच नव्हे तर भाषेच्या स्वैर विलासाला व लवचिकपणाला हानिकारकहि ठरतें. व्याकरणाचे नियम म्हणजे येन केन प्रकारेण कुणीतरी भाषेवर लादलेलीं निरर्थक व असमंजस बंधनें नव्हेत. इष्ट अर्थ स्पष्टपणें व्यक्त व्हावा, गोंधळ टळावा, वाक्यरचना सुगम व सुबोध व्हावी याकरितां अनुभवानें बांधलेले आडाखे म्हणजेच व्याकरण होय. सुव्यक्त विचार यथास्थित मांडतां यावेत म्हणूनच हे नियम तयार केलेले असतात. ज्ञानवर्धनाकरितां व ज्ञानसंवर्धनाकरितां सुव्यक्त विचारांचें अधिष्ठान अपरिहार्यच म्हटलें पाहिजे. विचाराच्या गाड्याची व्याकरण व तर्कशास्त्र हीं दोन चाकेंच आहेत, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं.

अनुस्वार व ह्रस्वदीर्घांच्या चुका या सरसकट आढळतात, पण थोड्याशा सरावानें त्या सुधारतां येतात. या मुख्यतः शुद्धलेखनांतील चुका होत. महत्त्वाच्या व्याकरणविषयक चुका संधि व समास यांच्या नियमांचें उल्लंघन केल्यानें होतात. यामुळें विचित्र, बोजड चुकीचे शब्द तयार होतात. संधि व समासाचे नियम देखील शब्द प्रवाह अस्खलित रहावा व विचार थोडक्यांत मांडतां यावेत, याच हेतूनें केलेले असतात. विविध वर्णोच्चारांचे गुणधर्म लक्षांत घेऊन त्यांचें सर्वांत सोपें संयुक्त स्वरूप संधिनियमामुळें प्राप्त होतें. ऋ, र, ष यांच्या संयोगानें ' न ' चा 'ण ' होणें, 'र्' मागून 'र्' आला असतां त्याचा लोप व तत्पूर्वीचा स्वर ह्रस्व असल्यास दीर्घ होणें किंवा इतर कोणताहि संधिनियम पाहिल्यास उच्चारसौकर्य साधण्याचाच हेतु दिसून येईल; निरनिराळ्या स्वरोच्चारांतील मूलभूत संवादित्वानुसारच ही रचना केलेली आहे.

अनेक चुकीचे शब्द मराठींत रूढ होऊं पाहात आहेत. कांहीं शब्द तर इतके रुळले आहेत कीं त्यांचें व्याकरणशुद्ध रूपच चुकीचें वाटूं लागतें. उदाहरणार्थ, पृथःकरण हा शब्द पृथक्करण असा हवा; अन्तर्राष्ट्रीय याऐवजीं अन्ताराष्ट्रीय किंवा आन्तरराष्ट्रीय, पुनर्रचना ऐवजी पुनारचना, अंतर्शालेय याऐवजीं आंतरविद्यालयीन असे शब्द पाहिजेत. ऋत-अनृत, ऋजु-अनृजु हे शब्दहि कित्येकदां चुकीनें ' नृतानृत', 'ऋजु - अऋजु' असे वापरलेले आढळतात. ' नर्तकी ' याऐवजीं ' नर्तिका ' असा शब्द मराठी भाषेंत सरसकट रूढ झाला आहे. असे अनेक शब्द आढळून येतील.

मराठी लेखनांत पडत चाललेली आणखी एक अनिष्ट प्रथा म्हणजे धेडगुजरी समासांची. शुद्ध संस्कृत शब्द व परकीय (इंग्रजी, पर्शियन, आरबी किंवा उर्दू) शब्द यांचा समास करणें अनिष्ट होय. उदाहरणार्थ, ' सायकलस्वार ' असा धेडगुजरी समास खपून जातो, पण ' सायकलारोहक ' असा समास मात्र अयोग्य होय. संस्कृत आणि इतर शब्द जवळ येऊं देतां कामा नये, किंवा इतर शब्द वापरूंच नयेत, असा आग्रह धरण्याचें

कारण नाहीं. मात्र संस्कृत शब्दांचा इतरांशीं समास न करितां ते वेगळेच ठेवावेत. उदाहरणार्थ, 'किंमतीमान' (Price Level), किंमतनियंत्रण (Price Control) असे प्रयोग न करता, अनुक्रमें 'किंमतीचें मान' (खरें पाहिलें असतां किंमतीची पातळी), 'किंमतीवरील नियंत्रण' असे प्रयोग करणें अधिक श्रेयस्कर होय. विमार्ह= Insurable, विमानर्ह= Noninsurable असे विचित्र शब्द व व्याकरण-दुष्ट समासहि केलेले आढळतात.

४ **सुटसुटीतपणा :** सामाजिक शास्त्रांतील पारिभाषिक शब्द सुटसुटीत व सोपे असावयास हरकत नाहीं. बोजड, उच्चारण्यास कठीण व लांबलांब शब्द शक्यतों टाळले पाहिजेत. सामान्यतः संधिनियम धाब्यावर बसविणारे शब्द बोजड होतात; उदाहरणार्थ, Principles 'प्रनियम' (–डॉ. रघुवीर) याचा उच्चार करतांना प्र–नियम असा वाटतो; तेंच 'प्रणियम' हा उच्चार सलग होतो.

संस्कृत शब्द कसाहि असला तरी संस्कृत भाषेंत तो शोभून दिसतो; पण सर्वच संस्कृत शब्द मराठी भाषेंत खपणार नाहींत. डॉ. रघुवीर यांच्या कोशांतील अधिकांश शब्द मराठींत बोजड वाटतील. उदाहरणार्थ, उत्तमर्ण (Creditor), अधमर्ण (Debtor), अर्हा (Value), चलिष्णुता (Mobility), वंटन (Distribution). असे कित्येक शब्द आढळतील कीं ते जसेच्या तसे घेण्यापेक्षां मराठींतील चालू शब्द घेणेंच इष्ट होईल.

५ **कांहीं पारिभाषिक संज्ञा :** कांहीं पारिभाषिक संज्ञा पुढें दिलेल्या आहेत त्यांपैकीं कांहींचें, त्या कां इष्ट आहेत याबद्दल थोडेंसें विवेचन केलेलें आहे. प्रस्तुत लेखांत सर्व महत्त्वाच्या संज्ञांचा विचार करणें शक्य नाहीं.

ज्या लेखकांनीं किंवा इतरांनीं अर्थशास्त्रांतील इंग्रजी संज्ञांना प्रतिशब्द शोधण्याचा प्रयत्न केला आहे, त्या सर्वांचें घोडें ज्या एका शब्दावर अडलें असेल तो शब्द म्हणजे 'Margin' हा होय. आधुनिक अर्थशास्त्रीय विवेचनांत हा शब्द निर्णायक (crucial) महत्त्वाचा आहे. कोणत्याहि आर्थिक कार्याचें विवरण करतांना 'Margin' या कल्पनेवांचून भागत नाहीं. अर्थात् या शब्दाला प्रतिशब्द योजिणें अपरिहार्यच होय. अनेकांनीं अनेक शब्दांनीं ही कल्पना विशद करण्याचा प्रयत्न केला आहे. डॉ. रघुवीर यांनीं 'सीमान्त' असा शब्द दिला आहे. मराठींतील कांहीं पुस्तकांत 'कांठावरील' असा प्रतिशब्द वापरलेला आहे. आणखीहि कांहीं शब्द सुचण्यासारखे आहेतः उपान्त (उपान्त्य नव्हे), अन्त्य, अन्त्यज (हा शब्द 'शूद्र' या अर्थीं रूढ असल्यानें तो येथें जमणार नाहीं.) इत्यादि. मराठी भाषेंत 'Margin' या अर्थीं 'समास' असा शब्द आहे; पण संस्कृतांत त्या अर्थीं तो आढळत नाहीं व संस्कृत अर्थानें तो पूर्णतया प्रचलित असल्यानें तो वापरल्यामुळें संभ्रमच निर्माण होईल.

'Margin' हा शब्द अर्थशास्त्रांत ज्या अर्थानें वापरण्यांत येतो तो विशिष्ट आहे. एखादी कृति सुरू होऊन ती क्रमशः पुरी होतां होतां जेथें तड गांठली जाते, त्या बिंदूला 'Margin' असें म्हणतां येईल. नुसत्या अंत्य बिंदूचा किंवा सीमेचा बोध होऊन भागणार नाहीं, तर ती सर्व विशिष्ट कृति क्रमशः पुरी होण्याचा बोध झाला पाहिजे. या दृष्टीनें पाहतां वरील कोणताहि शब्द समर्पक आहे, असें म्हणतां येणार नाहीं. 'सीमान्त' याचा अर्थ Borderline असा आहे, 'कांठ' हा शब्द ऐलतीर किंवा पैलतीर या दोन्हीं अर्थीं आहे, त्यांत ऐलतीराहून पैलतीर गांठण्याची कुवत नाहीं. माझ्या मतें इतका सर्व अर्थ व्यक्त करणारा शब्द 'पार' हा आहे. 'पार' म्हणजे पैलतीर, आरंभ करून क्रमशः शेवटास पोंचणें, असाच अर्थ या शब्दानें व्यक्त होतो. तोच येथें समर्पक आहे. 'पार' याचा अर्थ The other end; concluding end, असा आहे; 'Margin' याचा इष्ट अर्थ हाच आहे. 'Marginal' म्हणजे 'पारंकप' असा शब्द होईल. Marginal Utility=पारंकप उपयोगिता; Marginal Unit= पारंकप परिमाण; Margin of Production= उत्पादनाचा पार.

Elastic (demand) या शब्दास प्रतिशब्द सामान्यतः 'स्थितिस्थापक' असा वापरला जातो. पण या ठिकाणीं तो योग्य नाहीं. स्थितिस्थापक (Spontaneously resuming normal shape) मागणी असा अर्थ अभिप्रेत नसून परिस्थितीप्रमाणें बदलणारी मागणी असा अर्थ झाला पाहिजे. या अर्थानें 'लवचिक' हा शब्द बराच अर्थवाही आहे. त्याच

अर्थाचे 'विकारशील' किंवा 'नमनशील' हे शब्दहि वापरतां येतील.

Substitute=प्रतिनिधि; Substitution= प्रतिनिधान; Substitutable=प्रतिनिधेय. डॉ. रघुवीर यांचा शब्द 'प्रतिस्थापन' हा शब्द 'प्रतिष्ठापन' असा पाहिजे; पण त्याचा अर्थ Substitution असा नाहीं.

Inflation = चलनातिरेक; Deflation = चलनापकर्ष, चलनक्षय; Reflation = चलन-संधान (संधान = Restoration).

पुढें कांहीं अर्थशास्त्रीय इंग्रजी शब्द आणि त्यांचे मराठी प्रतिशब्द दिलेले आहेत: Equilibrium= समतोल; [डॉ. रघुवीर यांचा शब्द 'साम्य' हा समर्पक नाहीं; त्याचा अर्थ उघडच Similarity, Sameness असा होतो.] Balance of Payments = व्यवहारशेष; Balance of Trade = व्यापारशेष, Bank = निधि-संस्था; Barter = वस्तुविनिमय; Bimetallism = द्वैधातुक परिमाण; Clearing House = निरसनकेंद्र; Commodity = वस्तु-विशेष; Consumer = भोक्ता; Consumer's goods = सेवनीय वस्तु; Convertible = परि-वर्तनीय; Currency = चलन; Curve = कमान; Demand curve=मागणीची कमान; Derived =Indirect = परोक्ष; Devaluation = मूल्यपा-तन; Diminishing Utility = उतरती उपयो-गिता; Dumping = निस्सारण; Dynamic = गतिशील; Exchange = विनिमय; Extensive = व्यापक; Favourable Exchange = अनुकूल विनिमय; Firm = उद्योगकेंद्र, उद्योग परिमाण; International Monetary Fund = आंतरराष्ट्रीय निधि; Gold Bullion Standard = सुवर्णमय परिमाण; Gold Exchange Std = सुवर्णविनिमय-परिमाण; Gold Standard=सुवर्णपरिमाण; Gresham's Law= निकृष्ट नाण्यांची शिरजोरी, उत्कृष्ट नाण्यांचें पलायन; Impact of Tax = कराघात; Incidence of Tax = करभार; Indifference Curve = समवृत्तिदर्शक कमान; Weighted Index Number = भारान्वित निर्देशांक; Intensive = प्रकर्षित; Joint Stock Company = संयुक्त निधिमंडळ; Law = नियम, उपपत्ति, सिद्धान्त; Legal Tender = विधिविहित चलन. Localization = केंद्रीभवन; Market = बाजार, व्यव-हार; Perfect Market = निर्दोष व्यवहार; Market price = व्यवहारी किंमत (येथें Market याचा अर्थ 'व्यवहार' असाच होतो). Mobility = स्थलान्तर; Geographical M. भौगोलिक स्थलान्तर; Monometallism = एक-धातुक परिमाण; Monopoly = एकतंत्र, मक्तेदारी; Money = पैसा, चलन; Measure of value= मूल्यमापक; Medium of Exchange = विनि-मय-माध्यम; Metallic Money = धातुमय चलन; Bank Money = निधिनिर्मित चलन; Opportunity Costs = वैकल्पिक व्यय; Optimum Firm = पर्याप्त उद्योगकेंद्र; Optimum Population = पर्याप्त लोकसंख्या; Production = उत्पादन; Productivity = उत्पा-दनक्षमता; Progressive tax = प्रगतिशील कर; Promissory Note = वचनपत्र; Purchasing Power Parity = क्रयशक्ति-तुल्य-बलत्व; Automatic = स्वयंचल, स्वयंचालक, स्वयंकारक, स्वयंवाहक, स्वयंयोजक; Automatic arrangement = स्वयंयोजना; स्वयंयोजक व्यवस्था; Automobile = स्वयंवाहन; Satiation = तृप्ति; Satiable = तृप्य; Insatiable = अतृप्य; Satisfaction = समाधान; Standard of Living = वृत्तिमान; Service = उपचार; Taxable Capacity = करपात्रता; Value = मूल्य; Wage = वेतन; Wealth = संपत्ति; Welfare = समृद्धि.

प्रस्तुत लेखांत याहून अधिक शब्द स्थलाभावीं देतां येत नाहींत. शक्य तों सर्व शब्द एकत्र करून स्वतंत्रपणें लवकरच प्रसिद्ध करण्याचा लेखकाचा मानस आहे. या विषयावर चर्चा व्हावी हाच या लेखाचा उद्देश आहे.

‘ कॉमनवेल्थ रिलेशन्स ’ कॉन्फरन्समधील चर्चेच्या निमित्तानें: प्रा. स. बा. कोगेकर

राष्ट्रकुलासमोरील प्रश्न . . .

राष्ट्रकुलसंबंध - (‘कॉमनवेल्थ रिलेशन्स’) परिषदेचें ५ वें अधिवेशन लाहोर येथें ता. १७ मार्चला भरलें. ही परिषद् दर पांच वर्षांनीं भरत असते. गेलें अधिवेशन १९४९ सालीं कॅनडामध्यें भरलें होतें. आशियामध्यें असें परिषदेचें यंदाचें पहिलेंच अधिवेशन होय.

अनौपचारिक वातावरण

या परिषदेचा विशेष हा कीं, तिच्या अधिवेशनांतून केवळ विचारविनिमय होत असतो. गेल्या पांच वर्षांत राजकीय, आर्थिक व संरक्षण-(Defence)-विषयक क्षेत्रांत राष्ट्रकुटुंबांतील घटक राष्ट्रांवर परिणाम करणाऱ्या ज्या कांहीं घटना घडून आल्या असतील त्यांच्या अनुरोधानें, घटक राष्ट्रांसमोरील विविध समस्यांबाबत परस्परविचारांची देवाणघेवाण होते, परस्परांच्या भूमिका समजून घेतल्या जातात. कोणत्याहि तऱ्हेचे निर्णय असे घेतले जात नाहींत, ठराव पास होत नाहींत. या परिषदेच्या अधिवेशनांतून आपापल्या समस्यांचीं निश्चित उत्तरें मिळावींत अशी अपेक्षाहि नसते. परिषदेच्या अधिवेशनाला येणारे प्रतिनिधी आपल्या राष्ट्रातर्फे किंवा सरकारतर्फे बोलत नाहींत. ते निरनिराळ्या प्रश्नांवरील आपलीं स्वतःचीं वैयक्तिक मतें बोलून दाखवीत असतात. हे प्रतिनिधी त्या घटकराष्ट्रांतील बिनसरकारी संस्थांनीं निवडून पाठविलेले असतात. त्यांत सरकारचे कांहीं असतीलहि. पण ते सरकारतर्फे बोलत नाहींत. त्यांचीं मतें सरकारचीं नसून, त्यांचीं स्वतःचीं आहेत असें समजलें जातें. त्याचप्रमाणें कांहीं प्रतिनिधी राजकीय पक्षोपपक्षांचेहि सभासद असतात. पण ते पक्षातर्फे बोलत नसतात. ह्या परिषदेचीं अधिवेशनें वृत्तपत्रांना खुलीं नसतात. अधिवेशनाचें वृत्त परिषदेची कांहीं अधिकृत प्रतिनिधिमंडळी वृत्तपत्रांना पुरवीत असतात. – या सर्व गोष्टींमुळें या परिषदेच्या विचारविनिमयामध्यें एकप्रकारचा मोकळेपणा, अनौपचारिकता, खेळीमेळी नांदत असते व परस्परांचीं हृद्गतें समजून घेण्यास या वातावरणाची फार मदत होते. अर्थात् या परिषदेच्या अधिवेशनांत घटक राष्ट्रांतील सर्वच महत्त्वाच्या मतमतांतरांचें प्रतिबिंब दिसून येतेंच असें नाहीं.

यंदाच्या लाहोर येथील अधिवेशनाला एकंदर ६० प्रतिनिधि हजर होते. या प्रतिनिधींचें, निरनिराळीं घटक राष्ट्रें, व्यवसाय व कार्यक्षेत्र या दृष्टीनें केलेलें वर्गीकरण लेखाच्या शेवटीं दिलें आहे. त्यावरून प्रतिनिधींमध्यें साधारणपणें, प्रत्यक्ष राजकारणांत भाग न घेणाऱ्या, विद्यापीठाशीं संबद्ध असलेल्या (academic) प्रतिनिधींचें आधिक्य असलेलें दिसून येईल.

राष्ट्रकुटुंबांतील या राष्ट्रघटकांमध्यें कांहीं मूलभूत विचारसरणी साधारणपणें समान अशी आढळून येते. त्या विचारसरणीचीं सूत्रें अशीं सांगतां येतील : (१) पार्लमेंटरी राज्यशासनपद्धतीवर विश्वास (२) आर्थिक दृष्ट्या परस्परावलंबित्वाची भावना. – ही भावना कॅनडाच्या बाबतींत तेवढी तीव्र नाहीं. – (३) लोकांना स्वयंनिर्णयाचें तत्त्व लागूं करून त्यांना स्व-राज्य (Self-Government) मिळावें ही इच्छा. – ही इच्छा दक्षिण आफ्रिकेच्या बाबतींत आढळून येत नाहीं–– या समान विचारसरणीच्या सूत्रांच्या स्थूल शिथिल बंधनानें गोंवलीं जाऊन राष्ट्रकुटुंबांतील घटकराष्ट्रें एकत्र येऊं शकतात असें म्हणतां येईल.

परराष्ट्रीय धोरण

अधिवेशनांत ‘परराष्ट्रीय धोरण’ या विषयावर अत्यंत महत्त्वाची चर्चा झाली. कम्युनिस्ट व कम्युनिझम याबाबत काय धोरण ठेवावें यावर चर्चा विशेष रंगली. या चर्चेंत जीं मतें व सूर व्यक्त झाले त्यांमधून या विषयाबाबत दोन तट स्पष्ट दिसून आले. पाश्चात्त्य (संस्कृतीच्या) राष्ट्रांतील प्रतिनिधींनीं आणि सीलोननेंहि कम्युनिझमला कडवा विरोध प्रदर्शित केला. “ आज कम्युनिस्ट आक्रमणाची भीति विशेष आहे. कम्युनिस्ट रशिया आणि चीन आपल्या वर्चस्वाचीं क्षेत्रें विस्तृत करीत आहेत. त्यांच्या या विस्तारवर्चस्वा-(Expansionism)ला, या कम्युनिस्ट साम्राज्यशाहीला आळा घालणें हें आज अगदीं तांतडीचें होऊन बसलें आहे. वसाहतवादाचें उच्चाटन झालें पाहिजे हें

खरें असलें तरी आज तारतम्यानें विचार करतां त्याची आज एवढी तांतडीची गरज नाहीं, जितकी कम्युनिझमला पायबंद घालण्याची गरज आहे ! " असें त्यांचें म्हणणें पडलें. या उलट आशियाई प्रतिनिधीं-नीं, विशेषतः भारतीय प्रतिनिधींनीं असें मत मांडलें कीं, " कोणत्याहि गटाला न मिळतां आपलें परराष्ट्रीय धोरण स्वतंत्र ठेवणें, सर्वांशींच मित्रत्वाचे संबंध ठेवणें हेंच इष्ट होय. कोणत्याहि गटाला न मिळण्यानेंच, (non-alignment नेंच), आक्रमणाला तोंड देतां येईल. तिसरें महायुद्ध टाळण्याचा हाच उपाय आहे. " पाकिस्तानांतील प्रतिनिधींनीं अगदीं एकमतानें नव्हे, — त्यांच्यांत याबाबत मतभेद दिसून आले — त्यां-च्यांतील कांहींनीं भारतीय प्रतिनिधींच्याच मतासारखें मत व्यक्त केलें.

चीनचा प्रश्न

चीन हा आक्रमक (aggressor) नाहीं, असें मत भारतीय प्रतिनिधींनीं मांडलें; त्याला ब्रिटिश, सीलोनी आणि मलायी यांनीं विरोध केला. ब्रिटिश प्रतिनिधींनीं तर तिबेट, इंडोचायना यांच्याकडे बोट दाखवून " चीनच्या आक्रमणाचा आणखी काय पुरावा पाहिजे ? " असें रोखठोक विचारलें. भारतीय प्रतिनिधींनीं त्याला उत्तर देतांना म्हटलें कीं, " इंडो-चीनच्या बाबतींत चीनचें आक्रमण आहे हें अजून सिद्ध झालेलें नाहीं. पण समजा, तें गृहीत धरलें तरी, फ्रान्सची इंडोचीनच्या बाबतींत फार मोठी चूक होत आहे असें आम्हांस वाटतें. फ्रान्स आपला कबजा सोडून देईल, तर इंडोचीनमधील स्थानिक जनतेला आक्रमणाला तोंड देण्यास अवसर तरी मिळेल. " अर्थात् हा युक्तिवाद ब्रिटिश प्रतिनिधींना पटला नाहीं. एकानें तर यावर असा प्रतिवाद केला कीं, " इंडो-चीनमधून फ्रान्सनें ' चालतें ' होणें म्हणजे कम्युनिस्ट आक्रमणाला मुक्तद्वार करून देणें होय. त्यापेक्षां फ्रान्स-नेंच तेथें रहाणें परवडलें ! " पाश्चात्य प्रतिनिधी आपापल्या विशिष्ट अनुभवांवरून काढलेले निष्कर्ष सर्वत्रच लागू करीत होते (generalising) हें स्पष्ट दिसलें. एका ब्रिटिश प्रतिनिधीनें तर चेकोस्लोव्हेकियामध्यें कम्युनिस्टांनीं जी आक्रमक कुरघोडी (coup) केली तिच्याकडे बोट दाखवून, " कम्युनिझमपेक्षां वसाहतवाद पुरवला ! " असे उद्गार काढले.

प्रादेशिक संरक्षणकरार

संरक्षणा-(Defence) बाबत, ' नाटो ', ' मेडो ', ' ॲन्झस ', ' ई. डी. सी. ' इत्यादि प्रादेशिक संरक्षण-करारांबाबत चर्चा झाली. फ्रान्स आणि पोर्तुगाल यांच्या वसाहतवादास ' नाटो 'मुळें कसें प्रोत्साहन मिळत आहे, हें भारतीय प्रतिनिधींनीं एकमुखानें दाखवून दिलें. ई. डी. सी. किंवा युरोपसंरक्षणसमिति ही राष्ट्राच्या स्वयंपूर्ण सत्तेला बाध आणणारी, राष्ट्रांच्याहि वर सत्ता गाजवणारी 'सुप्रा- नॅशनल संघटना ब्रिटनला मान्य नाहीं. म्हणून अजून ग्रेट ब्रिटन त्या समितींत आलेलें नाहीं. जर्मनीला या दावणींत गोंवून, फ्रान्सचें समाधान करण्याचा हेतु या ई. डी. सी. मागें आहे.– ' मेडो ' किंवा ' मध्यपूर्व संरक्षण करारा'च्या बाबतींत चर्चा होत असतांना, एक ब्रिटिश प्रतिनिधीनें त्याच्या समर्थनार्थ असें सांगितलें कीं, "टर्की आणि पाकिस्तान यांच्यामधील करार अत्यावश्यक झाला आहे; कारण, पाकिस्तानची रक्षणसीमा आतां खैबरखिंड राहिली नसून , ती आतां कॅस्पिअन समुद्र झाली आहे ! " या चर्चेत भारतीय प्रतिनिधींनीं आपलें मत स्पष्ट केलें कीं या मध्यपूर्वेतील प्रतिगामी शक्तींना सांवरून त्यांना प्रबल करणें व आपलें वसाहतवादी आसन स्थिर करणें यांतच ' मेडो चें पर्यवसान होणार आहे. – आग्नेय आशियाच्या संरक्षणाबाबत चर्चा होत असतां, पाक-अमेरिका लष्करी करारावर साहजिकच वाद रंगला. " आक्रमणाला तोंड देण्याकरितां संरक्ष-णाची जादा तरतूद करणें पाकिस्तानला प्राप्त आहे. भारताकडून आक्रमण होईल याची पाकिस्तानला भीति वाटते. काश्मीर-प्रश्न असा चिघळत पडला आहे. तो सोडवायला या लष्करी साहित्याची जरूर आहे. या कराराबाबत निषेध प्रदर्शित करून भारत पाकिस्तानच्या कारभारांत नसता हस्तक्षेप करीत आहे " असें पाकिस्तानी प्रतिनिधींनीं सांगितलें. – भारतीय प्रति-निधींनी अर्थात् याला जीं उत्तरें दिलीं, त्यांचा आशय जाहीरच आहे. " भारताला हस्तक्षेप करायचें कारण नाहीं. परंतु ज्यामुळें पाकिस्तान अमेरिकेचा ' गुलाम ' (Stooge) होण्याची शक्यता आहे , त्या घटनेबाबत आपलें मत व्यक्त करण्याचा भारताला हक्क आहे " हें त्यांनीं सांगितलें. – भारत-पाकिस्तानबाबत ' मन्रो डॉक्ट्रिन ' सारखा कांहीं करार योजून परस्परसंरक्षणाची

तरतूद करावी याबाबतहि चर्चा झाली. कायदे आझम जिना यांनाहि ' मन्रो डॉक्ट्रिन ' सारखें इकडेहि कांहीं-तरी असावें असें वाटत होतें असें म्हणतात. ब्रिटिश प्रतिनिधींनीं मात्र, ' मन्रो डॉक्ट्रिन ' सारखा प्रकार येथें उपयोगीं पडणार नाहीं, असें सांगितलें. अमेरिके-च्या बाबतींत, ' मन्रो डॉक्ट्रिन ' उपयोगीं पडावयाला, ब्रिटिश आरमाराच्या बळाचा आधार होता तसा प्रस्तुत प्रकरणीं नाहीं हें लक्षांत ठेविलें पाहिजे, असें ब्रिटिश प्रतिनिधी म्हणाले.

पॅसिफिक डिफेन्स करारावर चर्चा होत असतांना, आस्ट्रेलिया व न्यू झीलंड ह्यांना चीन व जपानची भीति वाटत असून, तन्निवारणार्थ तीं अमेरिकेकडे पहात आहेत हें दिसून आलें. आग्नेय आशियांतील इतर राष्ट्रांनींहि अशा प्रकारच्या संरक्षणयोजनेंत सामील व्हावें, असेंहि त्यांनीं सुचविलें.

काश्मीरचा प्रश्न

काश्मीर आणि कालव्यांचें पाणी याबाबतहि चर्चा खूप होऊन, त्या चर्चेत एका बाजूला केवळ एकटा भारत व दुसऱ्या बाजूला बाकी इतर सर्व, असें दृश्य दिसून आलें. पाकिस्ताननें आपल्या जबरदस्त प्रचारानें, काश्मीर प्रश्नाच्या गुंतागुंतीकडे दुर्लक्ष करून, त्या प्रश्नाला फाजील अतिरिक्त असें साधें (oversimplified) स्वरूप देऊन, भारत-विरोधी भूमिका तयार केली आहे. " कसली आली आहे गुंतागुंती ? काश्मीर प्रश्न अगदी सीधासाधा आहे ! काश्मीरमध्यें बहुसंख्य लोक मुसलमान आहेत. ज्या तत्त्वावर पाकिस्तान बनलें, त्या तत्त्वाचा तर्कशुद्ध परिणाम म्हणजे काश्मीर हें पाकिस्तानचेंच आहे " असा त्यांचा साधा युक्तिवाद आहे. प्रचारतंत्र म्हणून काश्मीरप्रश्नाशीं त्यांनीं कालव्यांचें पाणीहि निगडित करून टाकलें आहे. खरें म्हणजे कालव्याच्या पाण्याबाबत त्यांचा प्रचार अगदीं निराधार आहे. भारताचें याबाबतचें धोरण बिलकूल अडवणुकीचें नाहीं. वर्ल्ड बँकेच्या तज्ज्ञ समितीनें कालव्याच्या पाण्याबाबत आपली शिफारस केली असून तिचा विचार चालू आहे. अर्थात् चर्चेत ही गोष्ट भारतीय प्रतिनिधींनीं नजरेस आणली तरीपण काश्मीर-प्रश्नाच्या बाबत भारतीय प्रतिनिधींच्याविरुद्ध एक-मतानें काहूर उठलें भारतीय प्रतिनिधींनीं " काश्मीर-वर पाकिस्ताननें कसें आक्रमण केलें, त्याचा 'युनो'मध्यें एकंदर काय इतिहास घडून आला, १९५३ मध्यें भारतीय व पाक पंतप्रधानांच्या भेटींत काश्मीरप्रश्न सोडविण्याबाबत ठरलें आहे, मध्यें हा पाक-अमेरिका करार उपटला नसता, तर ठरल्याप्रमाणें सार्वमताच्या पूर्वतयारीबाबत वाटाघाटी पुढें होऊं शकल्या असत्या, सार्वमताच्या बाबतींत भारताची भूमिका आरंभापासून-ची कायमच आहे " वगैरे सांगितलें. परंतु भारतीय प्रतिनिधींचा हा युक्तिवाद इतरांना पटलासें दिसलें नाहीं. " पाकिस्ताननें पहिलें आक्रमण काश्मीरवर केलें असेल ! झालें गेलें विसरून जा. उगीच तीच तीच गोष्ट उगाळण्यांत काय फायदा ? — उलट भारतानें यूनोचे ठराव पाळण्यांत कसूर केली आहे. यूनोच्या ठरावाचें पालन करून सार्वमत कां नाहीं घेऊन टाकीत ? सार्वमत घ्यावयाचें भारत टाळीत आहे. काश्मीर-घटनासमितीनें काश्मीरच्या सामीलीकरणाचा ठरावहि करून टाकला आहे. भारताच्या मनांत सार्वमत घ्यावयाचें नाहीं, अशी आम्हांला शंका येते " असें पाकिस्तानी प्रतिनिधींनीं बोलून दाखविलें व त्याला इतर प्रति-निधींनीं पाठिंबा दिला. सार्वमतांत काश्मीर पाकिस्तान-ला नक्की मिळणार, अशी पाकिस्तानी प्रतिनिधींची बालं-बाल खात्री दिसून आली. एवढें खरें कीं, काश्मीर प्रश्नानें पाकिस्तानी प्रतिनिधींचीं मनें व्यापून टाकलेलीं दिसलीं. काश्मीर प्रश्नापुढें त्यांना कांहीं सुचत नाहीं असें दिसलें. चर्चेमध्यें, प्रस्तुत वा अप्रस्तुत याचा कांहींहि विचार न करतां, काश्मीरचा प्रश्न ते केव्हांहि काढीत असत. पाकिस्तानच्या जीवनमरणाचा प्रश्न काश्मीरशीं निगडित झाला आहे, असें त्यांच्या वृत्तीवरून दिसून आलें. पाक प्रतिनिधींमध्यें आणि लाहोरला खुद्द 'आझाद पाकिस्तान' या संघटनेचे पुरोगामी प्रवृत्तीचे, मुस्लिम लीगची जातीय प्रवृत्ति पसंत नसलेले, पाकि-स्तानचा धर्मनिरपेक्ष विकास व्हावा असें इच्छिणारे कांहीं तरुण दिसले. त्यांच्याशीं बोलतांना असें दिसून आलें कीं, पाक जनतेमध्यें पुरोगामी प्रवृत्तींचा प्रचार करण्याच्या आड हा काश्मीरप्रश्न येत आहे. काश्मीर प्रश्नाभोवतीं सगळी जातीय, धर्मांध वृत्ति केंद्रित झाली आहे. काश्मीर प्रश्नाची तड लागल्याशिवाय पाक जनता दुसरें कांहीं ऐकायला तयारच नाहीं. म्हणून हा काश्मीरप्रश्न तांतडीनें सुटणें या पुरोगामी युवकांच्या दृष्टीनेंहि आवश्यक झालें आहे. ही सर्व चर्चा व तीमधून

प्रकट झालेला सूर पाहून, हा काश्मीरचा प्रश्न अगदीं तांतडीनें, शक्य तितक्या लवकर सुटावा, तो सुटण्याचा सुदिन अगदीं लवकर येवो, असें भारतीय प्रतिनिधींस वाटून गेलें असल्यास नवल नाहीं.

अधिवेशनांत आर्थिक व व्यापारविषयक परिस्थिति व धोरण यासंबंधींहि चर्चा झाली. नजीकच्या भविष्य-काळांत अमेरिकेंत मंदीची सुरुवात होण्याची शक्यता आहे. त्या संभाव्य मंदीचे दुष्परिणाम शक्य तों टाळावेत म्हणून 'स्टर्लिंग टापू (area)' बलिष्ठ करावा असा एकंदर सूर दिसला. अप्रगत देशांना लागणाऱ्या भांडवलाची तरतूद राष्ट्रकुलाकडून होऊं शकणार नाहीं, हेंहि चर्चेंतून स्पष्ट झालें. कोलंबो-योजने-नें केलेली तरतूद फारच तुटपुंजी आहे, याबद्दल एकमत दिसून आलें. राष्ट्रकुलांतील घटक राष्ट्रांनीं परस्परांशीं व्यापार अधिकाधिक वाढविला पाहिजे, असेंहि सुच-विण्यांत आलें. 'पोलादी पडद्या' मागील देशांशीं व्यापारी संबंध प्रस्थापित करण्याच्या बाबतींत विशेष महत्त्व दिलें गेलें नाहीं.

लोकांचें स्थलांतर व वसति

राष्ट्रकुलामधील एका राष्ट्रांतील लोकांचें दुसऱ्या राष्ट्रांत स्थलांतर होऊं देऊन त्या स्थलांतरितांची वसति तेथें करूं द्यावी– या स्थलांतरीकरणा-(migration) च्या प्रश्नाबाबत बरीच एकवाक्यता दिसून आली. आपल्या देशांत दुसऱ्या देशाचे नवीन लोक वसतीकरितां घेतांना त्यांच्या योगें आपल्या नेहमींच्या जीवनपद्धतींत, संस्कृतींत, वंशव्यवस्थेंत व्यत्यय येणार नाहीं ह्याची खबरदारी प्रत्येक देशानें घेणें स्वाभाविकच होय; म्हणून अशा तऱ्हेनें एका राष्ट्राचे स्थलांतरित दुसऱ्या राष्ट्रामध्यें वसतीकरतां यावयाचे असतील तर, ते घेतांना त्यांची संख्या ठरविण्याचा हक्क त्या दुसऱ्या राष्ट्राला राहील हें तत्त्व मान्य करण्यांत आलें. "पूर्व बंगालमध्यें लोक-संख्या अतिशय दाट झाली आहे. तेथील दाटी कमी करण्याकरितां राष्ट्रकुलांतील इतर घटकांजवळ असलेली मोकळी जागा वसतीकरितां मिळावी' अशी पाकिस्तानी प्रतिनिधींनीं कळकळीची विनंति केली. वेस्ट इंडीजच्या प्रतिनिधीनेंहि आस्ट्रेलिआ व कॅनडा यांच्या वर्णभेदमूलक अन्यायी धोरणांचा निषेध करून, त्यांच्याजवळ असलेली मुबलक मोकळी जागा वेस्ट इंडीजच्या लोकांना वसतीकरितां मिळावी, असें मोठ्या आवेशानें प्रतिपादन केलें. – या दोन्हींहि बाबतींत इतर प्रतिनिधींचा विरोध दिसला नाहीं. भारतीय प्रति-निधींनीं मात्र 'स्थानांतरीकरणानेंच केवळ लोक-संख्येच्या बेसुमार वाढीचा प्रश्न सुटणार नाहीं' याकडे लक्ष वेधून, ज्या देशांत आपण आपले लोक वसती-करितां पाठविणार, ते पाठविण्यापूर्वीं त्या देशांतील लोकांचीहि त्याला संमति आहे हेंहि आपण पाहिलें पाहिजे व याच धोरणानें भारत-सरकार प्रेरित झालें आहे याचा निर्देश केला. दक्षिण आफ्रिकेच्या प्रतिनिधीनें एक निबंध वाचला. त्यांत भारताचा आफ्रिकेवर साम्राज्यवादी डोळा आहे असें सूचित केलें होतें. पण यांत कांहीं तथ्य नाहीं असें इतर सर्वांनी सांगितलें.

'भिन्नवर्णवंशीयांचे संबंध' ('Racial Re-lations') प्रश्नावर जी चर्चा झाली तीमध्यें दक्षिण आफ्रिकेचे प्रतिनिधी एका बाजूला व बाकीचे सर्व दुसऱ्या बाजूला असें (काश्मीर प्रश्नावरल्यासारखेंच) दृश्य दिसून आलें. दक्षिण आफ्रिकेच्या प्रतिनिधींनीं तेथील गोऱ्यांची बाजू मोठ्या हिरिरीनें मांडली. श्वेत-वर्णीय लोक इतर कृष्णवर्णीयांशीं कधींहि मिळून जाणार नाहींत, 'लढत लढत आम्हीं मरूं पण कृष्णवर्णीयांचें आमच्या बरोबरीनें साहचर्य (co-existence) आम्ही चालूं देणार नाहीं' असा त्यांच्या म्हणण्याचा आशय होता. ज्याला आपण 'apartheid', 'Segre-gation' 'वर्णवैषम्याधिष्ठित विभजन' म्हणतों त्याला दक्षिण आफ्रिकन गोरे लोक "Differential development of different peoples" "भिन्न भिन्न लोकांची भिन्न भिन्न प्रगति" असें सोज्ज्वळ नांव देतात.

पूर्वबंगाल निवडणुकीची प्रतिक्रिया

परिषदेचें अधिवेशन चालू असतांनाच पूर्व बंगाल निवडणुकांमध्यें मुस्लिमलीगचा दणदणीत पराजय होत असल्याच्या बातम्या येत होत्या. त्या बातम्यांची लाहोरमधील प्रतिक्रिया भारतीय प्रति-निधींना अनपेक्षित होती. मुस्लिम लीगच्या पराभवा-मुळें पश्चिम पाकिस्तानांतील लोकांना समाधान, आनंद वाटत असल्यासारखें दिसून आलें. 'मुस्लिम लीगचा संकुचित पाया उखडून, व्यापक पायावर त्याची पुनर्रचना व्हावयास पाहिजे, पाक मध्यवर्ती मंत्रिमंडळाचीहि पुनर्रचना व्हावयास पाहिजे, या

दृष्टीनें मुस्लिम लीगचा पराभव झाला हें बरेंच झालें,' असें मत प्रकट होत असलेलें दिसून आलें. – लाहोर-मध्यें जें कांहीं दिसलें त्यावरुन पाकिस्तानची आर्थिक घडी समाधानकारक नसावी असें वाटलें. साध्या साब-णाच्या वडीला १४ आणे पडतात. साध्या लांबरुंदीच्या चॅवेल-जोडीला १४ रुपये पडतात. पूर्व बंगालमध्यें तर यापेक्षां परीस्थिति आर्थिक दृष्ट्या तंग आहे असें म्हणतात. पाक रुपया खूपच पडला आहे. (Devaulation) पाक १०० रुपये हिंदी १४४ रुपयांच्या बरोबर असा अधिकृत दर असूनहि, प्रत्यक्ष खुद्द दिल्लीला पाक १०० रुपये हे हिंदी ८५ रु. च्या बरोबर आढळून येतात. पाक–भारतमधून मालाची बेकायदेशीर 'यातायात' व ने-आण (Smug-gling) चालू आहे. – एक वेळ लाहोर पंजाबमधील 'पॅरीस' गणलें जात होतें. १९४६ पूर्वी तेथील लोक, वातावरण एकंदर प्रसन्न, हौशी, रंगेल दिसत असे. आज तेथें फाळणीनंतर आलेली जीवनांतील अस्थिरता कमी दिसत आहे, हें खरें. पण पूर्वीचा तेथील उल्हास व प्रसन्नता पार मावळलेली दिसून येते. पोषाख वगैरे वरुन लोकांचें दैन्यदारिद्र्य दिसून येतें.

राष्ट्रकुल-संबंधपरिषद्, लाहोर (१९५४)

प्रतिनिधींचें स्थल-व्यवसायदृष्ट्या वर्गीकरण

देश	व्यापार उद्योग	विद्यापीठ व तत्सदृश	वृत्तपत्र	वकीलात व सरकारी नौकरी	वकीली	राजकारणी	एकंदर
आस्ट्रेलिया		२		१			३
कॅनडा	२	२	१		२		७
सीलोन				१		१	२
भारत	२	५	१			२	१०
न्यू झीलंड		१					१
पाकिस्तान	२	५	१	२ (एक हायकोर्ट जज्ज, एक यू. एन्. प्रतिनिधि)	३	२	१५
दक्षिण आफ्रिका	१	२	१		१		५
युनायटेड किंग्डम	१	५	१	१ (विमान-दलांतील)		५ (पैकीं तीन माजी मंत्री)	१३
ब्रिटिश वस्ट इंडीज् (त्रिनिदाद)					१		१
फेडरेशन ऑफ मलाया				१			१
फेडरेशन ऑफ होडेशिया ॲन्ड न्यू झीलंड	१					१	२
एकंदर	९	२२	५	६	७	११	६०

विद्यापीठांतील शिक्षणाच्या माध्यमाचा प्रश्न

[स्वातंत्र्योत्तर भारतामध्यें शिक्षणक्षेत्रांत उच्च शिक्षणाच्या माध्यमाच्या प्रश्नाला मोठें महत्त्व प्राप्त झालें असून, मुंबईसरकारच्या शिक्षणमंत्र्यांनीं याबाबत मध्यंतरी जाहीर केलेल्या आपल्या धोरणामुळें, या प्रश्नाला तर अत्यंत तीव्र आणि गुंतागुंतीचें स्वरूप आलें आहे. या प्रश्नाच्या विविध बाजू विशद व्हाव्यात म्हणून पुढें दिलेले तीन लेख वाचकांस समयोचित वाटतील. या लेखांचे लेखक विद्यापीठीय अध्यापनाचा व विद्यापीठीय कारभाराचा दीर्घकालीन अनुभव घेतलेले असल्यामुळें त्यांचे या प्रश्नासंबंधींचे विचार वाचकांस विचारणीय व उद्बोधक वाटतील असा विश्वास वाटतो. या लेखकांचे लेख प्रायः लिहून झाल्यावर कॉंग्रेस कार्यकारिणीचा शिक्षणाच्या माध्यमाबाबतचा महत्त्वाचा ठराव जाहीर झाला. त्या ठरावाचा अनुवादहि या लेखांच्या नंतर दिला आहे. यापुढें सरकार व विद्यापीठें उच्च शिक्षणाच्या माध्यमाच्या प्रश्नाबाबत पुढें निश्चित पाउलें कोणतीं टाकतात तें जागरूकपणें पहाण्यास प्रस्तुत लेखांतील विविध दृष्टिकोणांतून केलेली चर्चा व सूचना सहायभूत होतील यांत शंका नाहीं. — का. सं.]

पूर्वतयारीची आवश्यकता

प्रा. गोवर्धन पारीख

जून १९५५ पासून सरकारी कॉलेजांतून 'हिंदी' माध्यम म्हणून स्वीकारण्यांत येईल आणि हिंदींतून शिकवण्यास प्रारंभ केला जाईल, असा निर्णय मुंबई सरकारनें घेतल्याचें जाहीर झालें आहे. आणि त्याची अंमलबजावणी करण्याच्या दिशेनें, विद्यापीठांच्या म्हणण्याचा फारसा विचार न करतां, सरकारी पावलेंहि पडूं लागलीं आहेत. मुंबई राज्यांतील भाषिक वादाचें स्वरूप यामुळें अधिकच व्यापक झालें असून शैक्षणिक क्षेत्रांत पेंचप्रसंग निर्माण होण्याचा संभव आहे. हजारों विद्यार्थ्यांच्या भवितव्याशीं निगडित असलेल्या या प्रश्नासंबंधीं बहुसंख्य लोकांत उदासीनतेची वृत्ति असणें व ती कायम रहाणें हें अत्यंत घातुक होय. या प्रश्नाचा वेळींच विचार होऊन त्यांतून जबाबदार मार्गदर्शन निघणें अत्यंत आवश्यक आहे. "विद्यापीठें ऐकणार नसतील तर कायदा करूं" आणि "कायदा केलात तर इलाज नाहीं, नाहींपेक्षां कांहींहि करतां येणें अशक्य आहे" हे दोन्हीहि दृष्टिकोण अनुचितच म्हटले पाहिजेत.

सरकारी निर्णयाचें समर्थन फक्त एका व्यावहारिक अडचणीच्या आधारावरच होऊं शकतें. केवळ चार वर्षें एका 'पेपरां'त पास होण्याइतकेंच इंग्रजीचें अध्ययन केल्यामुळें १९५५ च्या जूनमध्यें विद्यापीठांत दाखल होणाऱ्या विद्यार्थ्यांचें इंग्रजीचें ज्ञान अगदीं तुटपुंजें असणार ही ती अडचण होय. यामुळें त्यांना इंग्रजींतून निरनिराळे विषय शिकविणें अशक्य होईल. म्हणून विद्यापीठांतील शिक्षणाचें माध्यम बदलणें आवश्यक आहे. विद्यापीठांच्या शैक्षणिक कार्यांत अडचण निर्माण करणारा हा माध्यमिक शिक्षणांतील बदल सरकारनें त्यांच्या सल्ल्यानें केला नाहीं, उलट त्यांच्या विरोधाला न जुमानतां तो करण्यांत आला. दोष कोणाचा यापेक्षां अडचणींतून मार्ग कसा काढावयाचा हा आज अधिक महत्त्वाचा प्रश्न आहे हें खरें. तथापि ही अडचण एककल्ली सरकारी धोरणांतून निर्माण झाली असल्यामुळें इतःपर तरी या बाबतींत विद्यापीठांचें आणि शिक्षण-शास्त्रज्ञांचें म्हणणें ऐकून घेण्याची व त्यांच्याशीं सहकार्य करण्याची तयारी सरकारनें दाखविली पाहिजे. त्यावांचून उच्च शिक्षणक्षेत्रांत गोंधळ निर्माण होणें अपरिहार्य आहे.

मुंबई-राज्यानेंच इंग्रजीच्या उच्चाटनाची एवढी घाई कां करावी असा प्रश्न अनेकदां विचारण्यांत येतो. आणि तो रास्तहि आहे. घटनेकडे बोट दाखविल्यानें या प्रश्नाचें समाधानकारक उत्तर मिळूं शकत नाहीं. एक तर, राज्यघटना निश्चित होण्यापूर्वीच सरकारचें माध्यमिकशिक्षणविषयक धोरण आखलें गेलें. यामुळें राज्यघटनेऐवजीं सवंग लोकप्रियतेची हांव हीच त्याला जबाबदार म्हटली पाहिजे. दुसरें म्हणजे राज्यघटनेनुसार आज इंग्रजी गेलें पाहिजे असें म्हणतां येत नाहीं; ठर-विल्याप्रमाणें पंधरा वर्षांनंतर म्हणजे १९६५ सालीं तें जाईलच असाहि निर्वाळा देतां येत नाहीं. आजच दक्षिणेकडील कांहीं घटकराज्यें, तें आणखी पंधरा वर्षें तरीं कायम ठेवावें, अशा प्रकारची मागणी करीत आहेत. राज्यघटनेप्रमाणें राष्ट्राध्यक्षांनीं नेमलेलें कमिशन

अनुक्रमणिका

१९५५ सालीं आणि केंद्रीय संसदेची समिति १९६० सालीं इंग्रजीच्या स्थानासंबंधीं चौकशी करणार आहे. 'इंग्रजीचें उच्चाटन' हा राष्ट्रीय प्रश्न आहे; प्रादेशिक नव्हे. तो भावात्मक (positive) प्रश्न आहे; अभावात्मक नव्हे. त्याच्या भावात्मक बाजूकडे वळलें म्हणजे सबंध देशांत शक्य तों एकच सुसूत्र धोरण असण्याचें महत्त्व स्पष्ट होतें. एखादें घटक राज्य आपल्याच तंत्राप्रमाणें याबाबत वागत गेल्यास इतरांच्या दृष्टीनें त्यामुळें अडचणी निर्माण होणें अपरिहार्य आहे; राष्ट्रीय ऐक्याला देखील असें धोरण विघातक ठरेल. मुंबई सरकारच्या धोरणाचें स्थूल स्वरूपांत कायदेशीर समर्थन कदाचित घटनेच्या ३४८ (३) या कलमाकडे बोट दाखवून करतां येईल. तथापि प्रश्न कायदेशीरपणाचा नसून राजकीय शहाणपणाचा आहे. आणि आरंभीं उल्लेख केलेला प्रश्न विचारतांना या शहाणपणाबद्दलच संशय व्यक्त केला जातो हें ध्यानांत ठेवलें पाहिजे.

राजकीय विचार क्षणभर बाजूस ठेवून राज्याच्या प्रस्तुतच्या धोरणाचें शैक्षणिक दृष्टिकोणांतून विवेचन करणें इष्ट होईल. शैक्षणिक दृष्ट्या माध्यम म्हणून मातृभाषेचाच दावा निर्विवादपणें मान्य होण्यासारखा आहे. विशिष्ट प्रदेशांतील 'प्रादेशिक भाषा' आणि जवळजवळ सर्वांचीच मातृभाषा या एकच असल्यानें प्रादेशिक भाषेचा पुरस्कार समर्थनीय बनतो. तथापि याव्यतिरिक्त अन्य भाषेचा पुरस्कार हा तात्त्विक भूमिकेवरून होऊं शकणार नाहीं. तो या ना त्या भाषेच्या स्वीकारापासून होणाऱ्या व्यावहारिक फायद्यावरच आधारलेला असणार हें उघड आहे. म्हणून हिंदीविषयींचा सरकारी आग्रह हा तत्त्वाधिष्ठित म्हणतां येत नाहीं. त्याचें स्वरूप व्यावहारिक आहे. आणि व्यावहारिक दृष्टीनें या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं प्रथम माध्यमाचें स्थान व महत्त्व यासंबंधीं थोडेसें स्पष्टीकरण करणें उचित होईल.

मुंबईत जून १९५२ मध्यें भरलेल्या प्राध्यापकांच्या परिषदेसाठीं मुंबई विद्यापीठांतील प्राध्यापकांच्या संघानें या प्रश्नासंबंधीं एक परिपत्रक तयार केलें होतें. या परिपत्रकांत वरील स्पष्टीकरण अत्यंत मार्मिकपणें केलेलें आढळतें. त्याचा सारांश असा : शैक्षणिक क्षेत्रांत प्राथमिक, माध्यमिक, उच्च असें जों जों वर जावें तों तों कसें शिकवावयाचें याचें महत्त्व कमी होतें आणि काय शिकवावयाचें याला महत्त्व येतें. पद्धतीकडून ज्ञानाकडे आपण वळतों. याचा परिणाम माध्यमाच्या स्थानावर होणेंहि अपरिहार्य आहे. या दृष्टीनें विचार केल्यास उच्च शिक्षणाचें माध्यम म्हणजे जिच्यांतून तें शिक्षण दिलें जातें अशी भाषा हा अर्थ पुरेसा नव्हे; जिच्या योगानें नवीं, विविध स्वरूपाचीं ज्ञानदालनें अध्यापकाबरोबरच विद्यार्थ्याला देखील खुलीं होतात अशी भाषा ही कल्पना त्यांत अंतर्भूत आहे. विशिष्ट भाषेंत उपलब्ध असलेलें ज्ञान आणि भाषेची वाढ हीं परस्परावलंबी आहेत; म्हणून ज्या भाषेंत विविधक्षेत्रांतील ज्ञानसंपदा उपलब्ध असेल तीच भाषा माध्यम म्हणून योग्य म्हटली पाहिजे. भाषेची अशा प्रकारें वाढ होण्यास कालावधि जावा लागतो. म्हणून भारतीय भाषांचा शिक्षणतज्ज्ञांच्या मतानें किमान आवश्यक विकास झाल्यावांचून माध्यम म्हणून त्यांचा तांतडीनें स्वीकार करणें धोक्याचें ठरेल. त्यामुळें शिक्षणाचें आधींच खालावलेलें आजचें मान आणखी खालीं गेल्यावांचून रहाणार नाहीं. या प्रश्नाकडे भावनात्मक दृष्टीनें पहाणें चुकीचें व धोक्याचें ठरेल.

शिक्षणाच्या खालावत चाललेल्या पातळीसंबंधीचें हें निदान विद्यापीठांतील सर्वच ज्ञानशाखांना लागू होणारें आहे. यांतील धोक्याची जाणीव असल्यामुळेंच राधाकृष्णन् कमिशननें **व्यवहार्य** वाटेल तेव्हांच इंग्रजीऐवजीं भारतीय भाषांचा उच्च शिक्षणाचें माध्यम म्हणून उपयोग करावा असा निर्णय दिला आहे. या व्यवहार्यतेचें त्यांनीं एक किमान गमकहि सुचविलें आहे. आंतरराष्ट्रीय तंत्रविज्ञानविषय व वैज्ञानिक संज्ञा देशी भाषांतून आणणें, त्या रुळवल्या जाणें, त्या शब्दांचे उच्चार व लेखन त्या त्या भाषांतील उच्चारपद्धतीला व लिपीला अनुलक्षून निश्चित होणें हें तें गमक होय. उच्च शिक्षणासाठीं प्रादेशिक भाषांचा उपयोग करावा; मात्र संघराज्यभाषा म्हणजे हिंदी कांहीं किंवा सर्व विषयांसाठीं उपयोगांत आणण्याची मुभा असावी असेंहि मत या कमिशननें व्यक्त केलें आहे. तथापि विज्ञान आणि तंत्रविद्येंतील आमचा मागासलेपणा आणि जीवनाचे अनेक निरनिराळे प्रश्न सोडविण्याची अत्यंत निकडीची गरज ध्यानांत घेतां, ज्यामुळें या क्षेत्रांतील शिक्षणाची पातळी खाला-

घेल असें कांहींहि कोणत्याहि कारणास्तव होतां कामा नये असा स्पष्ट इषाराहि त्यांनीं दिला आहे; आणि वैज्ञानिक व तंत्रविद्येच्या क्षेत्रांतील आंतरराष्ट्रीय संज्ञापद्धतीच आम्ही स्वीकारली पाहिजे असें आग्रहानें म्हटलें आहे. अशा प्रकारच्या शास्त्रीय संज्ञा सुमारें पंचवीस-तीस लाख असून त्यांत सतत भर पडत आहे, हें ध्यानांत घेतलें म्हणजे प्रस्तुत प्रश्नाचें स्थूल स्वरूप ध्यानांत येतें. याशिवाय सामाजिक शास्त्रें, तत्त्वज्ञान इत्यादींतील संज्ञांचा प्रश्न आहेच. अशा परिस्थितींत 'वर्ष दोन वर्षांत क्रमिक पुस्तकें तयार करून देऊं; तीं मिळालीं म्हणजे झालें' अशा प्रकारच्या घोषणांसंबंधी न बोलणेंच योग्य होय.

तात्पर्य, मुंबई-सरकारच्या हिंदीबाबतच्या आग्रहाला राधाकृष्णन्-कमिशनच्या अहवालांत आधार मिळत नाहीं हें उघड आहे. त्या कमिशननें तांतडीच्या कोणत्याहि निर्णयांतील धोका स्पष्ट करण्यापलीकडे निश्चितपणें कांहींच सांगितलें नाहीं. मत व्यक्त केलेंच असलें तर ते प्रादेशिक भाषांच्या बाजूनेंच होय असें म्हणतां येईल. हिंदीसंबंधी आणखीहि कांहीं महत्त्वाच्या अडचणी आहेत. भारतांतील भाषाभिन्नत्वाची चिकित्सा करतांना पूर्वेकडील हिंदी, पश्चिमेकडी हिंदी, बिहारी आणि राजस्तानी असे हिंदीचे चार प्रकार कमिशननें सांगितले आहेत. पूर्वेकडील हिंदींत 'अवधी' आणि बिहारींत 'मैथिली', 'मागधी' आणि 'भोजपुरी' असे उपप्रकार येतात. उलट पश्चिमेकडे उर्दू, व्रजभाषा आणि उच्च हिंदी हे महत्त्वाचे प्रकार आहेत. ह्या केवळ बोल-भाषा (dialects) नव्हत; त्यांच्यांत उत्तम साहित्य निर्माण झालेलें आहे. त्यांच्यांतील श्रेष्ठतेविषयीं कडाक्याचे वाद आहेत. हिंदी, हिंदुस्तानी आणि उर्दू हीं कलहाचीं चिन्हें बनलीं आहेत. हिंदी-संबंधींच्या गुंतागुंतीच्या स्वरूपाचें अशा प्रकारें दिग्दर्शन करून घटनासमिति हा प्रश्न सोडवील असा आशावाद राधाकृष्णन्-कमिशननें व्यक्त केला. घटनेंतील आठव्या परिशिष्टांत भारतीय भाषांच्या यादींत हिंदी आणि उर्दू या दोहोंचा समावेश करण्यांत आला आहे. आणि त्याबरोबरच संस्कृत व भारतीय भाषांच्या साहाय्यानें हिंदीची शब्दसंपत्ति वाढविण्याचा आणि हिंदुस्तानी व अन्य भाषांतील शैली, वाक्यप्रयोग इत्यादींच्या आधारानें हिंदी संपन्न करण्याचा व त्यायोगें भारतांतील विविध गटांकडून उपयोग होण्याच्या दृष्टीनें तिचा विकास करण्याचा आदेश देण्यांत आला आहे. याबरूनहि ३५१ कलमांत उल्लेख केलेली आणि ३४३ ते ३५१ कलमांत सामान्यतः अभिप्रेत असलेली 'हिंदी' आणि आठव्या परिशिष्टांत उल्लेख केलेली हिंदी या दोन भिन्न भाषा होत असें अनुमान शिक्षणाचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या पोतदार-समितीनें काढलें. पहिली राज्यभाषा असून दुसरी प्रादेशिक भाषा आहे. मुंबई सरकारनें हा भेद मान्य केला आहे. यामुळें साहजिकच आज सरकार कोणत्या हिंदीची तरफदारी करीत आहे असा प्रश्न निर्माण होतो. जर त्यांना संयुक्तराज्यभाषा अभिप्रेत असेल तर ती अजून निर्माण व्हावयाची असल्यानें 'तिचा स्वीकार करा' हा आग्रह अर्थशून्य ठरतो. आणि ती प्रादेशिक भाषा असल्यास, राज्यांतील प्रादेशिक भाषा बाजूस सारून दुसरी प्रादेशिक भाषा त्यावर लादण्याचाच हा उपक्रम नव्हे काय?

राधाकृष्णन्-कमिशननें 'उच्च शिक्षणाचें माध्यम लवकर बदलणें कठीण आहे; कारण त्याबाबतींत अनेक महत्त्वाच्या अडचणी आहेत' हें स्पष्ट केलें. आंतर-विद्यापीठीय मंडळा- (Inter-University Board)नें देखील असेंच मत प्रतिपादन करून अशा प्रकारचे बदल करतांना शिक्षणाच्या दर्जाचा विचार ध्यानांत ठेवला पाहिजे हें स्पष्ट केलें. मुंबई विद्यापीठाच्या पुनर्घटनेचा विचार करण्यासाठीं नेमलेल्या भगवती-समितीनें देखील संयुक्तराज्यभाषा विकास पावेपर्यंत, निदान पुढील पंधरा वर्षें तरी, मुंबई विद्यापीठांत इंग्रजी हेंच माध्यम राहिलें पाहिजे असा स्पष्ट निर्णय दिला. यामुळें जेव्हां १९५१ सालीं मुंबई सरकारनें विद्यापीठांतील १९५५ मधील माध्यमाविषयीं आपलें मनोगत मुंबई विद्यापीठास कळवलें तेव्हां "तसें करणें मुळींच शक्य होणार नाहीं" असा स्पष्ट अभिप्राय त्या विद्यापीठानें दिला. आणि विद्यापीठांना विश्वासांत घेतल्यावांचून माध्यमिक शिक्षणांत महत्त्वाची ढवळाढवळ करणें इष्ट नव्हे असें स्पष्टपणें बजावलें. या वेळींच विद्यापीठांचा सल्ला घेऊन उभयपक्षीं मान्य असलेलें धोरण ठरवणें आवश्यक होतें. तसें झालें असतें तर आजचा अनवस्थाप्रसंग उद्भवलाच नसता. गेलीं तीनचार वर्षें

कांहींहि न करतां व्यर्थ काळ घालविल्याबद्दल जो दोष दिला जातो तो वरील परिस्थितींत सरकारकडेच जातो हें उघड आहे. 'वेळ आली म्हणजे आपलें म्हणणें सहज लादतां येईल' अशी सरकारची समजूत असावी. कारण त्यांवाचून वरील स्तब्धतेचा अर्थ लावणें अत्यंत कठिण आहे.

हिंदी कीं प्रादेशिक भाषा या वादांत जाण्याचें तूर्त विशेष कारण नाहीं. इंग्रजी कीं अन्य भारतीय भाषा हाच अजूनतरी महत्त्वाचा प्रश्न आहे. भारतीय भाषांचा अजून बराच विकास होणें जरूर आहे. त्यावांचून इंग्रजीचें उच्चाटन करणें शक्य होणार नाहीं. भिन्न भिन्न भाषिकांचा इंग्रजी घालविण्याच्या बाबतींत भावनावश पाठिंबा मिळवून सरकारनें त्याबाबत पावलें टाकलीं आणि आतां त्या भाषांना डावलून हिंदीचा पुरस्कार करण्याचा उपक्रम आरंभिला आहे. अशा प्रकारचा शिक्षणक्षेत्रांतील हा राजकीय वर्तनक्रम अनिष्ट व परिणामीं गोंधळ निर्माण करणारा आहे. बदल करण्याची वेळ आली म्हणजे मातृभाषा व म्हणून पर्यायानें प्रादेशिक भाषा यांचेंच महत्त्व मान्य करणें तत्त्वतः योग्य होईल. प्रादेशिक भाषा मान्य केल्यास आमचें राष्ट्रीय ऐक्य धोक्यांत येईल हा राजकीय विचार या बाबतींत पुनः पुढें मांडला जात आहे. मग आज राष्ट्रीय ऐक्याच्या दृष्टीनेंच इंग्रजी आवश्यक असतांना तें कायम राखण्यास काय हरकत आहे? प्रादेशिक भाषांच्या स्वीकारामुळें हें ऐक्य धोक्यांत येईल ही कल्पना प्रादेशिक विद्यापीठें सुरू करतांनाच कां सुचली नाहीं? तात्पर्य, हा आक्षेप बऱ्हंशीं अर्थशून्यच म्हटला पाहिजे. प्रादेशिक भाषांना मान्यता दिल्यानें एकच महत्त्वाची अडचण निर्माण होण्याचा संभव आहे. ती म्हणजे एका विद्यापीठांतून दुसरीकडे जावें लागणाऱ्या विद्यार्थ्यांबाबत व कांहीं अंशीं प्राध्यापकांबाबत अडचण होय. संशोधनकार्याच्या बाबतींत देखील देवाण-घेवाण कितपत शक्य होईल हाहि एक प्रश्नच आहे. परंतु उलट, प्रादेशिक भाषा बाजूस टाकून हिंदीचा स्वीकार केल्यास त्या त्या भाषांचा विकास होणें अशक्य आहे ही भीति अगदीं रास्तच म्हटली पाहिजे. या परिस्थितींतून मार्ग काढतांच येणार नाहीं असें नाहीं. देशांतील सर्व विद्यापीठांनीं एकच माध्यम स्वीकारलें पाहिजे असा आग्रह धरण्याचें कारण नाहीं. किंबहुना प्रादेशिक भाषा व हिंदी या दोन भिन्न माध्यमांचा स्वीकार करणारीं दोन प्रकारचीं विद्यापीठें असणें अपरिहार्य आहे असेंच म्हणावें लागेल. या दृष्टीनें भाषावार पुनर्रचनेंतील मुंबईच्या स्थानाबद्दल कोणतीहि बाजू न घेतां देखील मुंबईसारख्या विद्यापीठांत हिंदी हेंच माध्यम असावें असें म्हणतां येणें शक्य आहे. प्रादेशिक विद्यापीठांनीं हिंदीचा ऐच्छिक माध्यम म्हणून केवळ परीक्षेपुरताच नव्हे तर शिक्षणासाठीं देखील शक्य तों स्वीकार केला कीं वर उल्लेख केलेली अडचण फारशी शिल्लक रहाणार नाहीं. हिंदी आणि इंग्रजी हे विषय विद्यापीठांतील पहिल्या दोन वर्षांपर्यंत सगळीकडे शिकविले जावयाचे असल्यानें वरील अडचण सहज दूर होऊं शकेल. प्रथम पदवीनंतरच्या शिक्षणाबाबत कित्येक वेळां विशिष्ट विद्यापीठांतच जाण्याचा प्रसंग आजहि विद्यार्थ्यांवर येतो; यामुळें ती अडचण नवी म्हणतां येणार नाहीं. परंतु माध्यमांतील हा बदल विद्यापीठांना शक्य व योग्य वाटेल त्यावेळीं योग्य त्या पद्धतीनें करण्याचें पूर्ण स्वातंत्र्य असलें पाहिजे. सरकारनें तो त्यांच्यावर लादणें इष्ट नव्हे.

एका अर्थीं हा प्रश्न कितीतरी गुंतागुंतीचा असून केवळ सरकार आणि विद्यापीठें यांनाच तो सोडवितां येईल असेंहि समजण्याचें कारण नाहीं. उदाहरणार्थ, कायदा, वैद्यक इत्यादि व्यवसायविषयक पदव्यांच्या बाबतींत नियोजित बदल करण्यासाठीं बार कौन्सिल, मेडिकल कौन्सिल, डेंटल् कौन्सिल, व्हेटरिनरी कौन्सिल अशासारख्या संघटनांचीहि संमति घेणें जरूर आहे. त्यावांचून विद्यापीठांकरवीं देण्यांत येणाऱ्या पदव्यांचें महत्त्वहि कमी होण्याचा संभव आहे. वकिलीचा व्यवसाय करण्यासाठीं नुसती विद्यापीठाची पदवी असून भागत नाहीं. ती पदवी समाधानकारक मानून तिच्या आधारें बार कौन्सिलनें सनद देण्याचें ठरविलें पाहिजे. हीच गोष्ट वैद्यकीय क्षेत्रालाहि लागू होणारी आहे. तात्पर्य, कायद्यानें घटकराज्यानें निर्णय घेण्याचें हें क्षेत्र नव्हे.

आम्हाला विद्यापीठांवर कांहींहि लादावयाचें नाहीं; तीं स्वायत्त असून आपलें धोरण ठरविण्यास स्वतंत्र आहेत असा खुलासा सरकारच्या बतीनें कांहीं वेळां केला जातो. तथापि प्रत्यक्ष सरकारी वर्तन या भूमिकेशीं

पूर्ण विसंगत आहे. विद्यापीठांची स्वायत्तता मान्य केल्यास सरकारी कॉलेजांतून हिंदींतून शिकवण्याबाबतचा उपक्रम पूर्णपणें सोडून देणेंच इष्ट व आवश्यक होईल. हीं कॉलेजें सरकारकरवीं चालवलीं जात असलीं तरी शैक्षणिक दृष्ट्या तीं निरनिराळ्या विद्यापीठांशींच संलग्न झालेलीं आहेत. त्यांच्या शैक्षणिक कार्यांत ढवळाढवळ करावयाची आणि विद्यापीठांची स्वायत्तता मान्य आहे म्हणून म्हणावयाचें हें अगदींच हास्यास्पद होय. सरकारी कॉलेजांतील प्राध्यापकांच्या सभा बोलावून त्यांत घेतले गेलेले तथाकथित निर्णय जाहीर करीत बसण्याचा खटाटोप करण्याऐवजीं विद्यापीठांशीं या प्रश्नाबाबत चर्चा करून त्यांच्या सल्ल्यानें त्यांतून मार्ग काढणें हेंच स्वायत्ततेच्या मान्यतेशीं जुळणारें व उचित वर्तन होय.

उच्च शिक्षणक्षेत्रांतील आजचा पेंचप्रसंग सरकारच्या माध्यमिकशिक्षणविषयक धोरणांतून उद्भवला आहे. या धोरणाचें समर्थन देखील कोणीहि केलेलें नाहीं हें ध्यानांत घेणें जरूर आहे. माध्यमिकशिक्षणविषयक मुदलिआर-कमिशनचा अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला आहे. माध्यमिक शाळांतून इंग्रजीच्या शिक्षणाला योग्य महत्त्व दिलें पाहिजे आणि पहिल्या तीन वर्गांत देखील ऐच्छिक विषय म्हणून इंग्रजी शिकविण्याची तरतूद असली पाहिजे असा स्पष्ट अभिप्राय त्यांनीं व्यक्त केला आहे. त्याचप्रमाणें माध्यमिक शिक्षणक्रमांत भिन्न भिन्न व्यावसायिक अभ्यासक्रमाचा अंतर्भाव करण्याची आवश्यकता आहे असें त्यांचें मत आहे. आणि या व्यावसायिक अभ्यासक्रमांतील कित्येक बाबतींत इंग्रजीचा माध्यम म्हणून देखील उपयोग करावा लागेल अशी त्यांनीं कबुली दिली आहे. अभ्यासक्रमांतील ही विविधता वाढविण्याची कल्पना केंद्रीय शिक्षण-सल्लागारमंडळानें आतां मान्य केली असून त्याप्रमाणें प्रत्यक्ष कार्यास आरंभहि झाला आहे. अशा परिस्थितींत माध्यमिक शिक्षणांत देखील इंग्रजीचें महत्त्व कमी होण्याऐवजीं कांहीं काळ तरी वाढणार आहे. यामुळें १९४७-४८ सालीं स्वीकारलेल्या मुंबई-सरकारच्या धोरणांत बदल करण्याची गरज निर्माण झाल्याचांचून रहाणार नाहीं. आणि त्या धोरणासंबंधीं हेकेखोरपणाची वृत्ति न धरतां त्यांत आवश्यक ते बदल करण्याची तयारी सरकारनें दाखवणें हेंच उचित ठरेल.

सरकारच्या आजच्या धोरणांत आणखीहि एक महत्त्वाची, किंबहुना मूलभूत स्वरूपाची शैक्षणिक अडचण आहे. या धोरणामुळें माध्यमिक शिक्षणाचें एक व उच्च शिक्षणाचें दुसरें अशीं दोन भिन्न माध्यमें स्वीकारलीं जाणार आहेत. उच्च शिक्षणक्षेत्रांत हिंदीचा पुरस्कार करतांना माध्यमिक शिक्षणाचें माध्यम देखील हिंदीच असावें अशी भूमिका सरकारनें घेतली असती तर तें तर्कशुद्धपणाचें वर्तन म्हणतां आलें असतें. परंतु तशी भूमिका सरकारनें घेतलेली नाहीं. याचा अर्थ शालान्त परीक्षेपर्यंतचा अभ्यासक्रम विद्यार्थ्याला मराठी, गुजराती, कानडी इत्यादि प्रादेशिक भाषांतून पुरा करतां येईल. मात्र एका पेपरमध्यें पास होण्याइतकें हिंदी त्याला शिकावें लागेल. ही शिदोरी उच्च शिक्षण हिंदींतून घेण्यासाठीं त्याला कितपत उपयोगी पडणार हा एक प्रश्नच आहे. यामुळें प्रादेशिक भाषेचाच उच्च शिक्षणाचें माध्यम म्हणून स्वीकार करणें योग्य ठरतें. आणि मुंबईसारखें विद्यापीठ वगळल्यास इतरत्र प्रादेशिक भाषाच मान्य करणें उचित होईल.

तथापि माध्यम म्हणून प्रत्यक्ष उपयोगांत आणण्यापूर्वी प्रादेशिक भाषा व हिंदी या दोहोंचाहि विकास होण्याची गरज आहे. हिंदीचें तर स्वरूप देखील अजून निश्चित व्हावयाचें आहे. अशा अवस्थेंत आजच बदल करावयाचा निर्णय घेतल्यास त्यामुळें केवळ गोंधळ निर्माण होईल, दुसरें कांहींहि साध्य होणार नाहीं. एकदोन वर्षांत प्राध्यापकांनीं आपला व्यवसाय सांभाळून हिंदी शिकावें आणि लागलीच त्या भाषेंतून उच्च शिक्षण देऊं लागावें ही कल्पना प्रत्यक्ष डॉन क्विक्झोटला देखील लाजविणारीच म्हटली पाहिजे! इंग्रजींतून निरनिराळ्या ज्ञानशाखांत प्रावीण्य संपादन केलेला प्राध्यापकवर्ग थोड्याफार प्रमाणांत आज आहे. इंग्रजीचें ज्ञान कमी होऊं लागल्यामुळें त्याची संख्या हळूहळू कमी होण्याचाच संभव आहे. त्यांना अशा प्रकारें राबविण्याचा खुळचट उपक्रम करण्याऐवजीं देशी भाषा संपन्न करण्याचे प्रयत्न करण्यास त्यांना उद्युक्त करणेंच अधिक श्रेयस्कर ठरेल. आज माध्यमांत बदल करण्याऐवजीं, बदल करण्यासाठीं अनुकूल वातावरण निर्माण करण्याची खरी गरज आहे. आणि ह्या कार्याकडे लक्ष देणेंच अधिक योग्य

होईल यांत मुळीच शंका नाहीं. माध्यमविषयक या वादामुळें एकूण शिक्षणाचीच प्रतिष्ठा कमी होत असून विद्यार्थ्यांच्या मनावर त्याचे अनिष्ट परिणाम होत आहेत याचीहि दखल घेणें जरूर आहे. आज ना उद्यां केव्हांतरी संक्रमणावस्था अपरिहार्य आहे आणि त्याचे अनिष्ट परिणाम कोणाला तरी भोगावे लागणारच अशा दृष्टिकोणांतून कांहींजण या प्रश्नाकडे पहातात. परंतु तें योग्य नव्हे. संक्रमणावस्था अपरिहार्य असली तरी तिच्यांतील धोका कमी करण्याच्या हेतूनें ती नियोजित करणें हें जबाबदारीच्या जाणीवेचें लक्षण होय. भावी पिढीच्या कल्याणाशीं म्हणजेच देशाच्या भवितव्याशीं अत्यंत निगडित असलेल्या या प्रश्नाबद्दल बेजबाबदार-पणा दाखवणें हा एक अक्षम्य गुन्हा ठरल्यावांचून रहाणार नाहीं.

प्रस्तुत प्रश्नाबाबतच्या चर्चेसाठीं काहीं विधायक सूचना पुढें मांडल्या आहेत

(१) विद्यापीठांना बदल करणें इष्ट वाटेपर्यंत इंग्रजी हेंच उच्च शिक्षणाचें माध्यम रहावें. आणि त्यासाठीं माध्यमिक शिक्षणांतील पहिल्या तीन वर्गांत इंग्रजी पुनः सुरू करावें. १९५५ व त्यानंतर चारपांच वर्षें विद्यापीठांत येणाऱ्या विद्यार्थ्यांचें इंग्रजीचें ज्ञान अगदीं तुटपुंजें असेल. यामुळें त्यांना इंग्रजी शिकविण्या-ची तरतूद पहिल्या दोन वर्षांच्या अभ्यासक्रमांत विद्यापीठांनीं करावी. आणि याच अभ्यासक्रमांत १९५६ सालापासून हिंदीचा एक पेपर ठेवण्यांत यावा.

(२) प्रादेशिक विद्यापीठांत मुख्यत्वें प्रादेशिक भाषा आणि मुंबई व तत्सम अन्य विद्यापीठांत हिंदी यांचा माध्यम म्हणून स्वीकार करण्याच्या पूर्वतयारीस प्रारंभ करण्यांत यावा. त्यासाठीं आवश्यक ग्रंथरचना, भाषांतरें इत्यादि बाबतींतील निश्चित कार्यक्रम विद्यापी-ठांनीं तयार करावेत आणि सरकारनें ते पार पाडण्यासाठीं आवश्यक द्रव्यसाहाय्य द्यावें. संशोधनकार्याची प्रसिद्धि त्याचप्रमाणें विद्यापीठें आणि अन्य उच्च शिक्षणसंस्था यांनीं आपापलीं मासिकें, अहवाल किंवा अन्य प्रकाशनें दोन भाषांतून प्रसिद्ध करण्याचा उपक्रम तावडतोब सुरू करावा. आणि यामुळें लागणाऱ्या खर्चाची तरतूद सरकारनें करावी. हिंदीबाबत अन्यत्र होणारें कार्यहि विचारांत घ्यावें.

(३) माध्यमांत बदल करण्याची योग्य वेळ व पद्धत विद्यापीठांनींच ठरवावी. मुंबई-राज्यांतील सर्व विद्यापीठांच्या उपकुलगुरूंच्या समितीनें याबाबत वेळोवेळीं विचार करावा आणि शक्य तों सगळीकडे एकाच गतीनें प्रगति व्हावी. बदल झाल्यानंतर माध्य-मिक शिक्षणक्रमांतील पहिल्या तीन वर्षांत इंग्रजी हा ऐच्छिक विषय करण्यांत यावा आणि विद्यापीठांतील पहिल्या दोन वर्षांत इंग्रजीचें अध्ययन कायम रहावें.

आजची अनैसर्गिक परिस्थिति !

प्रा. अ. रा. कामत

१९५४ च्या जानेवारी महिन्यांत पुणें विद्यापीठां-तील अध्यापकांची परिषद् भरली होती, त्यावेळीं विद्यापीठांतील माध्यमावर बरीच उद्बोधक चर्चा झाली. त्यानंतर कांहीं दिवसांनीं यासंबंधींचें सरकारी धोरण जाहीर झालें. मुंबईचे शिक्षणमंत्री व शिक्षणा-धिकारी यांनीं दिलेल्या मुलाखती व केलेलीं भाषणें, तसेंच कायदेमंडळांतील भाषणें व वादविवाद, यांवरून सरकारी धोरणाचें स्वरूप बरेंच स्पष्ट झालें असून त्यांतील दोषहि उघड झाले आहेत. पुणें विद्यापीठा-च्या कार्यकारिणीनें यासंबंधींची आपली भूमिका मंत्रि-महाशयांसमोर मांडण्यासाठीं एक शिष्टमंडळ पाठविलें होतें; त्यावेळच्या चर्चेचा सारांश वृत्तपत्रांत प्रसिद्ध झाला आहे. विद्यापीठाचें शैक्षणिक मंडळ (ॲकेडेमिक कौन्सिल) व कार्यकारी मंडळ यांनीं माध्यमासंबंधीं कांहीं निर्णय घेतले आहेत व विद्यापीठाच्या महासभे-(कोर्ट)च्या पुढील बैठकींत हा प्रश्न प्रामुख्यानें झळकेल असें दिसतें. तेव्हां त्या निमित्तानें या विषयासंबंधीं कांहीं विचार पुढें मांडले आहेत.

आतांपर्यंत मुंबई राज्याच्या सरकारी धोरणासंबंधीं जे खुलासे व प्रतिखुलासे झाले त्यावरून सारांशरूपानें पुढील निष्कर्ष निघतात : १९४८ सालापासून दुय्यम शाळांत इंग्रजीचें शिक्षण फक्त चारपांच वर्षेंच देण्यांत

आजची अनैसर्गिक परिस्थिति !

येतें. हे विद्यार्थी १९५५ सालच्या जून महिन्यांत विद्यापीठांत येतील. त्यांना इंग्रजी माध्यम पेलणार नाहीं. म्हणून सरकारचें म्हणणें असें कीं आतां विद्यापीठानें प्रादेशिक भाषा (मराठी, कानडी किंवा गुजराती) आणि । अथवा हिंदी असें माध्यम सुरू सुरू करावें. व्यावसायिक शिक्षणाचीं व इतरहि जीं सरकारी कॉलेजें आहेत तेथें मात्र **हिंदीच** माध्यम असावें. उदाहरणार्थ, पुण्यांतील शेतकी, एंजिनियरिंग व वैद्यकीय कॉलेजें तसेंच कोल्हापूरचें राजाराम कॉलेज, या कॉलेजांत शिक्षणाचें माध्यम हिंदीच राहाणार आहे. मुंबई राज्यांतील अन्यभाषिक अल्पसंख्याकांच्या शिक्षणाची नैतिक जबाबदारी सरकारवर असल्यामुळें व इतर अनेक दृष्टीनीं, या कॉलेजांतून हिंदी माध्यम असणेंच श्रेयस्कर आहे असें सरकारचें म्हणणें. प्रादेशिक विद्यापीठांनीं सरकारची भूमिका अमान्य केल्यास उपयुक्त सरकारी कॉलेजें या विद्यापीठांच्या कक्षेंतून काढून घेऊन सरकार अन्य विद्यापीठांशीं संलग्न करील असा धमकीवजा इशारा देण्यासहि सरकारनें मागेंपुढें पाहिलेलें दिसत नाहीं !

हें सरकारी धोरण प्रत्यक्ष व्यवहारांत उतरूं शकलें तर त्याचा मुंबई राज्यांतील, महाराष्ट्र, गुजरात व कर्णाटक या तिन्ही प्रदेशांतील, शिक्षणकार्यावर अतिशय अनिष्ट परिणाम होईल हें उघड आहे. माध्यम म्हणून इंग्रजी भाषेचा होत असलेला वापर बंद झाला याबद्दल शिक्षणप्रेमी महाराष्ट्रीयांना दुःख होण्याचें बिलकूल कारण नाहीं. उलट, या घटनेचें महाराष्ट्रांत आनंदानें स्वागतच होईल. पण तिचें स्थान प्रादेशिक मातृभाषेनेंच घेतलें पाहिजे हें केवळ शिक्षणशास्त्राच्या दृष्टीनेंच नव्हे तर सर्वांगीण प्रादेशिक विकासाच्या दृष्टीनेंहि आवश्यक आहे. राज्यकारभाराची भाषा व सर्व शास्त्रांची व सकल कलांची भाषा, हें स्थान प्रादेशिक भाषेला प्राप्त झालें नाहीं तर त्या प्रदेशांतील जनतेचा सांस्कृतिक व भौतिक विकास होणें अतिशय दूरापास्त होतें, हा आजवरचा जगांतील सर्व ठिकाणचा अनुभव आहे. हें तत्त्व इतकें सर्वमान्य आहे कीं त्याचा ऊहापोह करण्याची वास्तविक गरजच भासूं नये. आजची उच्च शिक्षितांची सर्व पिढी इंग्रजी या अगदीं परकीय भाषेंतून शिकल्यामुळेंच कीं काय, आपल्या देशांत मात्र अशा तत्त्वासहि विरोध होतांना दिसतो व लोकानुवर्ती शासनसंस्थाहि तिला हरताळ फांसण्यास उद्युक्त होतांना दिसते. एंजिनियरिंग, शेतकी, वैद्यकीय या कॉलेजांत शिक्षणाचें माध्यम हिंदी झालें कीं फर्स्ट इयर सायन्स व इंटर सायन्स या वर्गांतहि हिंदी माध्यमाला प्राधान्य साहजिकच येईल आणि परिणामीं शास्त्रांची भाषा अखेर हिंदीच होणार हें स्पष्ट आहे. राज्यकारभाराची व कायद्याची भाषा हिंदी ठरली कीं सर्व वाङ्मयविभागीय वर्गांची व समाजशास्त्रांची भाषाहि तीच बनणार. मग मराठीला पूर्वीप्रमाणेंच तिच्या स्वतःच्या घरांत अंग चोरून बसणें भाग पडेल ! मराठी जनतेचा लोकसत्तात्मक विकास व सांस्कृतिक विकास यांचें पाऊल पुढें पडणें अतिशय कठीण होऊन बसेल. " इंग्रज गेले, इंग्रजी चालली, आतां संयुक्त भारतांत सर्व प्रादेशिक भाषा झपाट्यानें विकास पावतील, नाना शास्त्रें, नाना कला, नवनवीन कल्पना मराठींत वावरूं लागतील " या रास्त आकांक्षांना मुंबई सरकारच्या नव्या धोरणामुळें जबरदस्त पायबंद बसणार आहे. महाराष्ट्रांतील शैक्षणिक व सांस्कृतिक प्रगतीला हें धोरण अनर्थावह ठरणार आहे.

मराठीचा पाठपुरावा म्हणजे हिंदीला विरोध असें समीकरण मांडण्याचें कांहींच कारण नाहीं. मराठी प्रदेशांत मराठीचें स्वाभाविक स्थान हिंदीनें घेऊं नये एवढेंच आमचें म्हणणें. हिंदी ही सुद्धां आमच्या भारताचीच एक भाषा आहे. भारतांतील एका मोठ्या लोकसमूहाची ' सबकी बोली ', प्रेमचंदजी, पंतजी इत्यादि थोर साहित्यिकांची भाषा, केंद्रीय सरकारची व आंतरप्रांतीय व्यवहाराची एक प्रमुख भाषा म्हणून हिंदीचें आम्ही स्वागतच करूं. यासाठीं दुय्यम शिक्षणांत व उच्च शिक्षणांत हिंदी भाषेचा अभ्यास अवश्य झाला पाहिजे असें आम्हांस वाटतें. (त्याचबरोबर हिंदी भाषिकांनींहि भारतांतील अन्य एखाद्या भाषेचा अभ्यास अवश्य केला पाहिजे असेंहि आमचें मत आहे.) इतकेंच नव्हे तर मराठी प्रदेशांतील अन्य भाषिक लोकसमूहांच्या सोयीसाठीं विकल्पेंकरून, हिंदींतूनहि उच्चशिक्षण देण्याची मुभा असावी. पण मराठी प्रदेशांत सर्व शिक्षणाचें मुख्य माध्यम मराठीच असलें पाहिजे असा मात्र आमचा आग्रह आहे, आणि हा आग्रह अवास्तव किंवा वावगा आहे असें आम्हांस

बिलकूल वाटत नाहीं.

इंग्रजी माध्यम बदलून तिचें स्थान भारतीय भाषांनीं घेणें ही अखिलभारतीय स्वरूपाची व महत्त्वाची घटना आहे. तिचा विचार व व्यवहार अखिल भारतीय भूमिकेवरून होणें आवश्यक आहे यांत बिलकुल शंका नाहीं. आज केंद्रस्थानीं व सर्व राज्यांत (त्रावणकोर-कोचीनमधील काँग्रेसच्या पाठिंब्यावर आधारलेलें प्रजासमाजवादी मंत्रिमंडळ जमेस धरूनहि) काँग्रेसचीं सरकारें राज्यारूढ आहेत. अशा परिस्थितींत या प्रश्नाचा अखिलभारतीय भूमिकेवरून विचार होऊन निर्णय घेणें व ते व्यवहारांत आणणें कठीण आहे असेंहि नाहीं. दक्षिण भारतांत केंद्र सरकारांतील इंग्रजीचें स्थान हिंदीला देण्यास बराच विरोध आहे हें खरें. पण द्रविड-भाषिकांची भीति दूर करून इंग्रजीचा त्याग या आवश्यक व अपरिहार्य घटनेसाठीं त्यांचीं मतें अनुकूल करून घेणें व तदनुरूप या संक्रमणकालांतील योजना आंखणें हाहि अखिलभारतीय शैक्षणिक धोरणाचा अतिशय महत्त्वाचा भाग आहे. (मंत्र्यांच्या) लेखणीच्या फटकाऱ्यासरशीं होण्याइतकी ही सुलभ गोष्ट नाहीं. जर हा बदल १९५५ सालापासून मुंबई राज्यांत अपरिहार्य होणार हें दिसत होतें तर त्यासंबंधीं मुंबई सरकारनें भारतीय भूमिकेवरून विचार होण्याविषयीं आग्रह आधींपासून धरावयास हवा होता. याबद्दलची जबाबदारी त्यांना अंगाबाहेर टाकतां येणार नाहीं.

विद्यापीठांचें धोरणहि या बाबतींत सर्वस्वीं निरपवाद होतें असें आम्हांस वाटत नाहीं. पुणें विद्यापीठाचीच गोष्ट पहा : विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर पहिल्याच वर्षीं तिच्या महासभे-(कोर्ट)मध्यें यासंबंधींचा ठराव आला; पण तो तांत्रिक आक्षेप घेऊन नियमबाह्य ठरविण्यांत आला! त्यानंतर शैक्षणिक मंडळा-(ॲकेडेमिक कौन्सिल)मध्यें हा ठराव येऊन त्यावर समिति बसली. बराच काळ घेऊन त्या समितीनें कांहीं निर्णय घेतले, पण ते एकंदरींत गुळमुळीत व काळकाढू स्वरूपाचे होते. गेल्या वर्षीं पुणें येथें भारतीय भाषा-विकासपरिषद् भरविण्यांत आली, बरेच मोठे वादविवाद व चर्चा झाल्या, पण त्यामानानें निष्पन्न झालेल्या गोष्टी थोड्याच दिसतात. केंद्रीय सरकारनें अखिल-भारतीय भूमिकेवरून या प्रश्नाचा विचार करून अखिलभारतीय धोरण आंखलें पाहिजे हें विद्यापीठांचें मत मान्य करूनहि असें विचारतां येईल कीं या बाबतींत विद्यापीठाला स्वतःला काय वाटतें, कोणतें धोरण केंद्रीय सरकार व राज्यसरकारें यांनीं ठेवावें व तें व्यवहारांत कोणत्या टप्प्यांनीं आणावें यासंबंधीं एखादी योजना कां आखली नाहीं? व सरकारपाशीं तिचेविषयीं आवश्यक व योग्य तो आग्रह कां धरला नाहीं? विद्यापीठांतील विद्वान् मंडळींनीं केवळ दैनं-दिन कारभारांत रुतून व गुंतून पडण्यापलीकडे, त्यांच्या-वर पुढील प्रगतीची व इष्ट त्या फेरबदलाची दिशा दाखविण्याची जबाबदारी पडते असें आमचें स्पष्ट मत आहे. विवाद्य व अनावश्यक अशा अनेक प्रश्नांत व्यर्थ वेळ, पैसा व श्रम यांचा व्यय करण्यापेक्षां विद्यापीठानें महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विकासाविषयीं-च्या अनिवार्य प्रश्नाबद्दल सखोल व विस्तृत विचार केला असता व त्यासंबंधीं आपल्या कक्षेंतील लोकमत जागृत केलें असतें तर या प्रदेशांतील भावी पिढीनें त्यांना खचित दुवा दिला असता.

"आय्. ए. एस्. इत्यादि अखिलभारतीय स्वरूपाच्या नोकऱ्यांसाठीं परीक्षा घेतल्या जातात, त्यासाठीं एकाच भाषेंतून (हिंदींतून) उच्चशिक्षण दिलें पाहिजे; आम्ही असें न केलें तर आमच्या प्रदेशांतील विद्यार्थी तरुण या बाबतींत मागें पडतील"—असा एक युक्तिवाद हिंदी माध्यमाच्या बाजूनें केला जातो. आमच्या मतें या युक्तिवादांत फारसें तथ्य नाहीं. वादा-साठीं अखिलभारतीय नोकऱ्यांच्या परीक्षा हिंदींतून घेतल्या जातील असें धरलें तरीहि या एक किंवा अर्ध्या टक्क्याहूनहि कमी असलेल्या इच्छुकांसाठीं सर्व मराठीभाषी पदवीधरांना शास्त्रें व कला हिंदींतून शिकण्याची सक्ती करावी हा कोठला न्याय? अशा परीक्षांना बसणारे विद्यार्थी बहुधा बुद्धिमान् असतात आणि त्यांना हिंदी भाषेंत प्रावीण्य मिळविणें कठीण आहे, असें नाहीं. या बाबतींत आमचें तर असें स्वच्छ मत आहे कीं अखिलभारतीय स्वरूपाच्या परीक्षांचीं उत्तरें भारतांतील कोणत्याहि प्रादेशिक भाषेंत लिहितां यावींत. या उमेदवारांना हिंदीचें (व इंग्रजीचेंहि) उत्तम ज्ञान असावें, आणि हिंदीभाषिक उमेदवाराकडून दुसऱ्या एखाद्या भारतीय भाषेचें उत्तम ज्ञान अपेक्षावें. किंवा आजच प्रादेशिक भाषां-तून परीक्षा घेणें शक्य नसल्यास हिंदीभाषिक उमेद-

अनुक्रमणिका

वारांपेक्षां अन्यभाषिक उमेदवारांच्या उत्तरपत्रिका हिंदी भाषेच्या ज्ञानाविषयीं सवलतीनें तपासल्या जाण्याचें धोरण असावें, व त्यांना वयाबद्दलहि एक किंवा दोन वर्षांची सवलत मिळावी. प्रतिपादण्याचा मुद्दा हा कीं या बाबती तपशिलाच्या आहेत व त्यांमधून परस्पर समजुतीनें मार्ग काढणें बिलकुल कठीण नाहीं.

मुंबई सरकारचें हें नवें धोरण कोणत्या तत्त्वप्रणालीवर आधारलेलें आहे याचें नीटसें आकलन होत नाहीं. भारताची एकता भाषिक एकतेच्या साधनानें साधावयाची असा हा प्रयत्न आहे कां ? पण मग भारताच्या बहुभाषी, विविधतेनें नटलेल्या सांस्कृतिक ऐश्वर्याची महती प्रधानमंत्री नेहरू यांसह सर्व पुढारी नेहमीं गातात तें सर्व व्यर्थच म्हटलें पाहिजे. अनेकभाषी, विविधतापूर्ण अशा भारतीय संस्कृतीची परंपरा हें भारताच्या सामर्थ्याचें द्योतक आहे, ही बहुभाषी संस्कृति गैरसोयीची अथवा दौर्बल्याचें द्योतक (जर तसें कोणास वाटत असेल तर) मानणें करंटेपणाचें लक्षण आहे, असें आम्हीं समजतों. कदाचित् मुंबई-राज्यासारख्या बहुभाषी राज्यांतील 'फुटीर प्रवृत्तीं'ना आळा घालून अशीं राज्यें चिरस्थायी करण्याचाहि हा यत्न असेल. पण असे प्रयत्न दोन कारणांस्तव चुकीचे ठरतील : एक कारण असें कीं अशा प्रकारें मराठी, कानडी वा गुजराथी प्रदेशांवर हिंदी लादल्यानें ' फुटीर प्रवृत्ती ' अधिकच बळावतील. शिवाय भाषावार राज्यरचनेसंबंधीं समिति नेमली असतांना अशा प्रकारचें धोरण अवलंबणें हें एक प्रकारें तिच्या कार्यावर अप्रत्यक्षपणें दडपण आणण्यासारखें आहे, आणि म्हणून तें राजकीय व नैतिक दृष्ट्या योग्य ठरत नाहीं. कदाचित् निरनिराळ्या भाषांतून शिक्षण देण्याचा हा खटाटोपच नको, या केवळ राज्यकारभाराच्या सोयींतून निघालेल्या सोयीस्कर तत्त्वावरहि हें धोरण आधारलेलें असेल ! मग मात्र जुन्या नोकरशाही राजवटीची दाट छाया अद्यापहि सध्यांच्या ' लोककल्याणकारी ' राज्यावर पडते असें म्हणणें भाग आहे.

कारणें कोणतींहि असोत, या सर्व धोरणाला अनिष्ट व सत्ताकांक्षी राजकारणाचा वास येतो असें कोणी म्हटलें तर त्यांना दोष देणें कठीण होईल. विशेषतः आमच्यावर अन्यभाषिक अल्पसंख्याकांच्या उच्च शिक्षणाची व्यवस्था करण्याची नैतिक जबाबदारी असल्यामुळें हें धोरण आम्हीं ठरविलें, असें जें कारण सरकारकडून पुढें केलें जातें तें अतिशय विलक्षण वाटतें. अल्पसंख्याकांच्या संभाव्य हितासाठीं आपल्या राज्यांतील बहुसंख्याकांची गैरसोय करणें, त्यांच्या सांस्कृतिक विकासाच्या मार्गात जाणून-बुजून अडसर घालणें, यामुळें या प्रदेशांतील जनतेविषयीं राज्यकर्त्यांची जी प्राथमिक (कायदेशीर व नैतिक) जबाबदारी आहे तीच ते पार पाडीत नाहींत असें कोणी म्हटलें तर तें चुकीचें नाहीं. पुण्यांतील व्यावसायिक कॉलेजें, कोल्हापूरचें राजाराम कॉलेज यांमध्यें हिंदी माध्यम रूढ करणें हें कोणत्याहि नैतिक कसोटीवर उतरणार नाहीं आणि पुणें विद्यापीठानें आपल्या स्वायत्ततेच्या अधिकारांत मराठी माध्यम ठरविल्यास हीं कॉलेजें त्याच्या कक्षेंतून काढून घेऊं ही धमकी अगदीं **अनैतिक** आहे असेंच कोणीहि म्हणेल ! याविषयीं आणखी कांहीं प्रश्न उपस्थित करावेसे वाटतात. शिक्षण-विषयक धोरणांत इतका मूलभूत बदल करतांना तो निर्णय शिक्षणमंत्री केवळ स्वतःच्या जबाबदारीवर घेतात कीं सबंध मंत्रिमंडळ हा निर्णय घेतें ? असा निर्णय घेतांना सबंध मंत्रिमंडळानें त्याचा विचार केला पाहिजे हें उघड आहे. तसें असल्यास मराठी प्रदेशांतील मंत्र्यांचा या प्रश्नाबद्दल कोणता दृष्टिकोन आहे ? कॉंग्रेस-पक्षांतील मराठीभाषिक सभासदांनीं या प्रश्नावर सरकारला कोणता सल्ला दिला ? मराठी प्रदेशांतील जनतेपुढें या प्रतिनिधींनीं याबद्दल खुलासा करणें हें त्यांचें लोकसत्तात्मक कर्तव्य नाहीं काय ?

सरकारचें धोरण योग्य नसल्यामुळें त्याला सर्वत्र विरोध होणें अपरिहार्य आहे. गुजरातविद्यापीठांत " गुजराथी आणि / अथवा हिंदी माध्यम " हा ठराव चर्चिला जात असतां यामधील " गुजराथी आणि / अथवा " हे शब्द कालांतरानें जाऊन ' हिंदी ' एवढाच शब्द कायम राहील अशी भीति अनेक सद्-स्यांनीं व्यक्त केली. ' हरिजन ' चे संपादक व एक निष्ठावंत गांधीभक्त श्री. मगनभाई देसाई यांनींहि या धोरणास विरोध केला व नव्या गुजरात-विद्यापीठाच्या संस्थापनेच्या समयीं जबाबदार अधिकाऱ्यांनीं गुजराती भाषेच्या विकासाविषयीं जीं जाहीर वक्तव्यें केलीं त्यांना डावलून टाकणारें हें नवें धोरण आहे असें बोलून दाखविल्याचें ऐकिवांत आहे. महाराष्ट्रांतहि

या धोरणाबद्दल असंतोष निर्माण होईल यांत शंका नाहीं. हिंदी माध्यम केल्यानें होणारे अनिष्ट दूरगामी परिणाम टाळण्यासाठीं हें धोरण वेळींच बदलून घेण्याचे सर्व प्रयत्न व्हावेत असें आम्हांस वाटतें. मराठी माध्यम होणें हें अखेर अटळ आहे, असा आमचा विश्वास आहे. पूर्वींच्या काळीं पांडित्याचें प्रादेशिक संस्कृतीवरील अनिष्ट वर्चस्व दूर करण्याकरितां मराठी व इतर प्रादेशिक भाषांतील संतसाहित्यिकांनीं अखंड प्रयत्न चालू ठेवले व अखेर प्रादेशिक संस्कृतींचा विकास घडविण्यांत त्यांना यश मिळालें. उद्यां हिंदी माध्यम झालें तरी अशाच प्रकारचें आंदोलन होईल हें निश्चित. म्हणून आमचें म्हणणें असें कीं हा व्यर्थ संघर्ष, त्यापायीं होणारी वेळाची व श्रमाची अपरिमित हानि आणि त्यांतून वाढणारी हिंदी विरुद्ध इतर प्रादेशिक भाषा ही तेढ व दूरावणारे संबंध ही सर्वच संभाव्य हानिकारक परिस्थिति टाळणें हें आपलें सर्वांचें आजचें कर्तव्य आहे. आणि म्हणून महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्ग, विद्यापीठ व कॉलेजें, प्राध्यापक व विद्यार्थी, महाराष्ट्रसाहित्यपरिषद्, संयुक्त महाराष्ट्र-परिषद् वगैरे मराठी भाषिकांच्या संस्था इत्यादींनीं संघटित प्रयत्न करून हें धोरण वेळींच बदलून घ्यावें. या कामीं गुजरात व कर्नाटक येथील मंडळींचेंहि साहाय्य त्यांना लाभेल असा विश्वास वाटतो.

शेवटीं एका मुद्द्याकडे सर्वांचें लक्ष वळवावेसें वाटतें. इंग्रजी माध्यम शक्य तितकें लौकर सोडून देण्यांत यावें याबद्दल मात्र सर्व प्रादेशिक भाषांच्या अभिमान्यांनीं कटाक्ष बाळगला पाहिजे. या मुद्द्यावर भर देण्याचें कारण, आज इंग्रजींतून शिकलेल्या आपल्या सुशिक्षित वर्गाला त्याबद्दल अवश्य तेवढी निकड वाटत नाहीं. त्यामुळें माध्यम बदलण्याच्या बाबतींत 'अशुभस्य कालहरणम्' अशा तऱ्हेची वृत्ति पुष्कळदां दिसून येते. माध्यम बदलण्याच्या संक्रमणकालांत सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रांत अतिशय मोठ्या अडचणींना आपणांस तोंड द्यावें लागेल यांत शंका नाहीं. या प्रश्नाचा या संक्रमण-कालाच्या दृष्टीनें ऊहापोह एकाद्या स्वतंत्र लेखाचा विषय आहे. पण त्या अडचणींचा अवास्तव बाऊ न करतां त्याला तोंड देऊन परकीय माध्यमाची अनैसर्गिक परिस्थिति कमींत कमी काळांत बदलणें हें आजच्या सुशिक्षित वर्गाचें व विशेषतः शिक्षणक्षेत्रांतील मंडळींचें प्रमुख कर्तव्य आहे, असें आम्ही समजतों. समाजाचें व पुढील पिढीचें हें ऋण आपण फेडलेंच पाहिजे या निष्ठेनें त्यांनीं या प्रश्नाकडे पाहावें असें आम्हास नम्रतापूर्वक त्यांना सुचवावेंसें वाटतें.

विधायक, उत्साहपूर्ण कृतीची आवश्यकता

प्रा. प्र. रा. दामले

पुणें विद्यापीठांत शिक्षणाचें माध्यम काय असावें या प्रश्नाचा विचार करून पुणें विद्यापीठाचें धोरण स्पष्ट करण्यासाठीं पुणें विद्यापीठाच्या कोर्टाची विशेष सभा लवकरच भरणार आहे. त्यावेळीं माझ्या दृष्टीनें कोठच्या महत्त्वाच्या गोष्टी लक्षांत ठेवण्याची आवश्यकता आहे हें मी थोडक्यांत येथें मांडणार आहे. अलीकडे दोन महिन्यांत केंद्र सरकार, मुंबईराज्य सरकार व पुणें विद्यापीठ यांच्या तर्फे अनेक निवेदनें व वक्तव्यें झालीं तीं लक्षांत घेऊन परंतु त्यांतील अनेक वादग्रस्त मुद्दे चर्चेकरितां न घेतां, एकंदर आजच्या परिस्थितींत विद्यापीठानें काय करावें हें दर्शविण्याचा माझा हेतु आहे.

विद्यापीठीय अभ्यासक्रमांत सर्व शाखांतून मातृभाषा हें प्रमुख माध्यम करणें, हिंदी भाषेचें पुरेसें ज्ञान विद्यापीठांतील प्रत्येक विद्यार्थ्यास करून देणें, मराठी मातृभाषा नसेल अशा विद्यार्थ्यांस हिंदींतून सर्व व्यवहार करण्यास मोकळीक ठेवणें व इंग्रजी भाषेचें ज्ञान, तिच्या यापुढें होणाऱ्या नव्या उपयोगाकरितां म्हणजे जगांतील वाढत्या ज्ञानाशीं आपला सतत संबंध ठेवूं शकणारी भाषा म्हणून योग्य असें राहील अशी योजना आंखणें असें त्रिविध कार्य आपणांपुढें आहे.

आज व आणखी कांहीं वर्षे इंग्रजी उत्तम जाणणारे व इंग्रजींतून सर्व ज्ञान संपादन केलेले प्राध्यापक अध्या-

पनाकरितां मिळतील. तें आहेत तोंवर भाषांतरें व रूपांतरें यांच्या योगें जितकी ज्ञानसंपत्ति मातृभाषेंत आणतां येईल तितकी आणण्याचे प्रयत्न होणें फार महत्त्वाचें आहे. दहा वर्षांनंतर ते करणें कठिण व कष्टसाध्यच होईल. याशिवाय यापुढील काळांत इंग्रजीचें अध्यापन, तें वाङ्मय म्हणून व माध्यम म्हणून नव्हे तर त्यांतील ग्रंथ समजतील इतकी ती भाषा कमाविण्याच्या दृष्टीनें, प्रथमपासूनच वेगळया पद्धतीनें पण प्रामाणिकपणें, उत्साहानें व त्या कामास पात्र अशा शिक्षकांकडून होत राहिलें पाहिजे. इंग्रजी भाषा जाणार व जाणें इष्ट व योग्य आहे हें समजून व तें खुषीनें मान्य करून नव्या पद्धतीच्या इंग्रजीच्या शिक्षणाची सोय करणें व आज ती भाषा चांगली जाणणाऱ्यांकडून मराठींत उत्तम इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें व रूपांतरें करवून घेणें या दोन गोष्टी इंग्रजीबाबत करणें जसें अवश्य आहे तसेंच हिंदीच्या ऐवजीं इंग्रजीच पाहिजे किंवा इंग्रजी माध्यम म्हणूनहि रहावें या भूमिका यापुढें साफ सोडून दिल्या पाहिजेत.

हिंदीबद्दल आपली भूमिका अशी असावी : विद्यापीठांतील प्रत्येक विद्यार्थ्यास हिंदीचा उत्तम सराव असावा. ज्यांची मातृभाषा मराठी नाहीं अशांना हिंदीमधून प्रश्नपत्रिका दिल्या जाव्यात व हिंदींतून उत्तरपत्रिका लिहिण्याची त्यास मोकळीक असावी. हिंदी पाठ्यपुस्तकें तयार करणें वगैरेंवर आपण पैसा व शक्ति खर्च करण्याची आवश्यकता नाहीं. भारतांतील इतर अनेक विद्यापीठांतून हिंदीचा माध्यम म्हणून उपयोग केला जाणार असल्यानें तद्विषयक सर्व साधनें येथील विद्यार्थ्यांस अनायासें उपलब्ध होतील.

याबाबत एक महत्त्वाची गोष्ट अशी आहे कीं शिक्षणाचें माध्यम म्हणून अमुक असावें असा आजहि कोठच्याहि विद्यापीठाचा निर्बंध नाहीं. परीक्षेकरितां (प्रश्न व उत्तरें लिहिण्यासाठीं) कोठची भाषा वापरावी इतकेंच ठरविलेलें असतें. म्हणून आज चालू असलेल्या इंग्रजीशिवाय मराठी व हिंदी या भाषांतून प्रश्नपत्रिका देणें व विद्यार्थ्यांस उत्तरपत्रिका लिहूं देणें इतकेंच विद्यापीठांनीं सध्यां करावयाचें आहे. प्रत्यक्ष शिकवावें कोठच्या भाषेंतून तें परिस्थितीप्रमाणें निरनिराळया संस्था ठरवितील. सामान्यतः बहुसंख्य विद्यार्थ्यांची जी मातृभाषा असेल त्यांतूनच तें होईल. असें केल्यानें इंग्रजी जावयाचें तेंहि हळूं हळूं जाईल, अल्पसंख्याकांची अन्याय्य गैरसोय होणार नाहीं व आपल्या विद्यापीठाच्या पदव्या व अभ्यासक्रम यांची इतर विद्यापीठांशीं तुलना करतां येऊन आपल्या पदव्यांचा दर्जा खालीं जात नाहीं अशी खात्री राहील. आपल्या विद्यार्थ्यांसहि इतरत्र अडचण पडणार नाहीं. मुंबईविद्यापीठ इंग्रजी व हिंदी या दोनच भाषा माध्यम म्हणून ठरविण्याचा बराच संभव आहे. गुजरातविद्यापीठानें गुजराती व हिंदी माध्यम म्हणून ठरविल्याच आहेत. वास्तव पुणे-विद्यापीठांत मराठीस महत्त्व देऊन त्याबरोबरच हिंदी व इंग्रजी यांची योग्य तरतूद आपण केली पाहिजे.

इंग्रजी व हिंदी यांबद्दल वरील रचनात्मक दृष्टिकोण ठेवल्यानंतर त्यापुढील खरोखर प्रत्यक्ष धडाडीनें करावयाची गोष्ट म्हणजे मराठी माध्यमाचा उत्साहानें व आत्मविश्वासानें पुरस्कार करणें ही होय. वाङ्मय, विज्ञान व व्यापार या शाखांशिवाय, स्थापत्य, वैद्यक आदि इतरहि शाखांतून तें माध्यम तावडतोब वापरलें जावें. त्यांत खरोखर कांहींच अडचण नाहीं. मनाची तयारी मात्र पाहिजे. इंग्रजी पुस्तकें व परिभाषा यांना कोठेंच मज्जाव करण्याचें कारण नाहीं. परंतु प्रतिपादनाकरितां मराठीचा उपयोग केल्यानेंच विषयांचें समाधानकारक प्रतिपादन होईल, विद्यार्थ्यांना विषय समजेल आणि खरी व टिकाऊ प्रगति होईल. अद्यापहि आपल्या इकडील अनेक प्राध्यापकांच्या व श्रेष्ठ शिक्षणतज्ज्ञांच्या मनांत या मूळ भूमिकेबद्दल अविश्वास आहे व म्हणून गैरलागू मुद्द्यांची चर्चा करून याबाबत चालढकल करण्याची प्रवृत्ति दिसून येत आहे, ती तावडतोब थांबणें इष्ट आहे. याबाबत पुणें विद्यापीठानें उत्साहानें पाउलें टाकलीं पाहिजेत व सुशिक्षित जनतेनें सक्रिय नेतृत्व केलें पाहिजे. धर्माप्रमाणेंच भाषेची प्रगति देखील इतरभाषिक व इतरधर्मीय लोक काय करतात किंवा काय करीत नाहींत यावर अवलंबून नसून आपण किती आत्मविश्वासानें, प्रेमानें, कष्टपूर्वक व धीरानें तिची सेवा करतों यावरच प्रायः अवलंबून असते हें विसरतां कामा नये. आपला उत्साह व मराठीविषयक भक्ति, राज्य व केन्द्र सरकार व इतर भाषिक यांचें धोरण पाहून पण त्यास अवास्तव महत्त्व न देतां, आत्मविश्वासानें रचनात्मक पद्धतीनें आपण

दाखवीत रहावी. म्हणजे निष्कारण मतभेद न माजतां कार्याची प्रगति होईल व सर्वांचें सहकार्य लाभेल.

कोणी त्याचा प्रत्यक्ष निर्देश करतात, कोणी करीत नाहींत, पण अनेकांच्या मनांत शिक्षणाच्या माध्यमाच्या या प्रश्नाचा संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेशीं निकट संबंध आहे व माध्यमविषयक व विशेषतः हिंदीविषयक विचार करतांना संयुक्तमहाराष्ट्राच्या निर्मितीस पोषक अशी आपली भूमिका असलीच पाहिजे हें कळत न कळत दडपण पुष्कळ महाराष्ट्रीयांच्या मनावर असलेलें दिसतें. माझ्या मतें संयुक्त महाराष्ट्राची निर्मिति व विद्यापीठांतील माध्यमाचा प्रश्न यांचा परस्परसंबंध जोडणें योग्य नव्हे. त्याचें पहिलें कारण असें कीं शिक्षणक्षेत्रांत राजकारण आणणें हें केव्हांहि–विशेषतः स्वराज्यांत गैर होय. दुसरें कारण असें कीं माध्यम-विषयक अमुक एक निर्णय घेतल्यानें राजकारणांत अमुक एक होईल, असें समजणें धोक्याचें आहे. उलट, उद्यांची सुशिक्षित जनता येईल त्या परिस्थितींत शैक्षणिक तत्त्वांनुसार आपल्यासमोरील प्रश्नांचा योग्य निर्णय लावण्यास अधिक समर्थ होईल. आपण म्हणतों तसा संयुक्त महाराष्ट्र झाला तरी त्याचे व भारताचे संबंध निकटच राहतील व रहावेत असेंहि आपण म्हणतों. यास्तव आमच्या विद्यापीठांतून बाहेर पडलेल्या प्रत्येक पदवीधरास सामान्य हिंदीची उत्तम ओळख व सराव आवश्यक आहे. तसेंच भारताचा एक विभाग जो महाराष्ट्र त्या भागांत राहणाऱ्या मराठी मातृभाषा नसणाऱ्या नागरिकांस हिंदीमधून शिक्षण घेण्याची संधि देऊन त्यांची परीक्षा त्यांच्या भाषेंतून घेणें हीच आपली भूमिका पाहिजे. या मराठीभाषी विभागांतील विद्यापीठांत मराठीबरोबर हिंदी माध्यम सुरू करून संयुक्त महाराष्ट्राचा एक मूलहेतूच नष्ट केला जातो असें म्हणणारे कांहीं आहेत. त्यांनीं याबाबत अधिक विचार करावयाला पाहिजे. तो हा कीं, ज्याअर्थीं संयुक्त महाराष्ट्र भारतांतर्गत राज्य आहे त्याअर्थीं भारताच्या राष्ट्रभाषेची येथील नागरिकाकडून योग्य जोपासना होणें अवश्यंभाव्य आहे. येथील महाराष्ट्रीयेतर नागरिकांस हिंदींतून अध्ययनाची व इतर व्यवहाराची मोकळीक असली पाहिजे. नाहींतर आपल्या मागणीला या विभागांत रहाणाऱ्या अल्पसंख्याकांकडून विरोध होईल व संयुक्त-महाराष्ट्र स्थापनेच्या मार्गातील अडचणी वाढतील. महाराष्ट्र व मराठी यांचा योग्य अभिमान असणें व त्यांच्या प्रगतीकरितां प्रयत्न करणें हें प्रत्येक महाराष्ट्रीयाचें कर्तव्य व भूषण होय. परंतु आपणांस प्रिय असलेल्या वस्तूची प्रगति म्हणजे काय हें समजून घेऊन व परिस्थिति ओळखूनच आपलीं पावलें पडलीं पाहिजेत. तरच तें श्रेयस्कर ठरतें. आधुनिक महाराष्ट्राचे प्रणेते फुले, रानडे, आगरकर, टिळक, गोखले यांचा महाराष्ट्राभिमान त्यांच्या देशाभिमानाशीं किती एकरूप झाला होता व हिंदुस्थानदेशाची सेवा करण्यांतच व करण्यानेंच ते आधुनिक महाराष्ट्राचे प्रणेते कसे झाले हें लक्षांत ठेवणें अवश्य आहे.

काँग्रेस कार्यकारिणीचें शिक्षणाच्या माध्यमाविषयीचें धोरण

काँग्रेस कार्यकारिणीनें शिक्षणाच्या माध्यमाबाबत जो ठराव ५।४।५४ रोजीं दिल्ली येथें मंजूर केला, त्याचा अनुवाद पुढें दिला आहे.

"शाळा व कॉलेजें यांमध्यें शिक्षणाचें माध्यम काय असावें याविषयीं काँग्रेसनें आपलें धोरण वारंवार स्पष्ट केलें आहे. १९४९ च्या ५ ऑगस्टला आणि पुन्हां १९५३ च्या १७ मेला काँग्रेस वर्किंग कमिटीनें या विषयावर ठराव केले आहेत. भारतीय राज्यघटनेनें हिंदी ही अखिल-भारतीय राष्ट्रभाषा ठरविली आहे. त्याचप्रमाणें राष्ट्रीय महत्त्वाच्या इतर प्रादेशिक भाषांचाहि घटनेनें निर्देश केला आहे.

"सरकारी व इतर कामकाजासाठीं हिंदी ही राष्ट्रभाषा म्हणून आणि प्रादेशिक भाषा म्हणूनहि तिला शिक्षण-पद्धतीच्या द्वारें व अन्य प्रकारें उत्तेजन देणें व तिचा विकास करणें हें सरकारचें उद्दिष्ट असावें. त्याच वेळीं घटनेंत नमूद केलेल्या प्रादेशिक भाषांनाहि संपूर्ण उत्तेजन देण्यांत यावें. या श्रेष्ठ भारतीय भाषांच्या द्वारें भारतीय साहित्य विकसित करणें हा हेतु सदैव असावा.

म्हणून या भाषांचे परस्परांशीं निकट संबंध राहिले पाहिजेत.

"शाळा-कॉलेजांतील विविध श्रेणींतून हिंदी भाषा हा सक्तीचा विषय असावा. त्याबरोबरच हिंदीभाषी प्रदेशांतील लोकांनीं इतर एक तरी भारतीय भाषा शिकणें अवश्य आहे.

" भारतांत इंग्रजीनें हिंदीला जागा करून द्यावी; परंतु त्याबरोबर हेंहि ध्यानांत असावें कीं परकीय भाषांचें ज्ञान हें पुढेंहि आवश्यक राहणार आहे. परकीय साहित्य, विचारप्रवाह व विविध कार्यक्षेत्रांतील प्रगति यांचा परिचय राहाण्यासाठीं परकीय भाषांचें ज्ञान अवश्य आहे. यामुळें भारतीय भाषा व त्यांतील वाङ्मय यांच्या विकासालाहि मदत होणार आहे. महत्त्वाच्या अशा सर्व परकीय आशियाई व युरोपियन भाषांचा थोडाफार अभ्यास इष्ट असला तरी त्यांतहि इंग्रजीच्या अभ्यासाला उत्तेजन देणें विशेष जरूर आहे. कारण जगांतील प्रमुख भाषांपैकीं इंग्रजी एक असून, तिच्याशीं आपला पूर्वीपासून संबंधहि आलेला आहे.

" प्राथमिक शाळेंत माध्यम म्हणून मुलांच्या पालकांच्या इच्छेनुसार मुलाची मातृभाषाच असली पाहिजे. सामान्यतः ही भाषा त्या राज्यांतील वा विभागांतील प्रादेशिक भाषा असणार. आदिवासींच्या विभागां-(tribal areas)मध्यें त्या लोकांच्या मातृभाषेंतून आरंभींचें शिक्षण दिलें जावें.

"प्रादेशिक भाषेशिवाय अन्य ज्यांची मातृभाषा आहे अशा मोठ्या बहुभाषी शहरांत सार्वजनिक प्राथमिक शाळांतून मातृभाषांमधून शिक्षण द्यावें. अर्थात् असें शिक्षण मागणाऱ्या लोकांची संख्या मात्र सयुक्तिक दृष्ट्या पटणारी (reasonable) असावी. दोन राज्यांच्या सरहद्दीवरील मुलखासारख्या द्विभाषिक, मुलखांत, त्या मुलखांतील प्रत्येक भाषेंतून प्राथमिक शिक्षण देण्याची खास तरतूद करण्यांत यावी.

"माध्यमिक शाळांतून सामान्यतः प्रादेशिक भाषेंतून शिक्षण द्यावें. पण पुरेशी विद्यार्थिसंख्या असल्यास इतर भाषाहि वापरल्या जाव्या. माध्यमिक शाळेंत राष्ट्रभाषा हिंदी दुसरी भाषा म्हणून सक्तीचा विषय असावा.

" विद्यापीठांतून प्रादेशिक भाषा हें शिक्षणाचें माध्यम असावें. हिंदीचाहि उपयोग करतां येईल. विद्यापीठांमध्यें नित्याचें शिक्षण प्रादेशिक भाषेंतून देण्यांत येईल. तरीपण हिंदींतून व कधींकधीं इंग्रजींतूनहि व्याख्यानें देण्याची प्राध्यापकांना मुभा असावी. यायोगें आंतरभारतीय सांस्कृतिक दळणवळण वाढण्यास साहाय्य होईल.

" शास्त्रीय व तंत्रविज्ञानविषयक (technical) विषय शिकवितांना इंग्रजीमधून प्रादेशिक भाषा अथवा हिंदी यांमध्यें व्हावयाचें संक्रमण, शिक्षणाचा दर्जा खाली येणार नाहीं अशा रीतीनें, क्रमानें घडवून आणावें. या संक्रमणाच्या क्रमांत एक मधला टप्पा म्हणून कांहीं विषयांपुरता हिंदी किंवा प्रादेशिक भाषा आणि इंग्रजी यांचा माध्यम म्हणून उपयोग करणें इष्ट होइल.

" एखाद्या परकीय भाषेचें पुरेसें ज्ञान असणें आवश्यक असल्यानें, त्याची सुरवात माध्यमिक शाळेपासून व्हावी व ती पुढें विद्यापीठांत चालू रहावी.

" इंग्रजी भाषा जाऊन शेवटीं हिंदीनें इंग्रजीचें स्थान घ्यावें यासाठीं शिक्षणखात्यानें जो पंधरा वर्षांचा कार्यक्रम, पांचपांच वर्षांच्या तीन टप्प्यांनीं आंखला आहे तो वर्किंग कमिटीला मंजूर आहे."

अखिलभारतीय नोकऱ्यासांठी होणाऱ्या परीक्षाची भाषा

" भारतीय राज्यघटनेनुसार हिंदी ही अखिलभारतीय राष्ट्रभाषा म्हणून मंजूर झाली आहे आणि घटनेनुसार हेंहि ठरलें आहे कीं १५ वर्षांनंतर अखिलभारतीय सरकारी कामकाजाची भाषा हिंदी ही व्हावी. या गोष्टी लक्षांत घेतां, अखिलभारतीय नोकरीसाठीं होणाऱ्या परीक्षांची भाषा हिंदी करण्याच्या दिशेनें वाढत्या प्रमाणांत पाउलें टाकणें इष्ट होईल. पाउलें अशा क्रमानें टाकलीं पाहिजेत कीं ज्या योगानें हिंदीभाषी प्रदेशांशिवाय इतर प्रदेशांतून येणाऱ्या उमेदवारांवर अवास्तव बोजा पडणार नाहीं. हिंदी आणि प्रादेशिक भाषा यांच्या विकासाकरितां प्रत्येक तऱ्हेचें उत्तेजन दिलें पाहिजे हें तर खरेंच; पण त्याबरोबर हेंहि लक्षांत ठेविलें पाहिजे कीं परकीय भाषांचें–विशेषतः इंग्रजीचें ज्ञान हल्लींसारखेंच पुढेंहि वरिष्ठ नौकरींतील माणसांना असणें आवश्यक राहील.

" अखिलभारतीय स्वरूपाच्या नोकऱ्यांसाठीं ज्या परीक्षा होतील त्या वाढत्या प्रमाणानें हिंदी, इंग्रजी व प्रमुख प्रादेशिक भाषा यांमधून व्हाव्यात, आणि यांपैकीं

कोणत्याहि भाषेंत परीक्षा देण्याची उमेदवाराला मुभा असावी. हिंदी अथवा प्रादेशिक भाषा ही आपल्या परीक्षेसाठीं उमेदवारानें निवडलेली असेल तर त्याला आणखी इंग्रजी भाषाविषयांतहि उत्तीर्ण व्हावें लागेल.

"आरंभीं आरंभीं या अखिलभारतीय परीक्षांमध्यें यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांपैकीं ज्यांनीं या परीक्षांकरितां हिंदी घेतली नसेल त्यांना हिंदीची चांचणी द्यावी लागेल. यापुढचा टप्पा म्हणजे वर सांगितलेल्या पद्धतीनें या परीक्षांतून हिंदी, इंग्रजी किंवा प्रादेशिक भाषा यांपैकीं कोणतीहि एक वापरूं देणें, पण त्याबरोबरच हिंदी ज्यांची मातृभाषा नाहीं अशा विद्यार्थ्यांना हिंदी विषयाची परीक्षा सक्तीची करणें आणि हिंदीभाषी उमेदवारांना दुसऱ्या कोणत्याहि एका भारतीय भाषा-विषयाची परीक्षा सक्तीची करणें. या दोन्हींहि बाबतींत हिंदी किंवा इतर प्रादेशिक भाषेंतून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना इंग्रजी हा एक सक्तीचा विषय राहील.

उंच उभें झाड --!

एक उंच उभें झाड
समोरच्या अंगणांत
चंद्रमौळी समाधान
मागे गार साउलींत

कोंपऱ्यांत कोरांटीच्या
जवळच सदाफुली
लफ्फेदार वांकलेली
केळ अवघडलेली

मान मोडून पाहात
गेली बाजूनेंच वाट
तिच्यावर माया भारी
लिंब-बाभळीची दाट

धूळ-पाचोळयाची निघे
वरातही वाऱ्यावर
चंद्र डोकावण्या जाई
जवळच्या तळयावर
निळयाशार नभावर
स्निग्ध सालस बाळस
हिरव्या झाडींतून दिसे
लालचुटुक पळस
दूरवर झांवळयांत
गोड दुधाळ नारळ
मऊ मऊ टेकडीचें
भुरभुरतें जावळ !

— राजा मंगळवेढेकर

'शार्दूल-विक्रीडित'!

नेसोनी जरिचें नवें वसन मी, लेवोनि लेणीं तशीं
घेवोनी करिं दीप मी करवली होतें उभी पाठिशीं
दादाच्या शुभ त्या विवाह-समयीं आनंदलें मी अती
ऐकोनी नव मङ्गलाष्टक मुदें शार्दूलविक्रीडितीं
जेव्हां या हृदयांत आणि शरिरीं तारुण्य संचारलें
तेव्हां 'ते' अनुरूप यौवन-गुणें भाग्यें मला लाधले
जे जे भाव सखोल गूढ हृदयीं कालांत या क्रीडती
ते आह्मीं उभयीं सुनीतिं विणिले शार्दूलविक्रीडितीं
माझ्या मङ्गल मुग्ध कोमल अशा मीं भावना गुंफुनी
केली माळ समर्पिण्या प्रियकरा होतें उभी घेउनी
प्रेमें जाहलिं जीं अभिन्नहृदयें अन्तःपटें भेदिती
लांबें लांबट मङ्गलाष्टक किती शार्दूलविक्रीडितीं !
जेव्हां कुंकुमहीनभाल परिसें शार्दूलविक्रीडित ।
तेव्हां या हृदयांत हाय ! करि तें शार्दूल-विक्रीडित !

— विश्वनाथ के. महाबळेश्वरकर

वरदान !

मज मृत्यूचें वरदान हवें
मज विश्वांतुन नित थरथरणाऱ्या
   परमाणूंचे प्राण हवे

लेउन परिमळ फुलाफुलांतिल
   गात फिरावें रानीं
रज:कणांना भिडवावें कधि
   रत्नजडित अस्मानीं
नाचविण्या क्षण पिवळीं पानें
   वायूचें चिरयान हवें !

उन्मन जळ होउन खडकांवर
   धडका देत फुटावें
कधीं ढगांसह अखण्ड हिण्डत
   संध्यारंग लुटावे
कधिं तहानले ओंठ भिजविण्या
   ओलाव्याचें भान हवें !

फुलवाया निद्रिस्त कळींतिल
   रंगांना गंधांना
जागविण्या अन्धारीं मूर्च्छित
   मूढांनां अंधांना
हंसवायास दिशा, सूर्याचें
   अमर्याद मज त्राण हवें !

नभ होउन भिनवावी नयनीं
   विशालतेची छाया
ताऱ्यांचीं स्वप्नें उजळावी
   कृष्ण निशा सजवाया
उरिं ज्योतिर्मंडळ धरण्याचें
   मज सौभाग्य महान् हवें !

मज धूळिकणांतील भूतभाविचें
   जागृत अनुसन्धान हवें
मज उषेंतुनी नित पाझरणारें
   पावन अमृतस्नान हवें
नित्य नवेपण उमलविणारें
   पृथ्वीचें मज ध्यान हवें
मज मृत्यूचें वरदान हवें !

— मंगेश पदकी

मनांतलें तें — !

मनांतलें तें मनांत विरतें
   किती जायचें अजुन पुढें मज
अंतरांतली महदाकांक्षा
   हलुच वाजवुन जाते अलगुज.

दिसूं लागतीं नवीन क्षितिजें
   झेप घेत मन इंद्रधनूवर
पिसापरी मन नभीं तरळतें
   पाउल माझें ठरे न भूवर.

–परंतु क्षणभर, क्षणभर सारें
   मुळीं न लागे कांहीं हातीं
ठरलेल्या या चाकोरींतुन
   नित्य पावलें जातीं . . . वळतीं

मनांतली ती मनांत विरते
   क्षितिजाच्या पलीकडली हांव
परिस्थितीच्या वाऱ्यावरती
   दिशेवांचुनी माझी धांव !

खडतर अपुला मार्ग चालणें
   दिवसां रात्रीं सदा राबणें
हेंच आमचें झालें जीवन
   कसें स्फुरावें नवखें गाणें ?

मेजावरती कीट्स् नि शेले
   तसेच पडले धूळ खात ते
भावुकतेचीं त्यांचीं गाणीं
   मी न वाचलीं . . . शल्य खुपसतें !

–शल्य खुपसतें, अंतर झुरतें
   नको नकोसें जातें होउन
क्षणैक तें पण . . . फिरति पाउलें
   अन् ठरलेल्या चाकोरींतुन !

— सूर्यकान्त खाण्डेकर

अनुक्रमणिका

महात्मा

एकला प्रवासी
चालला वेगानं
हातांत घेऊन
कसलें निशाण ?

दिसतो दुबळा
हाडांचा सापळा
शरीर असून —
शरीरावेगळा !

दधीचि ऋषीच्या
आत्म्याचं पाखरूं
तिन्हीहि जगांचा
कानोसा घेऊन

तपस्वी देहाच्या
घरट्यासाठीं
वाळल्या हाडांच्या
सामर्थ्यासाठीं

येऊन राहिलं
महात्म्याजवळ
आकाशतेजाला
हंसत हंसत

चंद्राचें शीतल
आसन सोडून
आकाशपुष्पांचे
पराग तोडून-

ईश्वराघरचे
अमृताचे कुंभ
येऊन सांठले
दुबळ्या डोळ्यांत

रक्ताळलेल्या
मानवतेचं
दाही दिशांतून
उठे आक्रंदन !

शांतीच्या, प्रीतीच्या
मानवी आशेच्या
उडति ठिकऱ्या
बेहोष होऊन !

दुबळ्या नेत्रांच्या
दीपकलिकेनं
भविष्यकाळाला
दावीत प्रकाश

हंसऱ्या ओठाच्या
चैतन्यफुलानं
आशेचं, प्रीतीचं
अमृत शिंपित . . .

एकला प्रवासी
चालला वेगानं
हातांत घेऊन
कसलें निशाण ?

— सुरेश डोळके

आज पुन्हां — !

आज पुन्हां पहुडलें
  निळ्या नभाच्या छायेंत
प्यालें स्वर्णचषकींचें
  चंद्रकलेचें अमृत
आज वत्सल वायूनें
  पुन्हां गोंजारिला माथा
पटे बुजली ओळख
  मज परदेशी पान्था
आज पुन्हां पापण्यांत
  उमटलें स्निग्ध दंव
त्यांत विरली क्षणांत
  पोक्त वयाची जाणीव
आज पुलकित चित्तीं
  उधाणल्या सोळा कळा
खिन्न अंधार सगळा
  चिंब प्रकाशांत न्हाला
ओठीं नादल्या विस्मृत
  'गंगा–लहरी 'च्या पंक्ती
उठे कल्लोळ हर्षाचा
  आली ओथंबून शान्ति !

— सरिता पदकी

श्री. व. भ. कर्णिक

पाक -- अमेरिका लष्करी करार

पाकिस्तान व अमेरिका यांच्यामध्यें होऊं घातलेला लष्करी मदतीचा करार अखेर २५ फेब्रुवारी १९५४ ला घडून आला. त्या दिवशीं अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जनरल ऐसेनहॉअर यांनीं पाकिस्ताननें केलेली लष्करी मदतीची विनंति स्वीकारल्याचें जाहीर केलें.

पाकिस्तानला लष्करी मदत जी मिळणार आहे ती अमेरिकेच्या परस्पर-संरक्षण-मदत-कायद्या-(Mutual Defence Assistance Act)-नुसार मिळणार आहे. हा कायदा १९४९ सालीं मंजूर झाला. या कायद्याप्रमाणें आतांपर्यंत २७ राष्ट्रांना मदत मिळत होती. पाकिस्तानच्या अंतर्भावामुळें आता ती संख्या २८ झाली आहे. मदत मिळणाऱ्या देशांमध्यें युरपमधील इंग्लंड, फ्रान्स, नॉर्वे, पोर्च्युगल इत्यादि राष्ट्रें व इतर भूभागांतील तुर्कस्तान, इराण, जपान, थायलंड, ब्राझिल, पेरू, क्युबा इत्यादि राष्ट्रें आहेत.

लष्करी मदत किती रकमेची व कोणत्या स्वरूपाची मिळणार त्याबद्दलची माहिती अद्याप उपलब्ध नाहीं. वाटाघाटींना आतां सुरवात झाली आहे. व निश्चित स्वरूपाची योजना आखण्यासाठीं लष्करी अधिकाऱ्यांचें एक शिष्टमंडळ पाकिस्तानला गेल्याचेंहि जाहीर झालें आहे. शिष्टमंडळानें माहिती मिळविल्यानंतर मदतीची नक्की योजना तयार होईल. व त्यानंतरच पाकिस्तानच्या पदरांत अखेर काय पडतें त्याचा पत्ता लागेल.

तूर्त एक गोष्ट निश्चितपणें सांगतां येते. ती ही कीं लष्करी मदतीच्या बदल्यांत पाकिस्तान अमेरिकेला आपल्या देशांत कांहीं लष्करी तळ वापरायला देणार आहे, अशा ज्या अफवा उठल्या होत्या त्यांच्यामध्यें मुळीं देखील तथ्य नाहीं. अमेरिकेनें लष्करी तळ मागितले नाहींत आणि पाकिस्ताननें ते देण्याचें कबूल केलें नाहीं, अशी वस्तुस्थिति आहे. कराराची चर्चा करतांना ही वस्तुस्थिति जरूर लक्षांत ठेवावयास हवी.

पाक-अमेरिका कराराविरुद्ध भारतामध्यें खूप काहूर उठलें आहे. लष्करी मदतीच्या कराराला भारताचा जो विरोध आहे त्यामध्यें दोन मुद्दे आहेत. पहिला मुद्दा हा कीं पाकिस्तानला लष्करी मदत मिळाली तर त्या देशाचें लष्करी सामर्थ्य वाढेल आणि आपल्या वाढलेल्या लष्करी सामर्थ्याचा उपयोग तो देश कदाचित् भारताविरुद्ध करील. भारताला ही धास्ती वाटते याचें कारण असें कीं भारत व पाकिस्तान यांच्यामध्यें अनिर्णीत व वादग्रस्त असे अनेक प्रश्न आहेत. त्या प्रश्नांचा, विशेषेंकरून काश्मीरसारख्या नाजूक प्रश्नाचा, शस्त्रबळानें निकाल लावून घेण्याची प्रवृत्ति कदाचित् बळावेल आणि मग अमेरिकेकडून मिळालेल्या शस्त्रास्त्रांचा व युद्धसामग्रीचा भारताविरुद्ध उपयोग केला जाईल अशी भारताला धास्ती वाटते. म्हणून भारताचा आग्रह असा होता कीं लष्करी मदत देऊन अमेरिकेनें पाकिस्तानचें लष्करी बळ वाढवूं नये.

दुसरा जो मुद्दा आहे तो आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या आजच्या परिस्थितीवर आधारलेला आहे. पाकिस्तानला देऊं केलेली लष्करी मदत ही सोव्हिएट रशियाच्या विरुद्ध अमेरिका जगभर जी संरक्षक फळी उभारूं पहात आहे तिचाच एक भाग आहे. ती मदत स्वीकारली म्हणजे पाकिस्तानचा त्या संरक्षक फळीमध्यें समावेश होतो. पाकिस्तान अमेरिकेच्या बाजूनें उभें राहिलें म्हणजे सोव्हिएट रशियाला, युद्ध होईल त्या वेळीं, पाकिस्तानावर स्वारी करण्याला निमित्त सांपडतें. आणि मग ज्या युद्धापासून अलिप्त रहावें अशी भारताची उत्कट इच्छा आहे तें युद्ध अगदीं उंबरठ्याशीं येऊन ठेपतें. म्हणून लष्करी मदत स्वीकारून पाकिस्ताननें युद्धाचें क्षेत्र आपल्या दरवाज्यापाशीं आणूं नये व पाकिस्तानला लष्करी मदत देऊन अमेरिकेनें आशियाला युद्धाच्या आवर्तांत ओढूं नये अशी भारताची पाकिस्तान व अमेरिका यांना आग्रहाची विनंति होती.

या दोन मुद्द्यांखेरीज, एका देशानें दुसऱ्या देशाची लष्करी मदत घेणें योग्य नव्हे, लष्करी मदत घेतल्यानें

अनुक्रमणिका

स्वातंत्र्य नष्ट पावतें, आशियांतील स्वतंत्र राष्ट्रांना पुन्हा परतंत्र बनविण्याचा हा एक पाश्चात्त्य राष्ट्रांचा डाव आहे, मदत संरक्षणासाठीं नसून आक्रमणासाठीं आहे वगैरे अनेक गौण मुद्देहि लष्करी कराराच्या विरोधासाठीं वेळोंवेळीं मांडले जातात. त्यांचाहि या विवेचनांत थोडाबहुत विचार करावा लागेल.

विवेचनाच्या सुरवातीलाच एक गोष्ट स्पष्ट केली पाहिजे. स्वतंत्र व सार्वभौम राष्ट्र या नात्यानें वाटेल त्या राष्ट्रांशीं दोस्तीचे संबंध जोडण्याचे व मर्जीला येईल त्या राष्ट्रांकडून मर्जीला येईल त्या तऱ्हेची मदत घेण्याचें पाकिस्तानचें स्वातंत्र्य आणि अधिकार प्रत्येकानें मान्य केला आहे. अर्थातच इष्ट वाटेल तसें वागण्याचा पाकिस्तानला जसा अधिकार आहे तसाच पाकिस्तानच्या कोणत्याहि कृतीबद्दल आपल्याला वाटतें तें बोलून दाखविण्याचा इतरांनाहि अधिकार आहे. शेजारी म्हणून व अत्यंत जिव्हाळयाचे हितसंबंध गुंतले आहेत म्हणून तसें बोलून दाखविण्याचा भारताला सर्वांत अधिक अधिकार आहे. पण तो अधिकार गाजवितांना शिष्टाचाराच्या मर्यादा पाळल्या जातील व दुसऱ्याच्या भावना दुखावल्या जाणार नाहींत एवढी मात्र खबरदारी घेतली पाहिजे. प्रस्तुत वादामध्यें ही खबरदारी ज्या प्रमाणांत घ्यायला हवी होती त्या प्रमाणांत घेतली गेली नाहीं असें मोठ्या खेदानें म्हणावें लागतें.

पाकिस्तानबद्दल भारतामध्यें जी फार मोठी संशयाची वृत्ति आहे तीच खरोखरी पाक–अमेरिका कराराच्या विरोधाच्या मुळाशीं आहे. पाकिस्तान आपला शत्रु आहे ही भावना विद्यमान नसती तर कराराच्या बातमीमुळें लोकमत इतकें प्रक्षुब्ध झालें नसतें. भारताविरुद्ध चढाई करण्याच्या हेतूनेंच पाकिस्तान अमेरिकेकडून लष्करी मदत मिळवूं पहात आहे अशीच सर्वसाधारण लोकांची कल्पना आहे आणि त्यामुळेंच त्यांना हा करार अत्यंत निषिद्ध वाटतो. या बाबतींत विचार करण्यासारखी गोष्ट ही आहे कीं पाकिस्तानमध्येंहि भारताबद्दल संशयाची वृत्ति आहे आणि ही संशयाची वृत्ति जोंवर कायम राहील तोंवर भारताविरुद्ध कमजोर ठरूं नये या उद्देशानें स्वतःचें लष्करी सामर्थ्य वाढवावें असें पाकिस्तानला वाटणें साहजिक आहे. म्हणून ती संशयाची वृत्ति दूर होत नाहीं तोंवर या नाहीं त्या राष्ट्राकडून मदत मिळवून लष्करी बळ वाढविण्याचे प्रयत्न पाकिस्ताननें करणें ही गोष्ट अत्यंत साहजिक आहे. अमेरिकेकडून लष्करी मदत मिळाली नसती तर पाकिस्तान दुसऱ्या एखाद्या राष्ट्राकडे, कदाचित् सोव्हिएट रशियाकडेहि वळलें असतें. म्हणून भारत व पाकिस्तान यांच्यामधील संबंध सुधारणें, भीतीचें व संशयाचें वातावरण दूर करणें, मतभेदाचे मुद्दे समेटानें मिटविणें हाच एक मार्ग दोघांनींहि स्वीकारला पाहिजे. हा मार्ग स्वीकारला नाहीं तर लष्करी बळ वाढविण्याच्या खटाटोपांत दोघांनाहि पडावें लागेल आणि दोघांनाहि लष्करी मदतीची भीक या नाहीं त्या बलाढय राष्ट्राकडून मागावी लागेल. पाक-अमेरिका करार हें रोगाचें मूळ नसून तें रोगाचें लक्षण आहे हें ओळखलें पाहिजे. रोगाचें मूळ आहे तें भारत व पाकिस्तान यांच्यामध्यें पुरेसें सख्य नाहीं या दुर्दैवी घटनेंत आहे. सख्य निर्माण झालें कीं अशा कराराची कुणालाहि गरज भासणार नाहीं आणि एकानें लष्करी सामर्थ्य वाढविलें तर तें आपल्याविरुद्ध वापरण्यासाठींच अशी दुसऱ्याला धास्ती वाटणार नाहीं.

अमेरिकेकडून करारान्वयें लष्करी मदत मिळाली तरी पाकिस्तानचें लष्करी सामर्थ्य कितपत वाढेल याचीहि जरा वास्तविक दृष्टि ठेवून चर्चा व्हायला हवी. मदतीचा नक्की आंकडा अद्याप जाहीर झालेला नाहीं. अंदाजावरून तो दोनतीनशें दशलक्ष डॉलर्सच्या पलीकडे जाईल असें दिसत नाहीं. एवढया मदतीनें पाकिस्तान भारतावर आक्रमण करण्याइतकें समर्थ होईल अशी कल्पना करणें अत्यंत अडाणीपणाचें आहे. आज पाकिस्तानचें लष्करी सामर्थ्य भारतापेक्षां किती तरी हिश्शयांनीं कमी आहे. प्रस्तुतच्या लष्करी मदतीनें तें वाढणार वाढणार किती ? शिवाय पाकिस्तान हें एक दुभंगलेलें राष्ट्र आहे ही गोष्ट विसरून चालणार नाहीं. युद्ध पुकारलें तर एका व मोठ्या भागाला पाकिस्तानला तावडतोब मुकावें लागेल ही गोष्ट कुणाच्याहि लक्षांत यावयास हवी. खेरीज आधुनिक युद्धें हीं केवळ सैन्यांच्या बळावर लढलीं जात नाहींत. उद्योगधंद्यांचें बळ पाठीशीं असल्याखेरीज आजकाल युद्ध लढतां येत नाहीं. आणि उद्योगधंद्यांच्या बाबतींत पाकिस्तान भारताच्या किती तरी मागें आहे. म्हणून पाक-अमेरिका लष्करी करारामुळें युद्धाचें अरिष्ट भारतावर कोसळणार

आहे असा कांगावा करण्यांत हंशील नाहीं.

पुष्कळ मंडळींनीं असा कांगावा करायला सुरवात केली आणि भारत सरकारनें आतां इतर सान्या गोष्टी बाजूला ठेवून केवळ लष्करी सामर्थ्य वाढविण्याकडेच लक्ष पुरवावें असा आग्रह धरला. त्यांच्या या आग्रहाला पं. जवाहरलाल नेहरू यांनीं अत्यंत शहाणपणाचें उत्तर दिलें आहे. लष्करी सामर्थ्य वाढविणें हा देशाचें सामर्थ्य वाढविण्याचा खरा मार्ग नव्हे असें त्यांनीं खणखणीतपणें सांगितलें आहे. त्यांच्या अध्यक्षतेखालीं कल्याणी येथें भरलेल्या राष्ट्रीय महासभेच्या अधिवेशनांत मंजूर झालेल्या ठरावांत तेंच उत्तर ग्रथित केलें आहे. ठरावाच्या शेवटल्या भागांत म्हटलें आहे : " शस्त्रास्त्रें वाढविण्याच्या भरीस पडून भारताला आपलें खरेखुरें बळ वाढवतां येणार नाहीं. एकी, स्वावलंबन आणि देशाचा सामाजिक, आर्थिक व औद्योगिक विकास यांच्या योगानेंच त्या बळाची खरीखुरी वाढ होते " ('It is not by competition in armaments that India will basically strengthen herself but by unity, self-reliance, and the social, economic and industrial development of the nation.') अमेरिकेच्या मदतीमुळें पाकिस्तानचें लष्करी सामर्थ्य वाढणार म्हणून भारतानेंहि आपलें लष्करी सामर्थ्य वाढविलें पाहिजे असा आक्रोश करणारांनीं वरील इषारा जरूर ध्यानांत ठेवावा.

या मुद्द्याचा विचार करतांना, पंतप्रधान नेहरूंना लिहिलेल्या पत्रांत प्रेसिडेंट ऐसेनहॉअर यांनीं जें आश्वासन दिलें आहे तें देखील लक्षांत घेतलें पाहिजे. त्यांनीं स्पष्टपणें असें सांगितलें आहे कीं केवळ स्वसंरक्षणासाठींच ही लष्करी मदत पाकिस्तानला दिली जात आहे व पाकिस्ताननें जर यदाकदाचित् चढाईच्या कामासाठीं मदतीचा दुरुपयोग केला तर ती चढाई हाणून पाडण्यासाठीं अमेरिका तावडतोब आपल्या प्रयत्नांची शिकस्त करील. इतकें स्पष्ट स्वरूपाचें आश्वासन मिळाल्यानंतर लष्करी मदतीचा उपयोग पाकिस्तान हिंदुस्तानाविरुद्ध काश्मीरमध्यें किंवा इतरत्र करील अशी धास्ती बाळगण्याचें खरोखरच कारण उरत नाहीं.

पुष्कळांना लष्करी मदतीचें वैषम्य वाटतें, आर्थिक मदत स्वीकारायला त्यांची हरकत नाहीं. पं. नेहरू देखील या वर्गांत मोडतात. पण तसें पाहिलें तर आर्थिक मदत व लष्करी मदत यांमध्यें तत्त्वतः विशेष तफावत नाहीं भारतानें आतांपावेतों अमेरिकेकडून कोट्यवधि रुपयांची आर्थिक मदत घेतलेली आहे. ही मदत घेतल्यामुळेंच भारताला आज खर्च केला जात आहे तितका पैसा लष्करावर खर्च करतां येत आहे असें म्हणतां येणार नाहीं कां ? ही मदत मिळाली नसती तर एक तर आर्थिक विकासाच्या योजनांमध्यें काटछाट करावी लागली असती अगर लष्करी खर्च कमी करावा लागला असता. म्हणून जरा खोल दृष्टीनें विचार केला तर आर्थिक मदत व लष्करी सामानाची मदत यांमध्यें तत्त्वतः विशेष फरक नाहीं असें आढळून येतें. भारतांतील ब्रिटिश सरकारचे हायकमिशनर सर अलेक्झॅंडर क्लटरबक यांनीं हा मुद्दा मद्रास येथील आपल्या एका भाषणांत अतिशय चांगल्या रीतीनें मांडला आहे. त्यांनीं असें दाखवून दिलें आहे कीं आर्थिक मदत स्वीकारून देखील जसें एखाद्या देशाला आपलें स्वातंत्र्य अबाधित राखतां येतें तसें लष्करी मदत स्वीकारूनहि राखतां येतें. या बाबतींत त्यांनीं इंग्लंड-आदिकरून युरपमधील राष्ट्रांचीं उदाहरणें दिलीं आहेत. इंग्लंड, फ्रान्स वगैरे राष्ट्रांनीं अमेरिकेकडून आर्थिक साहाय्य जसें घेतलें तशी लष्करी मदतहि घेतली आहे. आणि आर्थिक मदतीनें जसें त्यांच्या स्वातंत्र्यावर बंधन पडलें नाहीं तसेंच लष्करी साहाय्यानेंहि पडलें नाहीं. म्हणून अमेरिकेची आर्थिक मदत घेऊन भारत स्वतंत्र राहूं शकतो पण लष्करी मदत घेतल्याकारणानें पाकिस्तान मात्र परतंत्र बनतो असा कांगावा करण्यांत हंशील नाहीं. लष्करी मदत स्वीकारल्यामुळें जे दुष्परिणाम घडणें शक्य आहे तेच आर्थिक मदत घेतल्यामुळें घडणेंहि शक्य आहे हें या बाबतींत विसरतां कामा नये.

पाकिस्तानला लष्करी मदत देण्यामध्यें आशियामध्यें स्वतःचें वर्चस्व स्थापन करण्याचा अमेरिकेचा हेतु आहे असाहि एक आरोप केला जातो. या आरोपांत कांहींच तथ्य नाहीं. जुन्या तऱ्हेची साम्राज्यशाही ही आतां एक पुराण वस्तू बनली आहे. बाजारपेठ मिळावी, भांडवल गुंतविण्यासाठीं क्षेत्र लाभावें व गडगंज नफा कमावतां यावा म्हणून जुन्याकाळीं साम्राज्यवादी राष्ट्रें

मागासलेल्या राष्ट्रांवर आपलें वर्चस्व प्रस्थापित करीत असत. आज ती परिस्थिति उरलेली नाहीं. अमेरिका आज इतर राष्ट्रांचें शोषण करण्याऐवजीं भरणपोषण करीत आहे. दुसऱ्या युद्धाच्या अंतानंतर जी नवीन जागतिक परिस्थिति निर्माण झाली तिच्यामुळें अमेरिकेला हें नवीन धोरण स्वीकारावें लागलें आहे. जुन्या कल्पनेप्रमाणें विचार करून या नवीन धोरणाचा अन्वयार्थ लागणार नाहीं.

अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यामध्यें यादवी उत्पन्न झाली आहे. तिच्यामुळें जागतिक राजकारणाचें स्वरूप साफ पालटलें आहे. जगामध्यें आज तींच दोन बलाढ्य राष्ट्रें आहेत. दोघांनाहि एकमेकांबद्दल अत्यंत धास्ती वाटते व दुसऱ्यानें हल्ला केला तर स्वतःचें संरक्षण कसें करावें याच विवंचनेंत दोघेहि पडले आहेत. दुसऱ्या महायुद्धानंतर सोव्हिएट रशियानें आपल्या साम्राज्याचा खूप विस्तार केला आणि स्वतःचें लष्करी सामर्थ्य अनेक पटींनीं वाढविलें. शिवाय साम्यवाद ही एक आक्रमक स्वरूपाची शक्ति आहे आणि पसरणें हा तिचा स्वाभाविक गुणधर्म आहे. त्यामुळें अमेरिका-आदिकरून लोकशाही राष्ट्रांना सोव्हिएट रशियाची व साम्यवादाची अधिकच धास्ती वाटू लागली. अमेरिकेच्या नेतृत्वाखालीं युरोपमधील राष्ट्रांनीं १९४७ पासून जे एकजूटीचे प्रयत्न केले त्यामुळें युरपमधील रशियाच्या आक्रमणाला पायबंद पडला. पश्चिमेकडे पायबंद पडला तेव्हां रशियाचें लक्ष पूर्वेकडे म्हणजे आशियाकडे वळलें आणि आशियांतील देश आपल्या वर्चस्वाखालीं आणण्याचे त्याचे प्रयत्न सुरू झाले. या प्रयत्नामुळें युरपमध्यें उभारली तशाच तऱ्हेची एक संरक्षक फळी आशियामध्येंहि उभारली पाहिजे असें अमेरिकेला वाटूं लागलें. पाक-अमेरिका लष्करी करार हा या संरक्षक योजनेचा एक महत्त्वाचा भाग आहे.

युरपमधील संरक्षक फळी तुर्कस्तानपर्यंत येऊन पोचली आहे. दुसऱ्या दिशेनें तशाच तऱ्हेची दुसरी संरक्षक फळी जपान–ऑस्ट्रेलिया–न्यू झीलंडवरून फिलिपिन्सपर्यंत येऊन पोचली आहे. तुर्कस्तान ते फिलिपिन्सपर्यंतचा मध्यपूर्व व आग्नेय आशिया हा भागच आतां मोकळा उरला आहे. या भागाला देखील एखाद्या संरक्षणयोजनेंत सामील करावें आणि रशियाला पुढें पाऊल टाकायला कोठें देखील जागा उरूं नये अशी अमेरिकन मुत्सद्द्यांची फार इच्छा आहे. भारत, इंडोनेशिया व ब्रह्मदेश या राष्ट्रांनीं तटस्थतेचें धोरण स्वीकारण्याचें ठरविल्याकारणानें अमेरिकेची ही इच्छा फलद्रूप होऊं शकली नाहीं. त्यानंतर ईजिप्त, अरब राष्ट्रें व पाकिस्तान यांच्यावर आधारलेली मध्यपूर्वेची संरक्षणयोजना तयार करण्याचा अमेरिकेनें प्रयत्न केला. पण ईजिप्तच्या विरोधामुळें व अरब राष्ट्रांतील भांडणामुळें ती योजनाहि मूर्तस्वरूपांत येऊं शकली नाहीं. म्हणून आतां तुर्कस्तान व पाकिस्तान यांच्यावर आधारलेली एक नवी योजना अमेरिकेनें आंखली आहे. तुर्कस्तान व पाकिस्तान यांच्यामध्यें नुकताच घडून आलेला करार हा या योजनेचा पाया आहे. पाकिस्तानला जी लष्करी मदत मिळावयाची ती या योजनेचा एक भाग म्हणून मिळणार आहे.

एकट्या पाकिस्तानला स्वतंत्रपणें मदत देण्याऐवजी तुर्कस्तान व पाकिस्तान यांच्यावर आधारलेल्या संरक्षण-फळीला ती मदत दिली तर भारताला तेवढें वाईट वाटणार नाहीं अशी अमेरिकेची कल्पना होती. ती कल्पना खरी ठरली नाहीं. भारताचा विरोध तर कमी झाला नाहींच, उलट इतर ठिकाणीहि विरोधाचे सूर उठले. ईजिप्तनें आपला विरोध जाहीर केला आहे. ईजिप्तला असें वाटतें कीं इंग्लंडशीं सुएज कालव्याबद्दलचें जें भांडण आहे त्याचा समाधानकारक निकाल लागल्याखेरीज कोणत्याहि पौर्वात्य राष्ट्रानें पाश्चात्त्य राष्ट्रांच्या संरक्षकयोजनेमध्यें सामील होऊं नये. ईजिप्तचा दृष्टिकोण अत्यंत स्वार्थी स्वरूपाचा आहे. इंग्लंडबरोबर त्याचें जें भांडण आहे, त्या भांडणांत अमेरिकेची मदत मिळावी या हेतूनें त्यानें टाकलेला हा डाव आहे. अफगाणिस्तानचाहि पाक-अमेरिका कराराला विरोध आहे. कारण, अफगाणिस्तानला अशी धास्ती वाटते कीं पाकिस्तानचें बळ वाढलें तर आज ना उद्यां आपल्याला तें जड जाईल.

पाकिस्तानमध्येंहि प्रस्तुत कराराला थोडाबहुत विरोध आहे. साम्यवादी विचारसरणीच्या व्यक्तींनीं व गटांनीं विरोध करावा यांत नवल नाहीं. पण विरोध केवळ त्यांच्यापुरताच मर्यादित नाहीं. तो जास्त व्यापक स्वरूपाचा आहे. सरकारी गोटाबाहेरील सर्व राजकारणी व्यक्तींनीं कराराला विरोध दर्शविला आहे. पण विरोधी

पक्षांतील या व्यक्तींचें देशामध्यें फारसें वजन नाहीं. एक गोष्ट मात्र निश्चित आहे कीं पूर्वेकडील सर्व देशांमध्यें पाश्चात्त्य राष्ट्राबद्दल आणि त्यांच्या धोरणाबद्दल सामान्यपणें बरेचसें वैमनस्य नांदत असतें. हें वैमनस्य भडकवून देणें फारसें कठीण नसतें. त्यामुळें अमेरिकेशीं लष्करी मदतीचा करार करण्याबद्दलच्या सरकारी धोरणाला आज जरी सामान्य जनतेचा विरोध नसला तरी उद्यां परिस्थिति थोडीबहुत पालटतांच, तो उत्पन्न होणार नाहीं अशी खात्री कुणीहि देऊं शकणार नाहीं. तुर्कस्तान-पाकिस्तान कराराचें मात्र सर्वांनीं उत्साहानें स्वागत केलें आहे.

जगांतील दोन राष्ट्रगटांच्या भांडणामध्यें आपण स्वीकारलें आहे तसें तटस्थपणाचें धोरण पाकिस्ताननेंहि स्वीकारावें असें भारताला वाटावें हें साहजिक आहे. पण पाकिस्तानला ही गोष्ट युक्तिवादानें पटवून द्यायला हवी. जुलमजबरदस्तीनें तें धोरण त्याच्यावर लादणें शक्य नाहीं. तटस्थतेचें धोरण स्वीकारण्याचा भारताला जितका अधिकार आहे, तितकाच या नाहीं त्या गटाला जाऊन मिळण्याचा अधिकार पाकिस्तानला आहे. एकंदर आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा विचार करून रशियन आक्रमणाच्या धास्तीनें अमेरिकेची लष्करी मदत घेणें पाकिस्तानला जरुरीचें भासलें. म्हणूनच त्यानें लष्करी कराराचा हा मनसुबा रचला.

पाकिस्तानच्या या धोरणामुळें आशियामध्यें तटस्थ राष्ट्रांचा गट उभारण्याचे जे भारताचे प्रयत्न चालू आहेत त्या प्रयत्नांमध्यें मात्र मोठें विघ्न उभें राहिलें आहे. जागतिक शांततेच्या दृष्टीनें असा गट उभारला जाणें अगत्याचें आहे. आशियांतील नव्यानें स्वतंत्र झालेलीं सर्व राष्ट्रें या गटांत सामील व्हावींत अशी भारताची इच्छा होती. ही इच्छा पं. नेहरूंनीं अनेक वेळां व्यक्त केली, पण ती फलद्रूप होण्याच्या दृष्टीनें जे कसोशीचे व पद्धतशीर प्रयत्न करायला हवे होते ते मात्र त्यांनीं केले नाहींत. पाकिस्तानबरोबर उत्पन्न झालेले भांडणाचे सारे मुद्दे शक्य तितक्या लवकर निकालांत काढून भारत व पाकिस्तान यांच्यामध्यें अनाक्रमणाचा व परस्परमदतीचा करारनामा त्यांनीं घडवून आणायला हवा होता. ब्रह्मदेश व सिलोन यांना नंतर या करारामध्यें सामील करून घेतां आलें असतें व मागाहून पश्चिमेला ईजिप्तपर्यंत व पूर्वेला इंडोनेशियापर्यंत साऱ्या लोकशाहीवादी आशियाई राष्ट्रांना करारामध्यें गोवतां आलें असतें. एकमेकांना मदत करण्याच्या प्रतिज्ञेनें हीं सारीं राष्ट्रें जर अशा तऱ्हेनें बांधलीं गेलीं असतीं तर त्यांना परकीय आक्रमणाची धास्ती वाटली नसती आणि अमेरिका काय किंवा रशिया काय कुणाकडेहि त्यांना लष्करी मदतीची याचना करावी लागली नसती. आशियांतील या नवोदित राष्ट्रांच्या स्वातंत्र्याची दोन्ही राष्ट्रगटांना कदर करणें भाग पडलें असतें आणि स्वतःचें स्वातंत्र्य व जागतिक शांतता या दोहोंच्याहि दृष्टीनें ती अत्यंत हितावह अशी योजना ठरली असती.

अशी योजना म्हणजेच आशियांतील राष्ट्रांचा शांततावादी गट यापुढें बनवतां येणार नाहीं अशी परिस्थिति नाहीं. असा गट बनूं लागला तर पाकिस्तानदेखील त्यामध्यें येण्याचा संभव आहे. अमेरिकेकडून लष्करी मदत घेतली म्हणून आशियाई राष्ट्रांच्या अशा संघटनेंत सामील होण्याचें आपलें स्वातंत्र्य पाकिस्ताननें विकून टाकलें असें समजण्याचें कारण नाहीं. असा गट बनला तर इंग्लंड-अमेरिकेसारख्या पाश्चात्त्य राष्ट्रांचाहि त्याला पाठिंबा लाभणें शक्य आहे. कारण रशियाचें पाऊल आशियामध्यें पुढें पडूं नये एवढेंच त्यांचें आजचें प्रधान उद्दिष्ट आहे. तें या मार्गानें साध्य होत असेल तर त्याला त्यांनीं हरकत कां करावी ? आशियाई राष्ट्रांचा असा गट बनविण्याचें कार्य वाटतें तितकें सोपें नाहीं. त्यामध्यें अनेक अडचणी आहेत. पण आशियाई राष्ट्रांनीं या नाहीं त्या राष्ट्रगटांत सामील होऊं नये असें वाटत असेल तर गट बनविणें हाच एक मार्ग मोकळा आहे. सिलोनच्या पंतप्रधानांनीं आशियांतील स्वतंत्र राष्ट्रांच्या पंतप्रधानांची परिषद् भरविण्याची कल्पना जाहीर केली. त्या कल्पनेला भारत, पाकिस्तान, ब्रह्मदेश इत्यादि राष्ट्रांनीं पाठिंबा दिला आहे. ही परिषद् लौकरच कोलंबोला भरणार आहे. अशा परिषदा वेळोवेळीं भरूं लागल्या तर त्या बाटाघाटींतूनच कदाचित् वर उल्लेखिली आहे अशा तऱ्हेची संघटना निर्माण होऊं शकेल.

पाकिस्ताननें अमेरिकेकडून लष्करी मदत स्वीकारली म्हणून तिसरें जागतिक महायुद्ध भारताच्या अगदीं दाराशीं येऊन ठेपलें हें म्हणण्यांत फारसा हंशील नाहीं. तिसरें महायुद्ध होणार असेल तर तें या करारामुळें

जवळहि येत नाहीं किंवा लांबणीवरहि पडत नाहीं. युद्धाची जी तयारी इतरत्र चालू आहे त्या मानानें पाकिस्तानला मिळूं घातलेली मदत अगदी क:पदार्थ आहे. युद्ध सुरूं झालें तर मदत घेतली म्हणून रशिया पाकिस्तानवर स्वारी करील असें थोडेंच आहे ? स्वारी करायची कीं नाहीं हें इतर गोष्टीवरुन ठरेल. एकदां जागतिक युद्ध सुरूं झालें कीं तो वणवा कोठें पसरेल आणि कोठें पसरणार नाहीं हें आज सांगणें शक्य नाहीं. तटस्थ भारतालाच कदाचित् त्याचा चटका प्रथम जाणवेल. भविष्यकाळाच्या पोटांतील या गोष्टी आहेत. त्याबद्दल अनुमानें बांधून आपली बाजू सिद्ध करण्याचा आज कुणीहि प्रयत्न करू नये.

कराराविरुद्ध काहूर उठवून पाकिस्तानला लष्करी मदत घेण्याच्या विचारापासून अमेरिकेला परावृत्त करतां येईल अशी सुरवातीला पुष्कळांची कल्पना होती. त्या कल्पनेनें त्यांनी काहूर खूप उठविलें पण त्याचा हवा तो परिणाम झाला नाहीं. अमेरिकेनें आपला विचार बदलला नाहीं. पाकिस्तान अमेरिकेकडे गेलें म्हणून भारतानें रशियाकडे वळावें असा विचार कांहीं अविवेकी मंडळींनीं प्रदर्शित केला आहे. हा विचार भारताच्या मूलभूत धोरणाशीं विरोधी आहे. अमेरिका भारतालाहि लष्करी मदत द्यायला तयार होती. भारतानेंच स्वत: ती मदत नाकारली. प्रेसिडेंट आयसेनहॉअर यांच्या पत्रांतहि ' मागाल तेव्हां मदत देऊं ' असा उल्लेख आहे. मदत रशियाकडून घेतली म्हणजे योग्य ठरते व अमेरिकेकडून घेतली म्हणजे अयोग्य ठरते असें थोडेंच आहे ! त्यानंतर दुसरी सूचना जी पुढें आली ती ही कीं भारतानेंहि आतां आपलें लष्करी बळ वाढवावें. कल्याणी-काँग्रेसच्या ठरावानें त्या सूचनेला अत्यंत योग्य आणि समर्पक असें उत्तर दिलें आहे. लष्करी खर्च वाढविणें हें जितकें अयोग्य व अनिष्ट, पाकिस्तानशीं शत्रुत्व वाढवणें हें देखील तितकेंच अयोग्य व अनिष्ट. लष्करी मदतीमुळें पाकिस्तान भारतापेक्षां लष्करी सामर्थ्यांत वरचढ ठरेल ही कल्पना अत्यंत चुकीची आहे. पण शेजारीशेजारी म्हणून प्रेमानें व गुण्यागोविंदानें एकत्र नांदावयाचें आहे तर लष्करी सामर्थ्य वाढविण्याची चढाओढ कशाला ? सध्याच्या परिस्थितींत पाकिस्तानशीं उत्पन्न झालेले वादाचे मुद्दे निकालांत काढणें व दोन्ही देशांमधील प्रेमसंबंध वाढविणें हें पहिलें आणि महत्त्वाचें कर्तव्य होय. हें कर्तव्य पार पाडलें तरच शांततावादी असा आशियाई राष्ट्रांचा एक नवा गट उभारण्याचें भारताचें स्वप्न प्रत्यक्षांत उतरवता येईल.

शेवटीं अमेरिकेच्या धोरणाबद्दल एकदोन शब्द लिहिले पाहिजेत. रशियन आक्रमण रोखण्याच्या हेतूनें आणि लोकशाहीवादी राष्ट्रांच्या संरक्षणाच्या हेतूनें अमेरिका पाकिस्तानला लष्करी मदत द्यायला उद्युक्त झाली यात शंका नाहीं. पण लष्करी मदत देऊन कार्यभाग कितपत साधतो याचा अमेरिकेनें जरा खोल दृष्टीनें विचार करायला हवा. सैन्य सुसज्ज झालें, पण आर्थिक परिस्थिति सुधारली नाहीं व जनतेचा पाठिंबा लाभला नाहीं तर त्या सुसज्ज सैन्याचा शत्रूलाच जास्त उपयोग होण्यासारखा आहे ही गोष्ट विसरतां कामा नये. चीनमध्यें काय घडलें तें या बाबतींत जरूर ध्यानांत ठेवावयास हवें. शस्त्रास्त्रें नकोत असें कुणालहि म्हणावयाचें नाहीं, पण शस्त्रास्त्रांचा उपयोग लोकशाहीच्या संरक्षणासाठीं व संवर्धनासाठींच होईल अशी ग्वाही देणारें लोकमतहि हवें. तसें प्रभावी स्वरूपाचें लोकमत पाकिस्तानमध्यें आहे अशी खात्री अमेरिकेला कुणी दिली आहे का ? तसेंच पाकिस्तानला लष्करी मदत दिल्यामुळें भारतांतील व इतर कांहीं देशांतील लोकमत आपल्याविरुद्ध जाईल याचाहि अमेरिकेनें विचार करायला हवा होता. तसा विचार केला असता तर मदत देऊन जितका फायदा झाला त्याच्यापेक्षां भारतासारख्या देशांतील लोकमत विरुद्ध झाल्याकारणानें नुकसान अधिक झालें हा सरळ हिशेब अमेरिकेच्या ध्यानांत आला असता.

आंतरराष्ट्रीय प्रश्नांकडे पाहण्याची भारताची दृष्टि अमेरिकेपेक्षां वेगळी आहे. त्यामुळें अनेक वेळां भारत व अमेरिका यांच्यामध्यें मतभेदाचे मुद्दे उत्पन्न होतात. पण आजवरच्या मतभेदामुळें जसें दोन्ही देशांतील सख्य तुटलें नाहीं तसेंच आतांच्या या मतभेदाच्या मुद्द्यामुळेंहि तुटतां कामा नये. लोकशाहीवादी राष्ट्रांच्या गटामध्यें मतभेदांना जागा असते. भारत व अमेरिका हीं दोन्हींहि लोकशाहीवादी राष्ट्रें आहेत. दोघांचींहि ध्येयें समान आहेत, पण त्या ध्येयांकडे जाण्याचे दोघांचे मार्ग जरा भिन्न आहेत. त्या भिन्नतेमुळें मतभेद

पुष्कळदा निर्माण होतात, पण नेहमींच्या सहकार्याच्या ते कधींहि आड येत नाहींत. भारताचें आंतरराष्ट्रीय धोरण वेगळें म्हणून त्याला आर्थिक मदत देऊं नये असें अमेरिकन सरकारनें कधींहि म्हटलें नाहीं. पाकिस्तानशीं लष्करी मदतीचा करार करतांना अमेरिकेनें भारताशीं जें सौजन्यपूर्ण वर्तन केलें त्याला इतिहासांत तोड सांपडणें कठीण आहे. प्रेसिडेंट आयसेनहॉअर यांनीं पंतप्रधान नेहरूंना कराराची बातमी जाहीर करण्याच्या आदल्या दिवशीं पाठविलेलें पत्र त्या सौजन्यपूर्ण वर्तनाचें उज्ज्वल उदाहरण आहे. तसेंच कराराच्या बाबतींत एवढें काहूर उठवल्यानंतरहि भारताला कोट्यवधि रुपयांची नवी आर्थिक मदत देण्याचा विचार आज अमेरिकेमध्यें चालू आहे. ही मदत लवकरच भारताला उपलब्ध होईल यात शंका नाहीं. लोकशाहीमूल्यावरील समान श्रद्धेनें दोन्ही देशामध्यें जें न तुटणारें असें नातें निर्माण झालें आहे त्याचमुळें अमेरिका भारताच्या बाबतींत ही उदार बुद्धि राखूं शकते. तीच उदार बुद्धि भारतानेंहि अमेरिकेच्या बाबतींत राखली पाहिजे. उभयपक्षीं उदार बुद्धि राखली गेली तर, मतभेदाचे मुद्दे मधून मधून निर्माण झाले तरी, लोकशाहीवादी अशा या दोन महान् राष्ट्रांतील सख्यामध्यें कधींहि अंतर येणार नाहीं.

पुस्तक-परिचय

' युरोपला रशियाची भीति ! '

'The Russian Menace to Europe' by Karl Marx and Freidrich Engels; selected and edited by P. W. Blackstock, B. F. Hoselitz (George Allen and Unwin Ltd.)

या पुस्तकांत कार्ल मार्क्स व एंगल्स् या दोघांनीं १८४९ ते १९९४ या कालावधींत लिहिलेले लेख, केलेलीं भाषणें आणि त्यावेळच्या वृत्तपत्रांतून आलेले वृत्तान्त हे निवडून एकत्रित करण्यांत आलेले आहेत.

मार्क्स व एंगल्स यांनीं गेल्या शतकाच्या शेवटच्या भागामध्यें झारच्या रशियावर फार कडक टीका केली होती. त्यावेळीं युरोपांत कम्युनिस्ट क्रांति होईल तर ती रशियांत न होता जर्मनीमध्येंच होईल अशी या दोघांची कल्पना होती. त्या सुमारास मार्क्सचें रशियाशीं उघडउघड शत्रुत्व होतें; त्यामुळें रशिया-विरोधी जेवढें बोलतां लिहितां येईल तेवढें या दोघांनीं त्या काळांत लिहून ठेवलें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या ब्लॅकस्टॉक व होझलित्झ या लेखकद्वयांनीं अशा प्रकारचे लेख एकत्रित केलेले आहेत. संपादनाच्या कार्यांत त्यांनीं खूपच मेहनत घेतलेली आहे हें स्पष्ट दिसत असूनहि राज्यशास्त्राच्या अभ्यासकाच्या दृष्टीनें त्यांचे हे श्रम फारसे कारणीं लागणार नाहींत असें वाटतें. त्यावेळीं मार्क्स रशियाबद्दल काय म्हणत असें तें सांगून व ओढून ताणून युक्तिवाद लढवून "पाहा ! आजहि तेंच चाललें आहे कीं नाहीं," असें म्हणण्यांत फारसें स्वारस्य नाहीं. पुस्तक वाचीत असतांना घटका दोनघटका करमणूक होते, नाहीं असें नाहीं, पण पुस्तक वाचून संपविल्यानंतर आपल्या ज्ञानांत कांहीं भर पडली आहे वा आपल्याला नवी दृष्टि प्राप्त झाली आहे असें म्हणतां येत नाहीं.

उदाहरणार्थ कांहीं नमुने पाहा : मार्क्सच्या मतें झारच्या रशियाच्या परराष्ट्रीय धोरणाचें जगावर स्वामित्व हेंच एकमेव मूलतत्त्व होतें. जगावर स्वामित्व मिळविण्यासाठीं प्रथम युरोपवर साम्राज्य हवें. त्याकरितां सर्व स्लाव्ह राष्ट्रांसह पोलंडवर रशियाचें वर्चस्व पाहिजे. (पान. २९). लेखकद्वय वाचकांना प्रश्न टाकतात : " पाहा, मार्क्सनें जें सांगितलें होतें तेंच खरें आहे कीं नाहीं ? सध्यां रशियाचें स्लाव्ह राष्ट्रांवर व पोलंडवर साम्राज्य आहेच. त्यामुळें युरोपवर आक्रमण आणि त्यानंतर सर्व जगावर स्वामित्व हाच रशियाचा आजहि हेतु दिसत आहे. "

या लेखांच्या आधारें लेखकांनीं आणखी असें निष्कर्ष काढले आहेत : (१) क्रांतीचा उद्देश म्हणून वर्गविहीन समाजरचना मार्क्सनें सांगितली असली तरी रशियन क्रांतीमुळें समाजांतील वर्ग व राज्यसंस्था नाहींशी झालेली नाहीं व होण्याचा संभवहि नाहीं. या-उलट राज्यसंस्थेची सर्वंकष सत्ता आणि एका वर्गानें केलेली दुसऱ्या वर्गाची पिळवणूक शतपटीनें

वाढलेली आहे. (२) मार्क्सच्या अपेक्षेप्रमाणें रशिया-मध्यें कम्युनिस्ट क्रांतीमुळें व नंतरच्या सामाजिक शेतीच्या प्रयोगामुळें ग्रामसंस्थेचा कोणत्याहि प्रकारचा उत्कर्ष साधलेला नाहीं. —

मार्क्स व एंगल्स यांनीं १९ व्या शतकांतील झारच्या रशियाबाबत ५०।६० वर्षांपूर्वी केलेलें विवेचन आजच्या स्टालिन – मॅलेन्कॉफच्या रशियाला बरोबर लागू पडतें. परराष्ट्रीय धोरणाचें मूलतत्त्व बदललें नसून, आर्थिक व शास्त्रीय प्रगतीमुळें कांहीं तपशीलामध्यें थोडासा फरक पडलेला आहे असें लेखकांचें म्हणणें आहे. अर्थात् याचें श्रेय मार्क्स व एंगल्सच्या द्रष्टेपणाला द्यावयाला ते तयार नाहींत. त्यांच्या द्रष्टेपणापेक्षां रशियन धोरणांत स्थायी भाव असलेलें सातत्यच जास्त कारणीभूत आहे असें ते मानतात. मार्क्सिझम् व स्टालिनिझम् यांमध्यें केवढें प्रचंड अंतर आहे आणि याच्या उलट झार आणि स्टालिन-मॅलेन्कॉफ यांमध्यें किती साम्य आहे हें अभ्यासकांच्या ध्यानांत येण्यास वरील पुस्तक अत्यंत उपयोगी पडेल अशी लेखकांची धारणा आहे व म्हणून मार्क्स व एंगल्सच्या वरील लेखांवर रशियन सरकारनें बंदी घातलेली आहे.

कम्युनिझमचा धोका जनतेला समजावून सांगण्याचा प्रयत्न करणें हें प्रत्येक लोकशाहीनिष्ठ विद्वानाचें आद्य कर्तव्य आहे. परंतु हें कार्य नकारात्मक किंवा विध्वंसक न होता विधायक झालें पाहिजे. कम्युनिझमवर अथवा रशियाच्या साम्राज्यशाहीवर नुसती टीका करून भाग-णार नाहीं. लोकशाहीची महनीयता लोकांना समजा-वून दिली पाहिजे. या दृष्टीनें पाहतां लेखकांचा हेतू स्तुत्य असला तरी प्रस्तुत उपक्रमामुळें हेतू सिद्ध होईल कीं नाहीं याची साधार शंका वाटते व त्यामुळें हा उपक्रम अनिष्ट वाटतो.

भारताचें परराष्ट्रीय व अंतर्गत धोरण

'India without Illusions' by Vivek (New book Co. Ltd. Bombay)

हें पुस्तक श्री. विवेक यांनीं 'टाइम्स ऑफ इंडिया'-मध्यें १९५० ते ५३ या सुमारास लिहिलेल्या निर-निराळ्या लेखांचा संग्रह करून प्रकाशित करण्यांत आलेलें आहे. पुस्तकांत एक नकाशा असून पुस्तकाचे परराष्ट्रीय राजकारण व अन्तर्गत राजकीय आणि आर्थिक प्रश्न असे तीन भाग पाडले आहेत.

कम्युनिझम उर्फ रशियन साम्राज्यवाद हा स्वभावतःच आक्रमक असून त्याला सोईस्कर होईल तेव्हां भारतावर त्याचें आक्रमण येणारच तेव्हां लोक-शाहीच्या अस्तित्वासाठीं आपण अमेरिकेच्या ऊर्फ लोकशाहीच्या गटांत सामील व्हावें असें 'विवेक' यांना वाटते. श्री. नेहरूंच्या रशिया व चीनशीं मैत्रीचे संबंध ठेवण्याच्या प्रयत्नामुळें देशांतील राष्ट्रघातक्यांचे फावते व अज्ञजन चुकीच्या मार्गानें विचार करूं लागतात. भारतानें कोरियाप्रश्नासंबंधीं संयुक्त राष्ट्रसंघांत मध्यस्थी करण्याचा जो प्रयत्न केला त्याची त्यांनीं थट्टा केलेली आहे. रशियाच्या धोरणांत मॅलेन्कॉफ आल्यापासून वरवर बदल झाल्यासारखें दिसत असलें तरी सर्व जगावर स्वामित्व करणाऱ्या रशियन साम्राज्यवाद्यांचें मूळ धोरण यत्किंचितहि बदललेलें नाहीं अशी श्री. विवेक यांची खात्री आहे.

कम्युनिस्ट चीनच्या आक्रमक धोरणामुळें नेपाळच्या स्वतंत्रतेला धोका आहे अशी त्यांना साधार भीति वाटते.

काश्मीरबद्दल लिहितांना काश्मीरची फाळणी हाच एकमेव उपाय आहे अशी त्यांची खात्री आहे. व हिंदुस्थान व पाक यांमधील हा वाद शांततेनें मिटावा अशी जर खरोखरच इच्छा असेल तर फाळणीच्या दृष्टीनें प्रयत्न झाले पाहिजेत असें त्यांना वाटते. गोवा इत्यादि परकीय वसाहतींबद्दल लिहितांना श्री. विवेक यांनीं पं. नेहरूंच्या धोरणाचा पुरस्कार केलेला आहे. भारताच्या कॉमनवेल्थमधील सभासदत्वाला श्री. विवेक यांनीं पाठिंबा दिलेला आहे.

आर्थिक व राजकीय अन्तर्गत प्रश्न या भागांत भारताच्या वाढत्या लोकसंख्येच्या प्रश्नावर संततिनियमन हा एकच तोडगा आहे व सरकारी यंत्रणेद्वारा त्याचा सर्वत्र प्रचार झाला पाहिजे असें त्यांनीं मांडलें आहे. योजनाबद्ध आर्थिक व्यवस्थेला त्यांचा पाठिंबा असून अन्नधान्याचें विनियंत्रण करण्यास त्यांचा सख्त विरोध होता.

राष्ट्रीय ऐक्य या नांवानें भाषावारप्रांतरचनेला विरोध करणाऱ्यांना त्यांनीं सांगितलें आहे कीं देशांतील जनता, राष्ट्रानें तिच्या मूलभूत गरजा व उच्च मूल्यें परिपूर्ण करण्याचा प्रयत्न केला तरच राष्ट्रावर प्रेम करते. जोपर्यंत केन्द्रसरकार या दृष्टीनें प्रयत्न करीत आहे तोपर्यंत देशाचे भाषिक वादामुळें तुकडे होतील अशी भीति बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं.

— **नारायण य. डोळे**